म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. २२८९



# नेहरू
## एक छंद-मुक्त चिंतन

प्रफुल्ल-दत्त

REFBK-0018687

निबंध २२/९
संदर्भ
८९३६८
२०।२।८४.

# नेहरू-एक छंदमुक्त चिंतन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

प्रफुल्ल-दत्त

REFBK-0018687

अभिनव प्रकाशन, मुंबई १४

प्रकाशक :
वामन विष्णु भट
अभिनव प्रकाशन
५३, गुरुनानक मार्केट,
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४

प्रथमावृत्ती : डिसेंबर १९७३

© द. वि तेंडुलकर
१२२, रुक्मिणी स्मरण, तेलंग क्रॉस रोड,
माटुंगा, मुंबई १९

मुखपृष्ठ : पी. एस्. पावसकर

किंमत : आठ रुपये

मुद्रक : ना. दा. चावरे
नागरिक छापखाना
२३०, व्यंकटपुरा, सातारा.

श्री. एस्. व्ही. नाबर
आपल्या ऋषितुल्य आचरणाच्या
अमृतमय भावस्पर्शाची
ही एक जाणीव

## वलय : क्रमांक


१ मी एक सूर्यफूल
२ चिरयौवनाचं रहस्य
३ सिद्धार्थ
४ असे व्यासपीठ
५ वारसा
६ आज तूं
७ अयोध्या
८ साखरेचा रवा
९ तुझी पावले
१० गुरुत्व
११ पूर्वेचे ऋण
१२ चैतन्य घरीं आले
१३ ज्ञानियाचे डोळे
१४ शिस्तीचा शिलेदार
१५ मानस-मेघ
१६ कमलबंध
१७ जीवन असे रंगे
१८ विचार वैभवाचं मूळ
१९ शिवालय
२० मर्जीतला माळी
२१ एकच पूर्ण विराम
२२ गुरुदेव म्हणाले
२३ काळाचे शिल्प
२४ जाणीवेच्या तीरावर
२५ सिद्धाचे एक स्वप्न
२६ अस्थिरूपें उरावे
२७ पिता-पुत्र
२८ बद्धांची श्रद्धा
२९ बोटे छाटावी लागतात
३० मनस्ताप
३१ नायगारा
३२ ठिणगी
३३ मनोरथाची सूत्रें
३४ ठेवा
३५ ढासळला बंधारा
३६ प्रभाव
३७ मुक्या जीवांच्या सान्निध्यात
३८ माउली झाली रणरागिणी
३९ का होय कलंकित ?
४० विरे जन्माचे नातें
४१ आजीचे भाकीत
४२ विषारी विळखा
४३ निर्भय रहा
४४ माझ्या भाली कुंकू
४५ वळवाच्या सरिपरि वर्षावे
४६ संकल्प इथे मोहरे
४७ छळातून आत्मबळ वाढते
४८ मनोगतांतील वीज
४९ सत्तावनची स्मृति
५० विजय आणि वेदना
५१ अखेरची मानवंदना
५२ अतूट नातें
५३ ममैव सारे
५४ प्रत्यय
५५ केवळ शब्दांचे आसूड
५६ सुवर्ण-मध्य
५७ पंडित : सार्थ नांव
५८ शिखरें उंचावली

५९ ओठाचा अडसर
६० असे उणेपण क्षम्य
६१ आत्मदर्शन
६२ आहुतींची स्मरणिका
६३ गर्दी आणि एकांत
६४ गरुडाची पिलें
६५ तृणाची पाती
६६ आत्म्याचा गंध
६७ गुरुभूमिकेची जाण
६८ स्वातंत्र्याला मोल आहे
६९ एक पाऊल पुढें
७० तूं तर दीप हिरण्मय रे
७१ छाव्याचा पंजा
७२ तूही उदास झालास
७३ ज्योतीसारखी स्मृति-
७४ मलयजशीतल स्पर्श
७५ उचलेगिरीचा प्रसाद
७६ अहिंसेची उपासना
७७ जीवनातला रंग नवा
७८ उमेदवारी
७९ भितीचे भय पाकोळीला
८० अमर गन्ध
८१ संयमपूर्ण वक्तृत्व
८२ मी सुखावलो नसतो
८३ जगन्नाथाचा रथ
८४ तुझे गंगा-दर्शन
८५ आकाशापरि अलिप्त तू
८६ तो तुझ्यापेक्षां मोठा
८७ कल्लोलिनी
८८ आर्य प्रवृत्ती
८९ तुझेपण उजळ
९० हिमनगा !
९१ बुद्धाची विचार-पल्लवी
९२ प्रेरणा
९३ विरक्ति
९४ तुरुंगाची देवालयें झाली
९५ धरणे नव्हेत, स्वप्नें
९६ गीता
९७ जमीन-अस्मान
९८ 'त्या' दिवसाचे दर्शन
९९ जखमी पक्षिण
१०० यशाचे मर्म
१०१ 'गुणीच गुणरागीच'
१०२ दिगंत किनारणारी दृष्टि
१०३ जवाहिराचा देश
१०४ आनंदभवन
१०५ तुला
१०६ गजेंद्र कथा
१०७ गुरुत्व
१०८ नेतृत्वाची बैठक
१०९ वेदघोष
११० बापू ! मीही आलोच
१११ काश्मीर: एक शोकांतिका
११२ अक्षय जीवन
११३ मुक्त-छंदातील महाकाव्य
११४ विश्व तुझ्यापदि आले
११५ एक व्रतस्थ जीवन
११६ दुर्दैवी दुपार

## माझी भाव-समाधि

पं. जवाहरलाल नेहरू हे माझे एक जाणिवेतल्या वयांत साकारलेलें श्रद्धास्थान आहे. कदाचित ती श्रद्धा माझ्या स्वप्नाळू वृत्तीतून निर्माण झाली असेल. सोळाव्या वर्षीं पाश्चात्य देशांत उच्च शिक्षणासाठीं गेलेले पंडीतजी विज्ञानाचे तेज घेऊन मायदेशी परतले. अण्वस्त्रांच्या सामर्थ्यांनी वलयांकित झालेली त्यांची प्रतिभा नवे विचार घेऊन इथे आली. पण भारतासारख्या खंडतुल्य देशाची अवनतावस्था पाहून ते अस्वस्थ झाले.

याच सुमारास गांधीजींच्या भावस्पर्शाने नेहरू कुटुंबियांत काया-वाचा मने पालट झाला. आश्रमांतील पर्णकुटीच्या पायरीशेजारी चितारलेल्या स्वस्तिकच्या दर्शनानें प्रासादतुल्य आनंदभवनाचे मिनार नतमस्तक झाले. अहिंसेच्या सामर्थ्यानें अण्वस्त्रेदेखील हतबल होतात हे पटल्यामुळेच नेहरूनी गांधीजींचे अनुयायित्व पत्करले. आणि ते त्या श्रद्धेच्या कसोटीला पूर्णपणे उतरल्यावरच महात्माजींनी आपला राजकीय वारस म्हणून त्यांचे नांव जगापुढे जाहीर केले.

मला राजकारणांत फारसे कळत नाही. त्यामुळे भारतीय राजकारणात पं. नेहरू कितपत यशस्वी झाले ह्याचे मोजमाप ह्या चिंतनात आढळणार नाही. यातील चार दोन छटांत त्यांच्या उण्याअधिक प्रवृत्तींचा उल्लेख सूक्ष्म वाचकाच्या निदर्शनास येईल. पण तो ह्या चिंतनाचा हेतु नाही. माझ्या कलावंताच्या नजरेला त्यांच्या प्रतिभेच्या मानस–मेघाची जी काजळी दिसली, जो ओलावा जाणवला, ज्या विद्युत् छटांनी मी स्तिमित झालो, त्यांचा आविष्कार माझ्या ह्या चिंतनांत वाचकांना दिसेल.

यासाठीं मी पंडितजींच्या जीवनाचा थोडा फार अभ्यास केला. पण आवडीतल्या व्यक्तीच्या गुण-विशेषांचा ध्यास लागल्याशिवाय तिच्या विषयींच्या बोलण्या–लिहिण्यांत रंग भरत नाहीं. नेहरुंविषयी मराठींत ‘ आलेली ’ पुस्तकें वाचली तेव्हां माझ्या असे लक्षांत आले कीं त्यांतील बराचसा भाग भाषांतरीत आहे. आराध्य-दैवताच्या प्रतिभेचे ‘ स्नान–पान–

अवगाहन' त्यांत ते नाहीं. माझ चिंतन हे त्यांच्या जीवनावर लिहिल्या गेलेल्या गवतासारखे उदंड दुर्वासारखे वेंचक आहे. दुर्वा वेंचणाराला आपल्या दैवता-वरील श्रद्धा सतत जागी ठेवावी लागते. त्याच्या मानस-पूजेंत अंतराय पडून चालत नाहीं. माझ्या तशा श्रद्धेचा स्पर्श वाचकाला ह्या चिंतन–वलयांतून जाणवला तरी माझी भाव–समाधि सार्थकी लागेल.

जातां जातां हे लिहिल्यावाचून राहवत नाही कीं स्वातंत्र्यानंतरच्या ह्या पंचवीस सव्वीस वर्षांत पंडितजींच्या भोवतीची जनतेच्या दृष्टीनीं किनारलेली तेजोवलये पदोपदी क्षीण होत चालली आहेत राजकीय मतां–मतांच्या कोलाहलांत सर्वसामान्य माणसाच्या मनाच्या छताला काजळी वाजली आहे. तरी पण माझी अशी खात्री आहे की, भारतीयांच्या मुक्तीत जगांतील मानव बंधनमुक्त करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या शांति–दूताला जग आणखी कित्येक शतके तरी विसरणार नाहीं. मंदिराच्या देव्हाऱ्यांत नंदादीपाशेजारीं जसे निरांजन तेवत असते, तसे मानवतेच्या मंदिरांत महात्माजी शेजारी ' दक्षिणे लक्ष्मणो ' म्हणून पंडितजी प्रकाश देत राहतील. आणखी पंधरा वर्षांनी महात्माजींच्या वाणीतून अवतरलेले सिद्धार्थाचें तत्त्वज्ञान पेलणाऱ्या या विश्वप्रिय पुरुषोत्तमाला जग शताब्दीच्या सोहळ्यांतून आदरील आणि तेव्हां माझ्या चिंतनांतून अक्षर–बद्ध झालेली काही सूक्तें काहीच्या तरी मुखी आणि मनी खिळतील. तीच माझी कमाई.

असो. ह्या पुस्तकाच्या छपाईचे काम माझे एक जाणकार स्नेही श्री. वामनराव भट यानी अंगावर घेतले नसते तर हें चिंतन आणखी किती दिवस अप्रगट राहिले असते, कोण जाणे.

१७–१२–७३ प्रफुल्ल-दत्त

माटुंगा–मुं. १९

## : १ : मी एक सूर्यफूल

तुला मी तसं पाहिलंच नाही
तसं म्हणजे जवळून
काय जरूर ?
थोरांच्या दर्शनानेंच जर माझी प्रतिभा रंगण घेते
तर त्यांच्या जवळिकेची प्रौढी कशाला ?
आणि उमलल्या फुलाने किरणांचा दोर करून
फुलवत्याचे दर्शन घेऊच नये
दर्शनांतच देवपणा राहतो
जवळिकेंत त्यांतील ' मम ' त्वाला तडा जातो
माझी प्रतिमा अजून तुझ्या भाव-विश्वांत रंगण घेत आहे
तेव्हां तुझ्या प्रदक्षिणेच्या फेऱ्यांत फुलणाऱ्या
अनेक फुलांतील
मी एक फूल
. . . . . . सूर्यफूल

१-११-७२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१८६८७

## : २ : चिरयौवनाचं रहस्य

" जीवनाच्या ह्या पाउलवाटेवरून जाताना
मला खूप खूप पहायचं आहे
भोवतालच्या जगांतील सौंदर्याशी एकरूप व्हायचं आहे
पण फार काळ रेंगाळूनहि चालणार नाही
कारण अंधारण्यापूर्वी मला घरी जायचं आहे "
अशा ध्वन्यर्थाचे चरण अखेरी अखेरी
तुझ्या ओठी खेळत होते
तुझ्या जीवनावरील हे भाष्यच नव्हे काय ?
दिलाच्या रागदारीने कर्तव्याचे ओझे पेलीत
जीवनाचा प्रवास केलास
म्हणून तूं अखेरपर्यंत थकला नाहीस
मन तालांत असलं की देह आपल्या वजनाहून अनेकपट
ओझं पेलूं शकतो
त्याचा त्याला भार वाटत नाहीं
रूपकांत बोलायचं तर
मी तुला चंडोल म्हणेन
चंडोल... ...अस्मान पाठीवर पेलीत
स्वरवलयांत रंगणारा एक भावजीवि पक्षी
तुझ्या चिरयौवनाचं रहस्य ह्या रसिकतेंत आहे

६-११-७२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ७३९८ दि
२२८९

## : ३ : सिद्धार्थ

तुझ्या तांबुस तळव्यांत
उबारलेले किरमिजी कबूतर
कंठांत विश्वशांतीचा संदेशघे ऊन
दिगंतरांत भरारलं
भगवंताचं निळं जलाशय थरारलं
म्हणालं, "कोण हा देवदूत ?
मानवतेच्या मायेचा पूत"
पूर्वा हुंकारली—
"शुभंकर . . . जवाहर
मी याचं ज्ञातेपण जागविलं
नेतेपण वागविलं
हा माझा सिद्धार्थ
याच्या पावलांत माझा प्रकाश आहे
मति–विकास आहे"

१–११ ७२

## : ४ : असे व्यासपीठ

तुझ्यासाठी जमलेल्या गर्दीत
काहीं चेंगरतात
काहीं गांगरतात
तर काहीं मरतातहि
पण तुझ्या दर्शनासाठी आलेल्यांपैकी
दटावूनहि कुणी मागे हटत नाहीं
कुणी रेटतां रेटत नाहीं
सारे मनाचे कान करून
मुक्तीच्या ध्यासाने मंतरलेली
तुझी वेदवाक्यें ऐकायला अधिर असतात
जागा मिळेल तिथें
( गात्रें बधिर झाली तरी )
ठाण मांडून बसतात
वेळेचे भान विसरून
लाखांच्या सभेचे
असे व्यासपीठ मिळाले
ते फक्त श्रीहरीला
म्हणूनच त्याला ( आणि तुलाहि )
जीवनाचा अन्वयार्थ लावणारी
गीता सांगता आली

२-११-७२

## :५: वारसा

महात्माजींचं जीवन ऋषीचं
अध्यात्मावर आधारलेलं
आत्मनिरीक्षणानं उंचावलेलं
आणि त्यांना मान मिळाला तो
सम्राटालाहि न मिळणारा
त्यांचे स्मरण करतांना अनुयायांचे हात जुळतात
पण अनुकरणासाठी तितकेसे वळत नाहीत
काहींना वाटे
" या चरख्याने इथे पाय रोऊन
बसलेला परका परत जाईल काय ?
सुताच्या गांठीने भुते बांधता येतात थोडीच ?
खूळ आहे खूळ "
काही त्यांच्या अहिंसेचा उपहास करीत
म्हणत, " ती एक दुबळ्याची पळवाट आहे
गांधीवाद म्हणजे भेकडांचा पलायनवाद "
परंतु त्या राजर्षींचा मनोदय
फक्त तूं जाणलास
शक्यतोवर आचरणांत आणलास
कारण तुझ्या गतीत भूगोल होता
स्मृतीत इतिहास होता
कृतीत मानवी-मूल्ये होती
आणि सहकाऱ्यांबरोबर चालतां चालतां
अंतरंग खोलता खोलता
राष्ट्रपित्यानी आपला वारसा हेरला
म्हणाले, " आजवर मी जो विचार पेरला
त्याला हाच खतपाणी घालील. . . तारील
विषारी चोंचीच्या पाखरांपासून
पिकल्या पिकाला वारील
स्व-तंत्राने चालणारा हाच माझा मानस पुत्र

## : ६ : आज तूं

आज तूं
पाठीमागे हात जुळवून
पायावर दृष्टि खिळवून
कसलीतरी गुंतागुंत
सलत्या उरी उकलीत आहेस

तुझ्या मुखावरील सिध्दाची शांति ढळली आहे
संध्येची कांति काजळली आहे
वादळाशी नाती सांगणारी तृणाची पाती
आज लहरत नाहीत
त्यांना देखील उमजलं
" आपला सखा
आज मुका आहे "

समोरच्या सरोवरानी आपला दर्पण
केला आहे शैवालाला अर्पण
म्हणालं, " आपल्यांतच आपण काय पहायचं ?
नको त्याला जीवनांत कशाला
डोकावू द्यायचं ?

आणि माथ्यावर एक मेघ उतरतो आहे
तुझ्यासारखाच ओथंबून आलेला
तुझा हस्तक
शांतवाया तुझे भारावलेले मस्तक

१-११-७२

## : ७ : अयोध्या

महाराष्ट्राच्या राजधानीतील अनेक हमरस्ते
तुझ्या दर्शनासाठी दुतर्फा फुललेले
मी पाहिले आहेत.
वळणावळणावर कलाबतूंत गुंफलेल्या गुलाबाच्या
कमानीमधून जातांना तुझा रथ स्थिरावत असे.
जनतेच्या नेत्रांच्या निरांजनांतील स्नेहात
आपले रूप पाहण्यासाठी.

मुंबापुरी ही जगांतील फिरस्त्यांची एक धर्मशाळा
जसा ज्याचा रस्ता, तसा त्याचा शिरस्ता
एक कसा जगतो हे दुसऱ्याला माहित नसते
वारुळांतून विखुरलेल्या मुंग्या तरी बऱ्या
माथ्यावर माध्यान्हीचे अन्न असले
तरी मनाने सुन्न नसतात

पण तुझ्यासाठी सारी जनता
व्यावहारिक वैषम्य आणि वैमनस्य विसरून
एकवटे
वनवासाहून परतलेल्या रामदर्शनासाठी
अयोध्या उत्कंठे तशी
कारण देशासाठी तूंहि वनवासी झाला होतास
तुझ्या अस्तित्वाने मुंबापुरीची
( त्या प्रहरापुरती तरी ) अयोध्या होई

३–११–७२

## :८: साखरेचा रवा

मुलांना त्यांच्यात रंगणारा
आणि त्यांना रंग-वणारा माणूस आवडतो
तत्त्वज्ञानाचा झगा घालून
येता-जाता उपदेश करणारा
सुरकुतल्या चेहऱ्याचा माणूस
त्यांना नको असतो

पण तीच मुले प्रसन्न मनाच्या
हसत्या-खेळत्या पिताजींच्या पाठीचा
घोडा करतात
त्यांच्या बरोबर रंगण धरतांना
त्यांना अंगण अपुरं पडतं

तुझ्या वागण्यांत मूलपण होतं
कधींच मलूल न होणारं फूलपण होतं
सभेतल्या गर्दीतून जातांना
तूं एखाद्या बालकाला उचलून घेत असस
कौतुकाने त्याला उंच करीत असस
गोपीच्या कडेवरील कळशी
कृष्णाने सहज उचलून उंचवावी, तसं
आजुबाजूच्यांना आश्चर्य वाटे
ते म्हणत, "थोरांचे थोरपण लहानात लहान
होण्यांत आहे.
मुंगीच्या मनाने साखरेचा रवा खाण्यांत आहे

४-११-७२

## :९: तुझी पावले

तुझी प्रतिमा आम्हां भारतीयांच्या मनांतून
आणखी कित्येक शतके तरी जाणार नाहीं
ज्याच्या आचरणांत मानवतेची व्यथा
बोलकी होते, त्याची गाथा जग शिरोधार्य मानते
भारतीय मन देणाऱ्याच्या ऋणांत राहणारे आहे
गंगौघांत फुलं उधळणारं आहे
मानवांत देव पाहणारं आहे
तूं आमच्यासाठी आणलंस ते केवळ स्वातंत्र्य नव्हे
ते आणणारे तुझ्यासारखे अनेक होते.
तूं आम्हांला पंच-खंडांत मानमान्यता मिळवून दिलीस
आजपर्यन्त जग आम्हांला युद्ध-प्रिय समजत होते
पण विजेच्या वेगावर स्वार होणाऱ्या
वेड्या विश्वाला भारताची मनोवृत्ति युधिष्ठिराची
आहे, हे तूं पटवून दिलंस
मंदिरांतून निघालेली पालखी
गावाला वळसा घालून फिरून मंदिरांत आली
तेव्हां तुझी पावले
आम्हाला पादुकासारखी भासली

४–११–७२

## : १० : गुरुत्व

प्रतापगड येथे
छत्रपतींच्या पुतळ्याचे अनावरण कुणी करायचे ?
महाराष्ट्राचे अधिपत्य हिकमतीने हिरावून घेणाऱ्या
एखाद्या प्रांतीय कीर्तीच्या नेत्याचे हात
त्या शीलवान प्रतिमेला लागायला नको होते
त्याकरितां एखादा इंद्रप्रस्थीयच हवा. पण कोण ?
वृत्तपत्रानीं गौरविलेल्या पण महाराष्ट्राच्या मर्दुमकीकडे
कौरवी वृत्तीने पाहणाऱ्यांना देखील
ही संधि आपल्याला मिळावी असे वाटले असेल.
शिवाजी हा, 'भारतात एकछत्री सत्ता असावी
अशा विशाल मनोवृत्तीने जगणारा राजा होता
केवळ मराठी माणसालाच मुक्ति मिळवून देणारा
संकुचित वृत्तीचा पुढारी नव्हता.
इंद्रप्रस्थीयांत त्यावेळी अहमहमिका लागली असेल.
'कीर्तीचे वरदान आपल्यालाच मिळावे' असे साऱ्यांना वाटते.
पण तेव्हां तूं मौन आचरिले असशील
मौनाच्या म्यानांतच सामर्थ्याचे स्थान आहे
त्या सोहळ्यासाठी तुझी योजना झाली
आणि सारे अंतःकलह एकरूप झाले

तीनशे वर्षांपूर्वी आपल्या शिवशक्तीने
दिलीश्वरावर जरब बसविणाऱ्या
मराठ्यांच्या राजाचे स्मारक
प्रतापगडावर . . . त्याच्या दैवताशेजारी
तुझ्या-हातून होत आहे, हा महाराष्ट्राला मोठा बहुमान वाटला.
अनेक हत्तींचे बळ अंगी असलेल्या शत्रूचा अहंकार
पिंजण्याची शक्ति भवानीच्या भक्तीमुळे शिवाजीला
मिळाली. त्या दृष्टीनें प्रतापगड हे त्याचे जीवन सार्थ करणारे तीर्थक्षेत्र.
हे अनावरण तुझ्या हस्ते झाले, ह्यांतच तुझे गुरुत्व आहे.

६-११-७२

## : ११ : पूर्वेचे ऋण

सारे जग अण्वस्त्राने अहंकारलेले आहे.
त्याची स्वामित्वभावना दिवसेंदिवस युद्धाच्या
भाषेंत भडकत आहे
पण तुझ्या उरी येशूची क्षमा आहे
तसे तुझ्यांत संयमाने संघर्षाला संगमाकडे
नेण्याचे सामर्थ्य आहे.
तुझ्या मुखी यंत्रयुगाचे स्तोत्र असले
तरी विज्ञानानेच जग सुखी होईल,
यावर तुझा विश्वास नाही
तुझ्या रोमरोमांत भारतीय मनाचे
अवशेष भिनले आहेत
पर्वताची उत्तुंगता
पौरुषाची उदात्तता
आणि प्रतिभावंतांचे उन्मेष
यांचे जेथें जेथें तुला दर्शन घडते
तेथें तेथें तुझें दिल् झेपावते
पाश्चात्यांच्या गुण-विशेषांनी तुझे जीवन
अलंकारलेले असले
तरी तूं ऋणी पूर्वेचाच

२-११-७२

## : १२ : चैतन्य घरीं आलं

चैतन्य म्हणजे ओंकार
नाभिकमलांत नादबद्ध होणारा एक ध्यास
आत्म्याचा आतला आवाज
नेहमी वलयांत वावरणारा
त्याची उत्पत्ति जरी चार भिंतींच्या चौकोनांत
होत असली, तरी लय क्षितिजाला वेलांटी देणाऱ्या
निळ्या नभाच्या पोकळीत होतो
स्थितिमानता अशी त्याला नाहीच
अखंड तरलता हा त्याचा स्थायीभाव
आनंद भुवनांतील पित्याच्या बैठकी भोवती
तुझं बालपण लहरलं
लंडनच्या उपनगरांतील एका विद्यालयांत
तुझं विचार-वैभव मोहरलं . . . रसाळलं
भारतांत आल्यावर त्या विचारांना स्थिरता आली
महात्म्याच्या विवेक-शीलतेची त्यांना बैठक मिळाली
हां हां म्हणता तुझ्या विभूतिमत्त्वानी
विश्व झंकारलं . . . भारलं
अणुशक्तीच्या जोरावर जगावर सत्ता चालवूं पाहाणारी असुरी वृत्ति
ओशाळली
म्हणाली "ह्यानीच आमच्यांतील माणूसपण तारलं"
तुझ्या कीर्तीचे पडसाद जसजसे जवळ येऊं लागले
तसतशी भारतीय मनोवृत्ति तुझ्या भोवती
फेर धरूं लागली.
तिच्या देहाचा देव्हारा झाला
म्हणाली "दिगंताला वलयांकित करून
चैतन्य घरीं आलं"

८-११-७२

## : १३ : ज्ञानियाचे डोळे

जग तुला स्वप्नाळू म्हणते
मीहि त्यातलाच एक
पण त्यांच्यापेक्षा माझी दृष्टि वेगळी
म्हणून माझी त्या स्वप्नाळू वृत्तीबद्दलची
मीमांसा वेगळी आहे.
आपल्यापुरतं पाहणाऱ्या व्यक्तीच्या नजरेंत
करडेपणा असतो. आक्रमकाविरुद्ध ती
व्यक्ति सदैव झेप घेण्याच्या पावित्र्यांत उभी
असते. पण तिच्या सत्तेला आणि समाधानाला
कक्षा असते.
तुझी दृष्टि सर्वव्यापी. त्यामुळे कुणावरहि अन्याय
झाला तरी संतापणारी.
समर्थ म्हणतातच "व्याप तितुका संताप"
विश्वाचं शांति-निकेतन करूं इच्छिणारा
आत्मा स्वप्नाळू नसून कसं चालेल ?
मनांतलं स्वप्न डोळ्यांत सारखं फुलत ठेविल्याशिवाय
कर्मात रंग भरणार नाही.
स्वातंत्र्यानंतरच्या अवघ्या पंचवीस वर्षांच्या
कालावधीत जगांतील प्रगत राष्ट्रांत
भारताचेहि नांव घेतले जावे, हे तुझे
स्वप्न साकारत चालल्याचेच मान-चिन्ह आहे.
"विश्वरूप होऊं अवघे" म्हणणाऱ्या
ज्ञानियाच्या डोळ्यांतील भोळेपण तुझ्या स्वप्नाळू
वृत्तींत होते.
नेत्याचा अहंभाव किंवा जेत्याचा कुटिल डाव
तुझ्या नजरेंत नव्हता.

## : १४ : शिस्तीचा शिलेदार

एका सभेत
व्यासपीठाभोवती गोंधळ करणाऱ्या समुदायावर
चिडून बैठकीवरील लोड फेकतांना तूं (चित्रांत)
दिसतो आहेस.
तसा तुझा पिंडच गुलामगिरीविरुद्ध बंड करणारा आहे.
ज्याला अन्यायाची चाड आहे, तोच असं काही दिसलं
तर चिडणार . . . खवळणार.
ज्याच्यावरील प्रेमासाठी लोक गर्दी करतात
त्याला प्रसंगी गैरशिस्तीने वागणाऱ्यांना त्या
गर्दीतून बाहेर खेचण्याची हिंमत हवी. नाहीतर
त्याची किंमत राहणार नाही.
शुभंकराला रुद्रावतार धारण करावाच लागतो.
पोलिसांच्या पहाऱ्यांतील चौकोनी सभेत
वक्त्याच्या प्रतिभेला धार चढत नाही.
पुष्कळशा वक्त्यांच्या वाणींतून गंजलेल्या
तरवारीसारखी त्याच त्याच वळणाची परिणामहीन
वाक्ये फेकली जातात.
तुझे प्रत्येक वाक्य क्षितिजाच्या सहाणेवर परजले जाते.
तेव्हां त्याची धार बोथट करणाऱ्यावर तूं
चिडावेस ह्यांत काही गैर नाही.
कळकळीचे आवाहन करणाऱ्या लोकाग्रणीला
एखाद्या आठमुठ्याला उद्देशून आव्हानात्मक
शब्द फेकावाच लागतो.
देशाच्या कल्याणाची भिस्त ज्याच्या
शिरावर आहे, तो शिस्तीचा शिलेदार असायलाच
हवा.

१०–११–७२

## :१५: मानसमेघ

जनमनाच्या तराजूंत थोरपणाचे मोजमाप
अचूक मिळेलच असे सांगता येत नाही.
लोक तुझ्यामागे आले, म्हणून तुला नेता म्हणावे
तर तेवढ्या-अर्थाने ते खरं आहे.
पण नेत्याचा अभिनिवेश तुझ्यात नव्हता.
जेत्याच्या भावना तर तुझ्या डोळ्यांत कधीच
तरंगल्या नाहीत.
जे त्याचे डोळे ईर्षेने अंगारलेले असतात.
तुला पुढारीहि म्हणता येणार नाही.
कारण पुढाऱ्याला प्रसंगी पेंढारी व्हावं लागतं.
तर मग तूं कोण ?
तूं विशिष्ट तत्त्वांचा पुजारी
तरीपण कोणत्याहि बिरुदावलीत मी तुला
बसवणार नाही
तूं होतास एक शांतिदूत
तुझे स्वप्न होते मेघाचे —
दिगंताच्या कोनांत तरळत राहून जगासाठी
रिते होण्याचे.
त्यासाठी तूं अहोरात्र आपल्यातच गढलास
विश्वशांतीसाठी आमरण लढलास
वादळीवाऱ्याशी अविश्रांत झगडलास
भारतमाता 'सस्य-स्यामलाम्-सुफलाम्' व्हावी
म्हणून लहरणारा . . . विरणारा
तूं एक जन-मानस-मेघ होतास.

५-११-७२

## : १६ : कमल-बंध

आवड जीवनाशी एकरूप होणारी असावी.
नियतीच्या आघातानें हृदयाला पडलेली खांच
तिच्या आस्वादानें भरून निघायला हवी.
अंतरीच्या कळा सहन करण्याची शक्ति तींत हवी.

तुझ्या शेरवानीच्या तिसऱ्या गुंडीवर
गुलाबाचे एक टपोरे फूल खोवलेले असे
बारा महिन्यांतले सारे दिवस
जगाच्या पाठीवर तूं कुठेहि असलास तरी
त्या आवडींत स्मृति-गंध आहे, कमल-बंध आहे

तुझ्या पिताजीनी एका लग्न-समारंभांत
एक काश्मिरी मुलगी पाहिली कमल कौल या नांवाची
लजाळू . . . अबोल स्वभावाची
नांवरूप . . . घराण्याशी सर्वस्वी अनुरूप
पाहून पिताजीनी मागणी घातली
कौल मिळाला. . . . कमल तुझी झाली

पुढें महात्माजी भेटले
तुझे जीवन स्वातंत्र्य-ज्योतीवर पेटले
संसाराच्या निळ्या आकाशांत
वरचेवर विरहाचे काळे मेघ दाटले

बाहेरचे जग तुझ्या तेजानें उजळत होते
आंतले. . . . आनंद भवनातले कमल काजळत होते
पुढे तूं तुरूंगांत . . . ती रुग्णालयात तिच्या अखेरच्या आजारांत
तुरुंगातून तुझी फक्त अकरा दिवस सुटका
तेवढ्याच तुला तिच्या सान्निध्याच्या घटका
आणि मग . . . चिरंतन विरहाचा चटका
तो सहन व्हावा म्हणून तर शेरवानीवर काश्मिरी गुलाब
जीवनाशी एकरूप होणारा स्मृति-गंध नव्हे. कमल-बन्ध

९–११–७२

## :१७: जीवन असे रंगे

तुझ्या मतांची घनता मनांत नव्हती
ते द्रवरूप होते. . . . . प्रवाही होते
जिथे जाई तिथे तसे होई

गिरीजनांच्या अंगणांत
ढोलाच्या तालांत धरिलेस रंगण
गाण्याचा अर्थ कळला नाही तरीपण

उत्तरेकडील होळींत
पुरभय्यांच्या टोळीत घोटा ढोसून गुलाल फासून
उधळलास रुमाल, केलीस कमाल

गंगेच्या काठी, भक्तांची दाटी
यात्रेकरूंच्या मेळाव्यात
तूंहि झालास पुढे
तीर्थ-प्रसादासाठी

कोळयांच्या नाचांत तुझ्या हातीं वल्हें
नाचतांना देह तुझा नावेसारखा कले

भारतीयांच्या संगे
तुझे जीवन रंगे
जीवन गेले वाहून
तरी तत्त्व राहिले मागे

११-११-७२

## : १८ : विचार-वैभवाचं मूळ

तुझ्या विचार-वैभवाचं मूळ
अखंड ज्ञानोपासनेंत होते
शेतीप्रमाणें मनाचीहि मशागत करावी लागते
तेव्हां जीवनाचे पीक कसाला उतरते

सोळावे वर्ष
यौवनाच्या उंबरठ्यावरून
जीवनाची क्षितिजे न्याहळून पाहण्याचे वय
परंतु यापूर्वींच तूं अनेक पाश्चात्य लेखकांची
पुस्तकें वाचली होतीस
शिक्षणासाठी इंग्लंडला गेल्यावर
वडिलांना तूं 'धी न्यू आयलंड,' हे पुस्तक वाचण्याची
शिफारस केली होतीस

तुरुंगाची तूं अभ्यासिका केलीस
वाचता वाचता बुध्दीला छेदून जाणारे परिच्छेद
आणि भावनेला वेधून टाकणाऱ्या कविता
यानीं तर तुझ्या मनाचेहि आनंद-भवन केले

उपासकाच्या आर्ततेनें
आणि अभ्यासकाच्या तन्मयतेनें
हरएक पुस्तक तूं रस घेऊन वाचलेस
म्हणून तुझ्या जीवनांत आमरण नवरंग
भरलेले होते.

१२-११-७२

## : १९ : शिवालय

विश्वाची चिंता वाहाणाऱ्याचं मन
सदैव चिंतनमग्न असतं
त्या चिंतनांत व्यत्यय आला तर
ते चिडतं . . . चरफडतं . . .
पण त्याला हवा तो एकांत मिळाला
तर चिरंतन मूल्यांचं साहित्य
त्या चिंतनांतून निर्माण होतं

तुझं ( आणि इतर काहीं नेत्यांचं ) असंच झालं,
तुझ्या चिंतनांतून तरंगणारी विचारसरणी
लेखणींत उतरली ती तुरुंगाच्या एकांतात.
तुरुंगवासाचा भोग नसता तर 'जगाचा इतिहास' लिहिण्याचा योगच
तुझ्या आयुष्यांत आला नसता.

उत्तम कलाकृति उमलते ती नीरव वातावरणांत
प्रतिभेला उन्मेषाचे अंकुर फुटतात
ते चिंतनाच्या निळ्या वलयांत
घाईगर्दींत लिहिल्या गेलेल्या शब्दांना
भावार्थाची उंची गांठता येत नाहीं.

तुझ्या प्रतिभेला सुरुंग लावला तो तुला
तुरुंगाचे दार दाखविणाऱ्या नेत्यांच्या न्यायालयानीं.
त्यानीं आपले कर्तव्य बजावले
त्यांना काय माहीत कीं
– " शिस्तीच्या शीलेवरील ह्या
शुभंकराच्या अस्तित्वानें तुरुंगाचे शिवालय
होणार आहे ! "

४-११-७२

## : २० : मर्जीतला माळी

काही वर्षांपूर्वी
अलाहाबादला गेलो होतो, तेव्हां तुझं घर पाहिलं
" ज्या घरट्यांतिल पाखरांच्या डोळ्यांत
दिगंत विरघळतं ते असेल तरी कसं ? " ह्या जिज्ञासेने

फाटकांत शिरल्यावर एक माळी दिसला
शिशिरांतील थंडीत कुडकुडत असलेला
म्हातारपणामुळें अंग सुरकुतलेला
दुपारचे चढते उन्ह खात बसलेला

आम्हांला पाहातांच म्हणाला —
" या ! बाबानो या ! नेहरू काकाचं
घर पगायला आलात ना ? पगा. पन भाहेरून बंद हाय. हिथं कोन
ऱ्हात नाय. घराला वरीसभर कुलुप असतं. पावनी मानसं चार दीस
येत्याती नि मजा करूनश्यानी जात्याती.
मालीक भोगतो तुरुंगांत सजा अन् ही करत्यात् मजा
मी ह्या देवमानसांच्या घरी कळायला लागल्यापासून कामाला हाय.
इंदिरेला खांद्यावर खेळवलंय. आतां ती जगाला
खेळवतेय. मोतीलाल बाबांची बी माज्यावर लय मर्जी."

बोलण्यावरून तुझ्या वयाचा वाटला. पाउणशेच्या घरातला. पण
जातीच्या माळ्यासारखा फुलत्या मनानं बोलत होता.
माझ्या हातांतला काशीच्या मिठाईचा पुडा मी त्याला दिला नि त्या
समाधानातच परतलो.

गंगेवरून येतांना मनांत विचार आला,
" नेहरू कुटुंबाच्या तीन पिढ्या जवळून पाहिलेला हा माळी . . .
चालता बोलता आहे, तोपर्यन्तच तुझ्या आठवणींना उजाळा
पुढच्या पिढीला असा मर्जीतला माळी मिळणे मुष्कील.

- ७–११–७२

## : २१ : एकच पूर्णविराम

**As long as there are tears and sufferings
So long our work wlll not be over.**

तुझ्या मनाला
स्पर्शि न सहसा उदासीनता
परी कधितरी
आर्द्र लोचनी कढे विषमता
वादळते मन आणि पिंजिते चिंतन-घनता

तेव्हां म्हणसी
" दैन्य जोवरी अवती-भवती
खिन्न मनांतुनि अश्रू स्रवती
तोवरी न विश्रांति "

आणि अखेरी तसेंच घडले
मेजावरले सरले होते
उरले सरले काम

उत्तररात्री
थकल्या गात्री
घेतलास तूं नित्यापरि आराम

जीवनांत तव
विरामचिन्हांवाचुनि ठरला
एकच पूर्णविराम

१७-११-७२

## : २२ : गुरुदेव म्हणाले

गुरुदेव म्हणाले
" हें तर यौवन ऋतुराजाचे
थयथयती उरि तुषार कारंजाचे
संघर्षास्तव अजिंक्य शक्ती येथिल
कधि न राहिली मागे
आणिक स्वातंत्र्यावरि निष्ठा
कधीं कुणाशी तडजोड न करणारी "

गुरुदेवानी चितारलेली
सार्थ तुझी ही मानस-रेखा
कधींच नव्हते ग्रीष्मापरि तव जीवन मरगळलेले
हेमंतांतिल हिमवर्षावे पर्णफुलीं गळलेलें
कधींच वाहुनि नाहीं गेलें श्रावण घन-प्रलयानें
काजळले नच कधीं धुळीच्या वैशाखी-वलयाने
चैत्रपालवी निरंत होती उरिं तव हिरवळलेली
स्वप्नांच्या नंदनिची पुष्पें नेत्रीं दरवळलेली
म्हणुनि तुला गुरुदेव म्हणाले, " वसंत हा ऋतुराज
चैतन्यें यानेंच चढविला भारतास नव साज '

१६–११–७२

## :२३: काळाचे शिल्प

एका चित्रांत अजिंठ्यांतील लेण्यांच्या पार्श्वभूमीवर तूं उभा आहेस
पहाडांतल्या कुशींतील प्रचंड शीळा शोधून
मनांतल्या मूर्ती प्रत्यक्षांत साकारण्यासाठीं
शिल्पज्ञांच्या पिढ्यानुपिढ्या खर्ची पडल्या असतील

शतकानंतरहि त्या बुद्धकालीन कलाकृतींच्या दर्शनांत
जगांतील प्रवाशांना त्या मूर्तीत वेगवेगळा साक्षात्कार घडतो.
तूं तर रसज्ञ . . . कलेचा चाहता
ही लेणी पाहतांना तुझे डोळे घटका घटका तिथें
खिळले नाहींत तरच नवल

पण मला मात्र वाटते कीं
यांतील एकेका शीलेवर एकेकच शिल्प आहे
तुझ्या मनाच्या एकाच शीलेवर तर
विविध रेषा-वलयानीं नटलेली असंख्य
शिल्पें काळानीं उण्यापुऱ्या पाऊणशें वर्षांत खोदली आहेत

त्यांच्या पैलूंतील रेखीवपणा, रंगसंगति जो जाणील तो म्हणेल –
" हेही वेरुळ आणि अजिंठा
इथें मनाचा गळतो ताठा
काळाचे हे शिल्प मनोहर
बघुन वाटते आपण पामर
सैजन्यें लववाया माथा "

१३–११–७२

## :२४: जाणीवेच्या तीरावर ( स्वैर अनुवाद )

मला माझ्या योग्यतेची . . . माझ्यांतील सामर्थ्याची योग्य ती जाणीव आहे. आणि त्याबद्दल मला उगीच नम्रता धारण करण्याची गरजहि नाहीं. पण मला हेहि पूर्णपणें माहीत आहे कीं माझ्यांत इतरांच्याहून काहीं विशेष नाहीं. माझ्यांतील दोषांचीहि मला तितकीच कल्पना आहे. आत्मनिरीक्षणाच्या संवयीनेंच मी माझ्या वेळोवेळी कलणाऱ्या मनाचा तोल सावरूं शकलो, आणि माझ्याशी संबंधित असलेल्या अनेक घटनांचा अलिप्तपणें विचार करूं शकलो. सामाजिक जीवनाचा अनुभव घेत असतांना मला असे आढळून आले आहे कीं लोकप्रियता ही अनेकदां नको त्यांची दासी होऊन राहते. न बदलणाऱ्या गुणाचें अगर बुद्धिमत्तेचें ते मान-चिन्ह तर नाहीच. मग माझी ही लोकप्रियता कशाचे द्योतक आहे ? सर्वसामान्यांप्रमाणे माझ्यातहि दोष आहेत याचे, कीं हातीं घेतलेल्या कार्याच्या सिद्धीचे ? खरोखर माझ्या लोकप्रियतेचे गमक कोणते ?

१८-११-७२

## :२५: सिद्धाचे एक स्वप्न

आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत कर्तव्यसिद्ध
राहूनहि डोळयांत आपले जीवन–स्वप्न जागविणाऱ्या
जगाच्या पाठीवरील चार - दोन नेत्यांपैकीं तूं एक होतास
स्वप्न कसले ? विश्वशांतीचे
शतकांच्या कालावधीतहि आकाराला न येणारे
पण स्वप्न रंगविणाऱ्या व्यक्तीला पायाखालचे
कांटे कधींच दिसत नाहींत. तिची नजर क्षितिजाच्या धारेवर
असते . . .अंतरिक्षांतील नक्षत्रांच्या झुंबराला आंदोलित
करण्याच्या तंद्रींत.
पंचशील हे तुझे असेच एक स्वप्न होते
आशियाई राष्ट्रांत भावनात्मक ऐक्य सांधण्याचा
तूं सर्व शक्तीनिशी प्रयत्न केलास.
पण तुझ्या उजव्या-डाव्या उशाला असलेल्या
दोन दुश्शासनी देशानीं तुझ्याच कुशींत
खंजीर खुपसले.
तुझी वृत्ति धर्मराजी . . . कुणाला नाराज न करणारी. उराशी
बाळगणाऱ्या मूल्यांना तडा न जाऊं देणारी त्यांना. छुपे सहाय्य
केलें ते अमेरिका नि ब्रिटनसारख्या दोन विरोधी तत्वावर
जगणाऱ्या राष्ट्रानीं.
हे सर्व जाणण्याचे ज्ञान तुझ्याजवळ असतांना देखील
' जशास तसे ' हे तत्त्व तूं अमलांत आणलें नाहींस
स्वप्नांच्या निळाईने रंगलेल्या डोळ्यांना वैऱ्याची जहरी
हिरवी वृत्ति दिसत नाहीं
पहाटेच्या घटकेला कर्तव्याच्या वाटेने जातांना
पायवाटेवरील धुळींत वेटोळे घालून बसलेले फुरसे
चावलें कधीं हे तंद्रींत चालणाऱ्याला कळत नाहीं
काहीं वर्षांनी अंगावर कोड उठल्यावर ते कळते. पण

तेव्हां त्यावर इलाज करायला उशीर झालेला असतो.
ते विष मस्तकांत भिनलेले असते. त्यानें मति महिरून टाकलेली असते.
तूं कधीं कुठें उल्लेख केला नाहींस, पण कृष्णाष्टमीच्या
काल्यांत भाई भाई प्रमाणें हातात हात घालून फेर धरणाऱ्या
चीनने अखेरीं आपली कालियावृत्ति प्रकट केली . . .
तुझा विश्वासघात केला.

दहिकाल्यासाठीं आणलेल्या हंडींत कालियाची पिलें
निघाली. तेच विष तुला बाधले.
त्यानेंच तुझा अखेरचा काळ काळवंडला.
कदाचित् उद्या काहीं दशकानी पंचशीलासंबंधीच्या
विषयांत तुझे नांव घेतले जाईल.
सिद्धांची स्वप्नें साकार होण्यासाठीं साधकांच्या
पिढ्या खर्ची पडतात.

१४-११-७२

## :२६: अस्थिरूपें उरावे

अस्थींची जपणूक हा भारतीय संस्कृतीचा एक
भाव-विशेष आहे. सर्व सामान्य व्यक्तीच्या अस्थीदेखिल
गंगार्पण करण्याची प्रथा आहे.
तूं तर काय विश्वाला कुटुंब मानणारा एक जगत्वंद्य पुरुष
परिस्थितीच्या सहाणेवर सारखा संघर्ष घडल्यामुळें मन
चंदनाप्रमाणें झिजविलेला.
तरीपण आपला मनोदय . . . आपली अंतिम इच्छा-सारे सारे
अत्यंत कारुण्यपूर्ण भाषेंत तूं लिहून ठेविले आहेस.
त्यांतील आशय असा . . .

" माझ्या रक्षेचें अवशेष भारताच्या अंतराळांत उधळा
म्हणजे दिशांच्या कोना कोनांत ते स्थिरावतील. या देशांतील
जनतेची मनोभूमिका समजावून घेण्यासाठी मी हज्जारो
मैल प्रवास केला आहे. कोटयावधि लोकांनीं भाविकासारखें
माझ्यावर प्रेम केलें आहे. देहांत त्राण नसलेले कित्येक
गोरगरीब डोळयांत प्राण आणून माझ्या दर्शनासाठी तास
तास उभे असत. त्यांच्या गांवाजवळून वहाणाऱ्या नद्यातून
ती रक्षा वाहूं द्या.

सर्वांत पवित्र गंगानदी, भारतीयानीं महामाता
मानलेली. तिच्यांत माझे अस्तित्व एकजीव होऊं द्या. माझें
बाल्य तिच्याच लहरीवर तरंगले आहे. उषःकाली तिच्या
स्मितांत आणि सायंकाळी तिच्या गहनगूढतेंत मी घटका-
घटका मला विसरलो आहे. भारताच्या इतिहासांतील शेकडो
समर-प्रसंग तिनें पाहिले आहेत. भगीरथ प्रयत्नाने पृथ्वीवर
अवतरलेल्या या गंगेत अस्थिरूपें मी विसावलो तर भारताच्या
हृदयांत चिरंतन राहीन. "

आपल्या देश-बांधवांच्या मनांत अस्थिरूपें
उरून राहणाऱ्या तुझ्या ह्या मनोभावनेंत सात्त्विकता आहे
सौजन्य आहे, तसे समाधानहि आहे.

१९-११-७२

## : २७ : पिता-पुत्र

सकाळच्या कोवळचा किरणांत अरण्यांतील दरडीवर
खेळणाऱ्या छाव्याची चपळाई तुझ्यांत होती.
खेळतां खेळतां तो छावा समोरच्या घळींतून बाहेर
येणाऱ्या चुव्व्याला पंजांत पकडतो, म्हणतो
"अरे चोरा ! कंगालांची कोठारं रिकामी करून तूं
असा माजलास काय ?" तसे गरिबांना गांजणारे, दलितांना
दडपणारे गावठी पुढारी तुला भिऊन असत
वर्षभराचा होताच त्या छाव्याची नजर
सागाचा ओंडका सोंडेवर पेलणाऱ्या हत्तीकडे जाते. हत्ती
दचकतो. मनांतल्या मनांत चरकतो. आधींच बारिक
असलेले डोळे मिटतो नि विचार करतो, "हा छावा
आपल्याला कुठेहि पकडील. ह्याच्याशी दावा नको.
मृगेंद्राच्या घराण्याशी आपण काय नाते लावावें ?
आपण आपली वाट बदलावी"
नामधारी सत्ता धारण करणाऱ्या संस्थानिकांची
गत अशाच मेदवृद्धि झालेल्या हत्तीसारखी होती
घटकेपुरती परक्यांची अंबारी पेलण्यातच त्यांना सुख.
निर्भयता हा तुझा उपजत गुण . . . सिंहाच्या छाव्याचा
पित्याच्या बैठकींतील जागतिक राजकारणाच्या चर्चा
तुझ्या कानांवर पडत. वाचनाच्या ओघांत त्यावर तुझा
विचार होई. फुरसतीच्या घटकांत त्यांचे चिंतन घडे
त्यामुळे यौवनाच्या वेशीवरच तुझे भाव–सामर्थ्य वाढले
आत्मविश्वास बळावला. प्रसंगी पित्यालाहि विरोध
करायला तूं धजलास.
त्यांना वाटले असेल – "आपल्या मुलाच्या
नावांतील अक्षरांत 'हर' आहे. हर हे शिवाचे नांव
शिव शुभंकर तसा प्रलयंकर
हर म्हणजे दुसऱ्याचे हिरावून घेणारा नव्हे.
दुसऱ्यासाठी स्वत:चे हरवून बसणारा"
पितापुत्राचे हे तेज:पुंज व्यक्तिमत्त्व भारताच्या
विसाव्या शतकाच्या इतिहासांत अमर राहील.

२३–११–७२

## :२८: बद्धांची श्रद्धा

पुरुषार्थाची वाटचाल बद्धाकडून सिद्धाकडे जात असते.
बद्धाला आपल्या 'अव'स्थेची जाणीव जितकी तीव्र
तितकी त्याची चाल अधिक गतिमान.
राष्ट्राची बद्धावस्था इतरांच्या मानानें तुला केवढयातरी
बालवयांत जाणवली.
चिंतनाकडे नेणाऱ्या वाचनानें तुझी प्रज्ञा प्रगल्भ झाली
परदेश-गमनाने तुझी विचारसरणी विस्तारली.
मुमुक्षू वृत्तीमुळें आपल्यांतील दोष तुझ्या लक्षांत आले
" माथ्यावर घेतलेले ओझे पेलायला स्वभाव स्वप्नाळू
असून चालणार नाहीं " अशा अर्थाची चौफेर होणारी
टीका तूं मनमोकळेपणानें स्वीकारलीस
आपल्यांतील अपूर्णतेची कल्पना तुला होती
म्हणूनच पूर्णपुरुष होण्यासाठी तुझी सारखी
धडपड चालू होती.
त्यासाठीं सारे विश्व तूं पायाखाली घातलेस
थोरांची मानस-चित्रें जवळून पाहिलीस
तरीपण मानवी- स्वभावाचे कंगोरे तुझ्या लक्षांत
आले नाहींत.
पांडवांची प्रवृत्ति जागविणाऱ्या पुरुषाला दुर्योधनी
मनाचे बारकावे कळत नाहींत
स्वप्नाळू मन अनंताच्या निळाईनें रंगलेले असते
त्याला प्रत्यक्षांतले दिसत नाहीं, परीक्षांतले दिसते
तुझी जीवन-साधना विश्वशांतीच्या सिद्धीसाठी होती.
म्हणूनच जगांतील बद्धांची श्रद्धा तुझ्यावर होती.

१६-११-७२

## : २९ : बोटे छाटावी लागतात

भारतीय स्वातंत्र्याची वाटचाल बहुतांशी अहिंसक
मार्गानें चालू होती. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतरहि त्याचा काहीं भाग
परकीय सत्तेखाली होता.
दीव-दमण आणि गोवा हा तो पोर्तुगालचा भाग
ह्या प्रांतावर शांति-मंत्राचा प्रभाव पडला नाही
सत्त्याग्रहाच्या तंत्राने तेथील राज्ययंत्रणा ताब्यांत आली नाही.
तेव्हां तूं म्हणालास – " मलाहि हातांत झेंडा घेऊन गोव्यांत
घुसावेसे वाटते. "
मूर्तिमंत चैतन्याला आपल्या प्रगतीच्या आड येणारे
अहंमन्य आडमुठे धोरण कसे सहन होणार ?
तेज हे उर्ध्वगामी असते. ते दिगंताला कवळीत जाते.
अंधार दूर करणें हा त्याचा धर्म तूं कडाडलास –
" अजून अपुला नाहीं गोवा ?
तर मग रोवा तेथ तिरंगा
उन्मत्तांची मिरासदारी
नको यापुढें अपुल्या दारी
द्या हटवाद्या उत्तर हट्टी
अतां तयाशी अपुली कट्टी
करा आक्रमण हटवा मागे
गोव्यांतून फिरंगा "

गोव्याच्या प्रश्नांत अनेक राष्ट्रांचे हितसंबंध
गुंतले होते. भारताच्या एकसंघत्वाला शह
देणारा तो एक परकीय मुलूख होता. पांच शतकांहून
अधिक काळ भारताच्या किनाऱ्यावर पाय रोवून उभ्या
असलेल्या ह्या मुठीएवढयाल्या पोर्तुगालच्या हस्तकाला
हुसकावून लावायला भारताला फक्त काहीं तासच लागले
'शिव'कार्य करीत असतांना 'शाही'वृत्ति अशी
आड आली तर प्रसंगीं बोटे छाटावी लागतात.

२४–११–७२

## : ३० : मनस्ताप

भावनाप्रधान व्यक्तीच्या हातून अखेरपर्यंत मनांत योजिलेल्या
अनेक गोष्टी सिद्धीस जायच्या राहतात. त्या टाळण्यांत अगर पुढें
ढकलण्यांत एकतर आपल्या हितचिंतकांना न दुखविण्याचा हेतु
असतो, किंवा आपल्यापेक्षा प्रबळ
परंतु विध्वंसक वृत्तीशी होणारा संघर्ष टाळण्याची दूरदृष्टि तरी असते.

काश्मीर-प्रश्न तूं सोडवायला हवा होतास. त्यासाठी
भारताचे डोळे अखेरपर्यंत तुझ्याकडे लागले होते. पण
तुझ्या डोक्यांत युद्धाच्या परिणामाचा गुंता झाला
होता. तसं पाहिलं तर काश्मीरच्या खोऱ्यांत धुमाकूळ
घालणाऱ्या भुरट्या टोळ्यांचा धुव्वा उडविणें भारताला
अशक्य नव्हते. पण अनेकांचे दडपण . . . विशेषतः
अमेरिकेचे . . . तुला आड आले.

शाही इतमामानें काश्मीरी शेर शेख अबदुल्ला
भारताचे मित्र म्हणून जगांत शेखी मिरवीत होतेच. तुझ्या
भिडस्त स्वभावामुळे असे अनेक शेर तुझ्याभोवती
प्रच्छन्न स्वरूपांत वावरत होते. त्यांतील किती उद्या
भारताला भिकेला लावतील याची कल्पना तुला आली नाही.

भोळ्या डोळ्यांना समोर असलेल्यांत कुणीच
काळे दिसत नाहींत. कारण त्यांचे मन भगवंताचे असते, निळे सावळे
असते. निर्लेप असते. शेख साहेबांच्या शेरवाणींत संघर्षाची पाळी
येतांच कट्यार हजर होती. त्यांच्याबरोबर झेलमच्या तीरावरील
बगीच्यांत वावरतांना तुला आपण बिरबलाबरोबर
काव्य- शास्त्र-विनोद करीत आहोत असं वाटलं असेल. पण तो
आपला अ–कबर करीत आहे याची तुला कल्पना यायला
हवी होती. अकबर ह्या सरळ आणि सात्त्विक मनाचा एक
दिल्लीपती आणि बिरबल हा धूर्त हजरजबाबी आणि
माणसांची पारख असलेला त्याचा स्नेही. त्यांचे नाते होते ते असे.

" नेहरूंच्यात धमक नाहीं, धाडस नाहीं. त्यांची
धडक फक्त सभा सम्मेलनांतील गडबड-गोंधळावर," असें
चहूंकडे बोलले जात होते. बाहेरचे बगळे कशाला ह्या
प्रश्नाकडे डोळे उघडून बघतील ? आणि बोलायला चोंच
उघडतील ? माशांच्या मेजवानीचा घास जोपर्यंत गालांत
आहे, तोपर्यंत कुणीही परका तालांतच राहणार.
जवळचा जो जळे, तो कळवळे.

मी तर म्हणेन हा यक्षप्रश्न तूं सोडवायला हवा होतास.
इतर अनेक महान कार्यें तुझ्या हातून तडीस गेली, तसे हेही
गेले असते. हितचिंतकानी (?) चार दोन दिवस बुभुत्कार
केला असता.

पण भारताच्या कण्यांतला हा मणका
ठुसठुसायचा कायमचा बंद झाला असता.
भाडोत्री हल्लेखोरांत लढण्याची जिद्द नसते. त्यांच्या
आक्रमणांत हुल्लड असते, लुटालुट असते, रक्तपात असतो.
मेलेल्या ढोराला खाण्यासाठी जमलेल्या गिधाडांच्या
तांड्याला एखादा गरुड जरी आकाशात फेऱ्या मारतांना दिसला
तरी त्यांची पांगापांग होते. पण तुझ्यांतल्या द्विजराजानीं
उड्डाण घेतलेच नाहीं. उत्तुंग विचाराच्या पहाडावरून तो
जगाकडे पाहात होता.

मात्र वय उतरूं लागले तसतसे तुला
आपल्या धरसोडी वृत्तीचे परिणाम जाणवूं लागले.
लोकांचे दोषारोप कानी पडूं लागले तसा तुझा मनस्ताप
वाढला. त्या मनस्तापानें तुझ्याजवळ मृत्यूचे प्रायश्चित्त
मागितलें. कारण त्यांत कोटचावधि आत्म्याचा शाप
होता ..... तळतळाट होता.

२४-११-७२

## : ३१ : नायगारा

महाराष्ट्राच्या बाहेर मी फारसा गेलो नाहीं.
भारत-दर्शनाचा माझा संकल्प अजूनहि पार पडलेला नाहीं
मग बाहेरचे जग कुठले ?
ताजमहाल देखील मी पाहिला तो चाळिशीच्या घरांत
नजर क्षितिजावरून पायापाशी येऊं लागते त्या वयांत

पण परवा एका चित्रांत नायगारा पाहिला
नायगारा . . . जगांतील एक निसर्गनिर्मित आश्चर्य
(उत्तुंगतेचें वेड असलेल्या माझ्यासारख्याच्या दृष्टीने)
आकाशाची निळाई प्यालेल्या त्या धुंद धबधब्यांत
मला तुझी झेप दिसली.

ऐन वयांत आत्मसात केलेल्या बुद्धिसामर्थ्यानें
तुझ्या भावनेची उदात्तता उंचावली.
तुझ्या चिंतनशीलतेनें अवघे विश्व दृष्टि-पथांत आले
तरी पण अस्मानाची उंची थिटी वाटणारी तुझी झेप . . .
भारताच्या दरीखोऱ्यांत, शेतांतून, मळ्यांतून
राबणाऱ्या किसानाच्या कल्याणासाठीं होती
दलितांची दुःखे दूर करण्यासाठीं होती
प्रभु रामचंद्राच्या भेटीसाठीं आसावणाऱ्या
भक्तिवेड्या शबरीची भावना जाणण्यासाठी होती.

ती झेप . . . पतितांसाठी पत्करलेलें ते पतन होते . . .
नभाची निळाई प्यालेल्या नायगाऱ्यासारखे.
भारताचे स्वातंत्र्य-स्वप्न सफल करण्याची धुंदी चढलेलें.

त्या नायगाऱ्याच्या पायथ्याशी बसण्याचा योग
माझ्या जीवनांत आला नाहीं पण त्याचे भाव-तुषार
मी अंगावर घेतलेले आहेत. त्यानें माझे अंग . . .
अंतरंग मोहोरले आहे.

२६–११–७२

## : ३२ : ठिणगी

मोतीलालजी लखनौ येथें सरकारच्या जुलमी कारभाराबद्दल
सभेंत भाषण करीत होते:—
" आपल्या बांधवांवर अनन्वित अत्याचार होत
आहेत हे खरे. तरीपण आपले जीवित त्यांच्याच
मुठीत आहे, हे लक्षांत घेऊन वागायला हवे. त्यांच्यावर
अविश्वास दाखवून चालणार नाहीं. पाठीवरले वळ
सहन होत नसले तरी कळ सोसा. "

पिताजीनी धोरणाने घेतलेल्या ह्या राजकारणी
मात्रेच्या वळशांतील कचखाऊ वृत्ति तूं ओळखलीस.
आणि त्याच क्षणी म्हणालास, " प्रश्न आहे ! "
तुझे वडील पट्टीचे वकील. कुणाचाहि विरोध
न मानवणारे
ते कडाडले, " कुणाचा प्रश्न आहे ? "
गर्दीतून पुन्हां तेंच उत्तर.

तुझी निर्भयता त्यांच्या भेदकतेनें पिचली नाहीं
क्षणभर कडाडणाऱ्या विजेच्या झंकारानें
पहाड पेटविणाऱ्या वणव्याची ज्वाला वर्षाऋतूलाहि विझत नाहीं.
हे प्रश्नचिन्ह ही तुझ्या तेजस्वितेची ठिणगी
होतीं.

२५–११–७२

## : ३३ : मनोरथाची सूत्रे

विसाव्या शतकाने भारताला नक्षत्रांच्या तेजाची माणसं
दिली. पहिली दोन दशके देशावर लोकमान्यांचा प्रभाव होता.
तुफान दर्यांत बेडर वृत्तीनें नौका लोटणाऱ्या दुर्दम्य आकांक्षेच्या
त्या झुंजारासाठी जनतेने प्राणाची पंचारति ओंवाळली. याच
काळांत स्वातंत्र्यवीरांची ' ती ' झेप जगांत अमर ठरली.
आणि पुढें . . . ? मावळतीच्या कडेवर उतरलेल्या सूर्याने
अंधारत जाणाऱ्या आपल्या वाटचालीकडे पहावे आणि
त्याला पूर्वदिशेला चंद्रदर्शन घडावे, तसे लोकमान्यांना
गांधीजी दिसले.

गांधीजींच्या प्रभावळींत अनेकजण होते. त्यापैकीं
सुभाषबाबू, वल्लभभाई आणि तूं ह्या त्रयींच्या प्रभावाने
भारतीय जनता भारली गेली होती. सुभाषबाबूंची वृत्ति जहाल.
कोणत्याहि परिस्थितींत मनाला मुरड न घालणारी. चाल
शार्दूलविक्रीडिताची. नेम अचूक आहे की नाहीं याचा
अंदाज न घेतां तीराच्या वेगानें दिगंत छेदणारी. जनतेचे
लक्ष वेधणारी. त्यामुळे प्रदीर्घ चिंतनाने पाउल पुढे
टाकणाऱ्या महात्माजींबरोबर त्यांचे वारंवार खटके उडाले
वल्लभभाईंची प्रकृति पोलादी. भीमटोला हाणणारी.
अहंकाराला लोटांगण घालायला लावणारी. महात्माजींजवळ
तेहि तितकेसे पोहोचूं शकले नाहीत .
त्रिमूर्तीत राहिलास तूं – तुझे व्यक्तिमत्त्व
पित्याच्या राजस राहणींतून आणि सात्त्विक
विचारसरणींतून संस्कारलेले . . .
विविध विषयांच्या वाचनानें विस्तारलेले, . .
विश्वदर्शनानें आकारलेले . . .
हे जाणूनच आश्रमबद्ध आचरणानें

आपले विभूतिमत्त्व सिद्ध करणाऱ्या महात्माजींनी तुला जवळ केले. इतके की बेचाळीसच्या कुरुक्षेत्रांत आपल्या मनोरथाची सूत्रें त्यानी तुझ्या स्वाधीन केली. आणि रामविजयाच्या समाधानाने दशरथासारखे ते तुझ्या मागे राहिले.

महात्मा-प्रणीत स्वातंत्र्य-लढ्याचे नेतृत्व
तुझ्याकडे आले म्हणूनच दिल्ली वैचारिक
दृष्ट्या जगाची गुरुकिल्ली झाली नाहीतर तिचे
रस्ते फिरून रक्तानें रंगले असते.

२२-११ ७२

## : ३४ : ठेवा

हॅरो येथें तुला उच्च शिक्षणासाठी ठेवल्यानंतर
मोतीलालजी यूरोपच्या दौऱ्यावर गेले. तेथून अलाहाबादला
परतण्यापूर्वीं त्यानीं तुला एक अत्यंत हृदयस्पर्शी
पत्र पाठविलें. ते हे :-
" तुझ्या रूपानें या जगांतील आमचा अत्यंत
अनमोल ठेवा आम्हीं ठेवून जात आहोत. याच पिढीतील.
नव्हे, तर यानंतर येणाऱ्या पुढील कितीतरी पिढ्यांतील
तुला इथें ठेवण्यामुळें येणाऱ्या अमाप खर्चाचा प्रश्न
आमच्यापुढें नाहीं. कदाचित तो खर्च माझ्या
एखाद-दुसऱ्या वर्षाचीच मिळकत असेल.
प्रश्न आहे तो तुझ्यांतील आदर्श पुरूष साकारण्याचा. आणि
माझ्या मनोभावनेप्रमाणें तूं तसा होणारच आहेस. तुला
आमच्याजवळ ठेवणे, त्यासाठीं तुझ्या जन्माची तरतूद
म्हणून अमीराचे वैभव मागे ठेवणें, म्हणजे तुला
जगाच्या ज्ञानापासून दूर ठेवणे, हा विचार अत्यंत
स्वार्थी आहे . . . मर्यादित अर्थानें पापी म्हटले
तरी चालेल. तुझ्यावरील माझे प्रेम तुला सोडून
जाईपर्यंत मला जाणवले नव्हते. "
पित्याच्या त्यागाचे योग्य ते मोजमाप
तूं त्यांच्या ओंजळींत टाकलेस. आज तूं तुझ्या
वंशाचा , तुझ्या देशाचा, एवढेंच काय, अखिल विश्वाचा
ठेवा होऊन राहिला आहेस.

२८-११-७२

## : ३५ : ढासळला बंधारा

सेहेचाळीसचे आरमारी बंड.
ज्येत्यांविरुद्ध उद्‌भवलेल्या संघर्षातील भारतीय
असंतोषाचा जवळजवळ अखेरचा तडाखा
संगिनीच्या माऱ्यांना न जुमानणाऱ्या
बेडर भावनांचे तांडव . . .
रुद्राचे एक भीषण अग्निनृत्य.

याच वर्षी दादर येथील एका विद्यालयाच्या पटांगणांत
तुझे भाषण होते.
शिवतीर्थावरहि न सामावणारा तुझा श्रोतृ-समुदाय
त्या मर्यादित जागेंत कसाबसा उभा होता.
कीर्तिकैलासावर उभ्या असलेल्या
आपल्या लाडक्या नेत्यासाठी
त्यांनीं बरोबर आणले होते
फक्त डोळे आणि कान
उत्कंठित मनाला तृप्त करणारी दोन साधने
एक दर्शनासाठीं . . . दुसरे श्रवणासाठीं

दुपारच्या चढत्या उन्हांत तुझे भाषण सुरू झाले.
मनांत आले—एकाच वेळीं भूतलाला प्रकाश देणारे
दोन सूर्य . . . एक चढता . . . दुसरा उतरता
उतरत्या सूर्यानें चढत्या सूर्य-किरणांची
दाहकता कमी केली.
मला तिथे उभे राहवेना
देहापेक्षा मनाने
मी घराची वाट धरली
तुझ्या न ऐकलेल्या भाषणांतील उन्मेष शब्दबद्ध करीत.

" लोक हो !
यापुढें फार वेळ तुम्हांला असें
घ्यासी जिणे जगावे लागणार नाही. भारतीय
जीवनाला परसत्तेनें बांधलेला हा स्वामित्वाचा बंधारा . . .
ह्याला कधीच तडा गेलेला आहे. यांतील पाणी ठिकठिकाणीं
पाझरू लागले आहे. आणखी थोडी कळ सोसा. तहान मारा.
आपोआप हा लोट बांध फोडून दाही-दिशांना
वाहूं लागेल. मग बंधाऱ्याच्या दगड-विटांचा मागमूसहि उरणार
नाही. पाण्याचा धर्म माणुसकीचा आहे. अडवून ठेवणाऱ्याला
ते तुडवून पुढें जाते."

मनांतला प्रक्षोभ ओसरल्यावर मी माझ्या
खोलीच्या एका भिंतीवर पुढील चरण लिहून ठेविले,
"पाझरती जलधारा
आतां, ढासळला बंधारा"

९-११-७२

## : ३५ : ढासळला बंधारा

सेहेचाळीसचे आरमारी बंड.
ज्येत्यांविरुद्ध उद्भवलेल्या संघर्षातील भारतीय
असंतोषाचा जवळजवळ अखेरचा तडाखा
संगिनीच्या माऱ्यांना न जुमानणाऱ्या
बेडर भावनांचे तांडव . . .
रुद्राचे एक भीषण अग्निनृत्य.

याच वर्षी दादर येथील एका विद्यालयाच्या पटांगणांत
तुझे भाषण होते.
शिवतीर्थावरहि न सामावणारा तुझा श्रोतृ-समुदाय
त्या मर्यादित जागेंत कसाबसा उभा होता.
कीर्तिकैलासावर उभ्या असलेल्या
आपल्या लाडक्या नेत्यासाठी
त्यांनीं बरोबर आणले होते
फक्त डोळे आणि कान
उत्कंठित मनाला तृप्त करणारी दोन साधने
एक दर्शनासाठीं . . . दुसरे श्रवणासाठीं

दुपारच्या चढत्या उन्हांत तुझे भाषण सुरू झाले.
मनांत आले–एकाच वेळीं भूतलाला प्रकाश देणारे
दोन सूर्य . . . एक चढता . . . दुसरा उतरता
उतरत्या सूर्यानें चढत्या सूर्य-किरणांची
दाहकता कमी केली.
मला तिथे उभे राहवेना
देहापेक्षा मनाने
मी घराची वाट धरली
तुझ्या न ऐकलेल्या भाषणांतील उन्मेष शब्दबद्ध करीत.

" लोक हो !
यापुढें फार वेळ तुम्हांला असें
प्यासी जिणे जगावे लागणार नाही. भारतीय
जीवनाला परसत्तेनें बांधलेला हा स्वामित्वाचा बंधारा . . .
ह्याला कधीच तडा गेलेला आहे. यांतील पाणी ठिकठिकाणीं
पाझरू लागले आहे. आणखी थोडी कळ सोसा. तहान मारा.
आपोआप हा लोट बांध फोडून दाही-दिशांना
वाहूं लागेल. मग बंधाऱ्याच्या दगड-विटांचा मागमूसहि उरणार
नाही. पाण्याचा धर्म माणुसकीचा आहे. अडवून ठेवणाऱ्याला
ते तुडवून पुढें जाते. "

मनांतला प्रक्षोभ ओसरल्यावर मी माझ्या
खोलीच्या एका भिंतीवर पुढील चरण लिहून ठेविले,
" पाझरती जलधारा
आतां, ढासळला बंधारा "

९-११-७२

## : ३६ : प्रभाव

महात्माजींच्या आदर्श जीवनाचे अनुकरण करायचे
म्हणजे साऱ्या ऐहिक सुखांचा त्याग करायचा. अशा त्यागमय
जीवन जगण्यानें, इंग्रजी मालावर बहिष्कार घालण्यानें आणि
सत्ताधाऱ्यांशी सर्व प्रकारे असहकार पुकारल्यानें ब्रिटीशांना
आपल्याला स्वराज्य देणें भाग पडेल, असा त्यांचा विश्वास
होता. एवढेच नव्हे, तर त्यांचे अनुयायित्व स्वीकारणाऱ्याला अशी
शपथ घ्यावी लागे कीं माझी साधना सत्याला
स्मरून असेल आणि ध्येयाला धरून असेल.

१९२० सालच्या काहीं वर्षें आधी गांधीजी
तुमच्याकडे आले होते. तूं, तुझे पिताजी आणि ते . . . तुम्हां
तिघांत स्वातंत्र्यविषयक प्रश्नांची सडेतोड चर्चा झाली. अखेरीस–
तुझे पिताजी समंजसपणें म्हणाले, " तुम्ही माझ्या मुलाला घेऊनस
जाताच आहांत. पण कोर्टात माझी वकिली चांगली
चालली आहे. मला जर तुम्हीं ती तशीच चालवायला अनुमति
देणार असाल तर तुमच्या कार्यासाठीं मी अलोट संपत्ती
ओतीन."
क्षणाचाही विचार न करतां महात्माजी म्हणाले,
"मला तुमचें धन नको, मन हवे. तुमचेच नव्हे, तर
तुमच्याबरोबर साऱ्या नेहरू कुटुंबियांचे."

त्यानंतर लौकरच तुम्ही सारे आनंदभवनवासी
आश्रमवासी झालांत. गंगा साबरमतींत विलीन झाली.
गांधीजींच्या साधुत्वाचा केव्हढा हा प्रभाव !

२९–११–७२

## : ३७ : मुक्या जीवांच्या सानिध्यात

वर्षानुवर्षे तुरुंगांत राहणाऱ्यांचा एकांत मुक्या
प्राण्यांच्या संगतींत सुसह्य होतो. डेहराडूनच्या तुरुंगांतील
जीवन मी मुक्या प्राण्यांच्या संगतीत
घालविले. त्यांच्यात नि माझ्यांत एक प्रकारची कौटुंबिक
भावना जागी झाली होती. तुरुंगांतील भिंतीचे
पापुद्रे, जमिनीवरील खळगे वाळवीने
खाल्लेली छपरे आणि खिडक्यांची दारे माझ्या तशी
पूर्व परिचयाची होती.

तशीच कोपऱ्याकोपऱ्यांत गांधीलमाशांची
घरटी होती, पालींचे थवे होते. संध्याकाळ झाली
कीं ह्या पाली आपल्या भक्ष्याच्या शोधार्थ बाहेर पडत.
ढेकूण, मच्छर, पिसवा आणि माशा या रक्तपित्यांशी
तर मला उघडउघड युद्धच करावे लागे. पाकोळ्या
मला आवडत नसत. पण वाढत्या अंधाराबरोबरची
त्यांची फडफड मला सहन करावी लागे.

समोरच्या बागेंत खारी मात्र बागडतांना
दिसत. मी माझ्या वाचनांत दंग असलो कीं त्या निर्भयपणें
माझ्या अंगाखांद्यावर खेळत. कबूतरांची कितीतरी
युगुलें वळचणीला अनुनयांत रंगून गेलेली
दिसत.

माझ्या बराकीच्या बाहेरच्या बाजूला वरच्या
अंगाला एका राघूमैनेनें आपला प्रपंचच थाटला
होता. त्यांच्या-माझ्यांत इतका जिव्हाळा निर्माण
झाला होता कीं सकाळ संध्याकाळच्या खाण्याच्या
वेळीं तीं हक्कानें माझ्या ताटांतील घास मागत.
कोकिल आपल्या शोकपूर्ण आलापांत

मला वसंत ऋतूचे स्मरण करून देई.

बरेचसे पक्षी मला चार
भिंतीआडून दिसत नसत. पण आरोहावरोहांतील त्यांचे
तारस्वर कानीं पडत तेव्हां मन उल्हसित
होई. क्वचित् एखादा गरुड आपल्या पंखांच्या
लयपूर्ण हालचालीनें आकाशाला रेखांकित करीत
जाई. कधी रानबदकांचे थवे देखील
डोक्यावरून भरारत.

समोरच्या डोंगरांच्या उतरणीवरून वानरांची सेना काहीं
खायलाप्यायला मिळेल या हेतूनें
तुरुंगाच्या दिशेने येतांना दिसे.

पण या सर्वांपेक्षा विंचू, साप आणि
घोणी आमच्या आसपास सर्रास वावरायच्या.
ते प्राणी महाभयंकर . . . जिवाला अपाय करणारे.

दीर्घ मुदतीच्या कैद्यांना तुरुंगातील एकांत
असह्य होतो. मग खारी, मुंगुसांसारख्या सहज
माणसाळणाऱ्या प्राण्यांच्या संगतींत ते मन रंगवितात.

तुरुंगांच्या परिसरांत वावरणाऱ्या ह्या
मुक्या-जीवांच्या सान्निध्यात माझ्या जडावलेल्या पापण्यांत
चैतन्य आले.

६-२-७३

## : ३८ : माउली झाली रणरागिणी

बत्तीस सालची चार जानेवारी.
दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा होऊन
तुला नैनीच्या तुरुंगांत ठेविले होते.
त्याच दिवशीं महात्माजी आणि वल्लभभाई
पकडले गेले.
मागोमाग ठिकठिकाणच्या हज्जारोंची तुरुंगाच्या
दारांत रवानगी झाली.

प्रपंचांत रंगलेल्या भारतीय स्त्रिया उंबरठ्याबाहेर आल्या.
'हरताळ . . . बहिष्कार . . . असहकार . . . लाठीमार' हे
पुरुषार्थी घोषणेंतून गति घेणारे पोलादी शब्द स्त्रियांच्या
कंठांतून प्रासबद्ध होऊन ललकारू लागले.
मंजुळ बोलणाऱ्या साळुंक्या
पंखांतील पिसें बाणासारख्या फेकणाऱ्या सायली
झाल्या.

अशा घटकेला तुझी आई . . . स्वरूपराणी . . .
अंगणांतून रणांगणात आली.
उंचावलेल्या ध्वनियंत्रासमोर ती उभी राहताच
श्रोत्यांतील कल्लोळ शांत होई . . . थिजून जाई.
ते एक अपूर्व दृश्य होते.
सुखासीनतेंत वाढलेली सनातनी मनोवृत्तीची
एक कृशांगी रणरागिणी झाली होती.
विसाव्या शतकानें हे पाहिले नव्हते.
तिच्या भावनेच्या ज्वालेंतून उडालेल्या क्रांतिकारक
विचारांच्या ठिणग्यांनी वातावरण तडतडूं लागले . . .
पेटूं लागले.
जमावातील कुणीतरी एक म्हणाले,

मराठी ग्रंथ संग्रहालय ... १८६० ... शाखा (स्थल

" माउली झाली रणरागिणी "
नंतर कितीतरींनी त्याला साथ दिली.
त्यानंतर सारा भारतच गाऊं लागला.

भारतीय युद्धांतील स्वातंत्र्य–पर्वातील
तुमच्या समर्पणाचा हा सर्ग जेव्हां गायिला
जाईल तेव्हां अलाहाबादेवरून वाहणाऱ्या
गंगा–प्रवाहांत देवदेवताहि आपले आनंदाश्रू
ढाळतील.

१–१२–७२

## : ३९ : का होय कलंकित ?

कुठेतरी कोनांत मनाच्या
उणीव असते एकच डंखित
" परतुनि येतां पिंजुनि वादळ
कुणी असावी 'तसली' अंकित

हा अपुला पुरुषार्थ कुणातरि
ललितेच्या नेत्रांत तरावा
जीवनांतला उदात्त आशय
कंठांतुनि तिचिया लहरावा "

विश्व-विजेता नाहीं सुटला
'सह'वासाच्या संवादातुनि
'तूंहि त्यांतला' कुणि म्हटले तर
मी नच त्यांत उणेपण मानी

नियतीने विस्कटले होते
कधींच कमल-दलांचे घरटे
विरलेल्या काश्मिरी शालिची
मागे उरली होती तरटें

तुझिया माथ्यावरती होते
निरंत कललेले मेघालय
पेलिलास आमरण भार, जरि
परिश्रमानें थकलेले वय

असेल कुणि जर आले जवळी
उजळाया काजळत्या घटका
तितुक्यानें कां होय कलंकित ?
अमर यशाचा तव जरिपटवा

४–१२–७२

## : ४० : विरे जन्माचे नातें

दोन मनस्वी पुढारी आपल्या मतांची बिरुदे लावून राजकारणाच्या
आखाड्यात उतरले कीं त्यांच्या नात्यांत किती कटुता निर्माण
होते; याचे माझ्या डोळ्यांपुढील उदाहरण म्हणजे तूं आणि सुभाषबाबू.
सुभाष . . . एकपक्षीय राज्यकारभाराचा पुरस्कर्ता. त्यांची तडफ
विलक्षण . . . आत्मबलावर त्याने सारा भारत हलविला. 'आझाद
हिंद फौज' स्थापन केली आणि 'जयहिंद' या घोषणेनें भूगोलाला
हादरा दिला.

तूंहि तितक्याच तोलामोलाचा.
पण महात्म्याच्या वरदहस्तानें तुझ्या दृष्टींत दूरदर्शित्व आले होते.
आततायीपणानें आपण काहीं केलें तर गुलामगिरींत
अधिकच जखडले जाऊ असे तुझे म्हणणे होते.
पण सुभाषबाबूंविरुद्ध लढविलेल्या निवडणुकींत तूं
हरलास, कारण भारतीय मनावरील गांधीजींच्या नेतृत्वाची
पकड सैल झाली होती.

संघर्षातून निर्माण झालेली ही कटुता तुमच्या
पोटांत होती. त्यामुळें तुम्हीं अखेरपर्यंत जवळ आला नाहीत.
तूं ती कटुता ओठावर येऊं दिली नाहींस
हा तुझा संयम होता. काहींच्या मतें ते तुझे धोरण होते.
पण जाणणारे जाणत होते. मला वाटते व्यवहारांत
काय नि राजकारणांत काय–
कधीं कधीं
"घडूं नये ते घडून जाते
आणि विरे जन्माचे नाते"

५–१२–७२

## : ४१ : आजीचे भाकित

तुझी आजी इंद्राणी अत्यंत कडक आणि अभिमानी स्त्री
होती . . . नागिणीसारखी फूत्कारत ती अंगावर यायची.
एका लग्न समारंभात कांहीं स्त्रिया तिच्या मुलांबद्दल
तुच्छतापूर्वक बोलतांना तिने ऐकल्या, तेव्हां ती ताडकन्
म्हणाली, " चंद्रसूर्यावर थुंकल्यावर काय होतं माहीत आहे

मोतीलालजींखेरीज सारेजण तिच्या समोर
उभे राहायला टरकत. त्यांच्या हरएक बाबीत
ती लक्ष घाली . . . अगदीं त्यांना संताप येईपर्यंत.
लहानपणापासून त्यांचा स्वभाव कडक . . . कुणाच्या
कह्यांत न राहणारा . . . वेळी अवेळी उफाळून येणारा.
नेहरू कुटुंबाचा तो एक विशेष धर्म आहे.

एकदां तुमच्या कुटुंबियांच्या स्नेह्यांनीं
तिला सांगितले, " आई, मोतीच्या दांडगाईला
जरा आवर घाला. त्याला शिस्तीत ठेवला
नाहींत, तर त्याचा फार विपरीत परिणाम होईल.

निमिषांत ती पेटली, म्हणाली. " माझ्या मोतीच्या
वागण्याला लगाम ? त्याला शिस्तींत ठेवायचा म्हणजे वादळी वाऱ्याला
मुठींत ठेवण्यासारखे आहे. त्याला आवरू पाहणे म्हणजे मेघांच्या
गडगडाटाने नि विजांच्या कडकडाटानें कांनात शिरू
नये म्हणण्यासारखे आहे. ह्या साऱ्यांचे तेज माझ्या
मोतीच्या वृत्तींत आहे. तो कह्यांत राहणें महाकठीण.
पण जेव्हां तो मोठा होईल तेव्हां लोक त्याचे पाय
धरतील. त्याचा गौरव करतील ."

आणि पुढे आजी म्हणाली तसंच झालं.
सात्त्विक वृत्तीच्या म्हाताऱ्या माणसांच्या तापदग्ध
मनांतून उफाळून आलेले बोल अनेकदां खरे ठरतात.

५-१२-७२

## : ४२ : विषारी विळखा

तुझ्या मनावर ज्या काहीं चारदोन माणसांच्या व्यक्तिमत्त्वाचा
पगडा होता, त्यापैकीं कृष्ण मेनन एक होते. त्यांच्या स्नेहाची
पकड . . . पकड कसली ? मनाला सुन्न करणारा तो एक विषारी
विळखाच होता. दूरच्यांना न उमजणारा होता.
पण खरं पहायला गेलं तर तो स्नेह इतका साकलेला
असायला कारण होतं.
तुमचे दोघांचे शिक्षण इंग्लंडमध्यें झालेलें. तुमची स्वभाववैशिष्टये
वेगळी असून देखील तुमच्या काव्यशास्त्रविनोदाचें माध्यम
एकच . . इंग्रजी होते. तुझ्या व्यक्तिमत्वाची जाण असलेला
इतका उत्तम श्रोता तुझ्या मित्रांच्या वर्तुळांत नव्हता.
शिवाय लंडनसारख्या शहरांत कमीत कमी वेतनावर
भारतासाठी इतका श्रमणारा
पुरुष म्हणूनहि तुला त्याची किंमत वाटली.
केवळ मैत्रीखातर तूं त्यांना त्यांच्या योग्यतेपेक्षां
मोठ्या ज गेवर नेमलेस. त्याचा फायदा त्यानीं उठविला हा
तुझा दोष नव्हे. भक्तीला रक्तदोष दिसत नाहींत.
असेल तर तुझा दोष हा कीं इतकी जवळीक
असून देखील तुला त्यांच्या मनाची वक्रता दिसली नाहीं.

चीनच्या आक्रमणाचा लाल कंदील त्यानीं
तुझ्या नजरेंत आणून द्यायला हवा होता. दुसऱ्यावरी विश्वासून
राहणाऱ्याचा कार्यभाग बुडतो हें खरे असेल. पण तूं त्यांना
मित्र मानल्यावर कर्तव्य म्हणून तरी चीनच्या कृष्ण-
कारस्थानाची खबर त्यानीं तुला द्यायला हवी होती.
तुला अखेरपर्यंत असें अंधारांत ठेवायला नको होते.
कारण त्यांचेहि तुझ्यावर तितकेच प्रेम होते. (असे निदान
दिसले तरी)

कृष्ण मेनन रंगाने काळे, शरिरानें काटकुळे
वृत्तीनें कठोर आणि दिसायला उग्र आहेत तरीपण
एक विद्याव्यासंगी व्यक्ति म्हणून त्यांचा गौरव
होत आहे. कांहीना त्यांचे संभाषण-चातुर्य आवडते.
तर दुसऱ्या कांहीना ते उदास आणि दुष्ट दिसतात.
कांहीहि असलें तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वांत जादू
असल्याशिवाय कांही तूं त्यांच्या आहारीं गेला
नाहींस हे खास.
तुमच्या या गाढ प्रेमांत जनतेला काहीतरी
गूढ असावंसं वाटलं. आणि वाटलं तर त्यांत कांही
वावगं नाहीं. सर्व बाजू दिसत असून देखील आंत काय
चाललं आहे, हें जिथें समजत नाहीं तिथे जगाला कांहीतरी

गौड बंगाल असं वाटणारच.
अगदीं लोकसभेतून आमदारांनीं "चालते व्हा"
ची घोषणा करीपर्यंत तूं त्यांना साथ दिलीस हे लोकांना
आवडलं नाहीं.
अजूनहि लोक म्हणतात कीं तुझा त्यांच्याशी
असलेला स्नेह हा एक तुझ्या काळजाला दंश करणारा
कृष्णसर्पाचा विषारी विळखा होता.

५-१२-७२

## : ४३ : निर्भय रहा !

गांधीजींची युद्धनीति सर्वस्वी वेगळी होती
सत्याग्रह हें तिचे अधिष्ठान होते
सत्याच्या कोनांतून मुक्त होण्यासाठीं
धरलेला आग्रह तो सत्याग्रह
पण ह्या शब्दश: अर्थापलीकडे गांधीजींच्या
सत्याग्रह ह्या शब्दांत दीर्घ तपश्चर्येंतून उफाळलेले
तेज होते.

सौजन्यशील वृत्तीनें करावयाच्या कायदेभंगासाठीं
सत्याग्रही कमालीचा सहनशील असावा लागतो.
त्यासाठीं तयारी हवी ती मरण पत्करण्याची . . .
मारणाऱ्याला सूड बुद्धीनें मारण्याची नव्हे

प्रतिस्पर्धी जो आघात करील तो हांसत पेलणे
पण प्राण जाईपर्यंत माघार न घेणें
ही सत्याग्रहाची सूक्तें गांधीजींनी प्रथम
दक्षिण आफ्रिकेत प्रयोगांत आणली.

तिथ त्यांनी मिळविलेल्या यशानें जगांत त्यांची वाहवा झाली
ज्यांच्याविरुद्ध तो लढा होता त्या ब्रिटिशांकडून देखील.
गांधीजी भारतात आले ते जगप्रसिद्ध व्यक्ति म्हणून
लखनौच्या अधिवेशनांत त्यांचा जयजयकार झाला त्यानें
तर तूं चैतन्यमय झालास.

त्यानीं दाखविलेला मार्ग म्हणजे अंधाराला भेदीत जाणारा
प्रकाशाचा झोत होता. युद्ध परंपरेतील सर्व साधनें
पिंजणारे ते एक अस्त्र होते.

गांधीजींचे विभूतीमत्त्व गंगेसारख वरून
खाली आलें नाहीं, तर ते कोटचावधि दलितांच्या आशा-
आकांक्षातून उफाळून वर आले. जेत्यांच्या जुलुमानें पिचलेल्या
भारतीयांना त्यांनीं धीर दिला तो ह्या शब्दांत, " निर्भय
रहा !"

ांधीजींना संमत असलेली ही निर्भयता फक्त
तुझ्यांत होती. जिवावर उदार झाल्याशिवाय ती अंगीं
बाणत नाही.

६-१२-७२

## : ४४ : माझ्या भाली कुंकू

( अमेरिकेंतील एका विराट सभेंत पंडितजींच्या मनांत आलेले विचार )

या तुमच्या देशांत आजवर कितीकदा मी आलो
परी हरघडी उत्कट सौहार्दानें भारुनि गेलो
येथिल हें सौभाग्य लाविते माझ्या भाली कुंकू
जगा दर्शवी, "अशीच जनता मांगल्याने जिंकू"

कुणाच्याहि नजरेंत भरावे उज्जल यश तुमचे हें
भगिरथ-यत्नें पदि तुमच्या ही कांचन-गंगा वाहे
मनोमनीं उमलून सदिच्छा जोवरि राहूं स्नेही
तोवरती हा माझा भारत आणिक मी न विदेही

११-१२-७२

## :४५: वळवाच्या सरिपरि वर्षावे

'If I get angry sometimes I calm down quickly, for my anger is not with individuals but due to some incident When the incident passes off, my anger also vanishes.'

कधि कसलेही कारण नसतां
सुटे मनाचा तोल
कळे चूक, ओशाळुनि होतो
माझा मीच अबोल

कुठल्यातरि घटनेंत गुंतले
मन असतां एकाकी
गर्दी गोंधळ गडबड बघुनी
ढळे तयाची शांती

आणि त्रासुनी कुणावरि तरी
उगाच ते रागावे
हातिं मिळे ते उचलुनि त्याच्या
प्रतिकाराला धावे

वळवाच्या सरिपरि वर्षावे
जरि उरिचा आवेग
दुभंगल्या धरतीची भरुनी
क्षणात येई भेग

११-१२-७२

## : ४६ : संकल्प इथें मोहरले

हें आनंदभुवन
पित्याच्या परिश्रमानें उभारलेल्या ह्या प्रासादतुल्य वास्तूभोवतीं
तुझे मन अखेरपर्यंत प्रदक्षिणा घालीत होते
इथें तुझे बाल्य लहरले . . . स्वप्नानीं मोहरलें . . . आणि दिगंतात
भरारले . . . वृक्ष-लतांबरोबर हितगूज करीत वाऱ्यावर स्वार होणाऱ्या
खारीसारखे
इथें भारतीय स्वातंत्र्यासाठीं भरलेल्या बैठकींत नेत्यांचे वाद-संवाद
तुझ्या कानीं पडले. त्या विचारानीं तुझ्या मनोभूमीचा कस वाढला.
इथें गुरुजींच्या मार्गदर्शनाखालीं चढत्या जाणिवेचा पहिल्या
सोळा वर्षापर्यंतचा तुझा काळ अभ्यासिकेंत गेला.
इथें ॲनी बेझंट् यानीं तुला ब्रह्मविद्येचा पाठ दिला.
पूर्वेचें वळण घेतलेल्या तुझ्या पावलानी पश्चिमेकडे प्रयाण
केले ते याच उंबरठ्यांतून. सनातनी वृत्तीने व्रत वैकल्यें
आचरणाऱ्या तुझ्या मातेनें पुत्र-विरहाची सात वर्षें कशी कंठिली
असतील ते हाच उंबरठा जाणे.
गांधीजींच्या विचार-प्रभावानें भारावलेला तूं ..... बाहेर
पडलास तो येथूनच. तुझ्यामागून सारेजण बाहेर आले.
आणि मग ह्या आनंद भवनाला दंडकारण्यांतील भूत ( ! )
बंगल्याची ओसाड कुरूपता आली.
राजकीय शिक्षेंत तुम्हीं पिता पुत्रानीं नाकारलेल्या दंडाची
किंमत वसूल करण्यासाठीं जेव्हां पोलीस अधिकाऱ्यानीं
इथला गालिचा उचलला, तेव्हां तुझी ( तेव्हांची ) चार
वर्षांची इंदिरा चंडिकेसारखी त्यांच्या अंगावर धावून
गेली आणि पाय आपटीत म्हणाली, " येथली कोणतीहि चीज
दंडाच्या दसपट मोलाची आहे. समजलात ? "
आठ-दहा वर्षांच्या अवधींत वडील, पत्नी आणि माता
निघून गेल्यावर ह्या वास्तूवरील तुझें मन उडाले. कृष्णाला

लिहिलेल्या पत्रांत तूं लिहिले आहेस, " इथें आतां मला परक्यासारखे वाटते . . . माझ्याच घरांत मी पाहुणा असल्यासारखे."
त्यानंतरची तुझी दोन तपें दिल्लीत विश्व-संगीताच्या रागदारींत गेली. त्या मैफलींत तूं भारत-भूषण म्हणून गायिलास. आणि एकच राग आळविलास.
तो म्हणजे विश्व-कल्याण.
त्या स्वर-विलासाच्या तंद्रींत मात्र तुला आनंद भवनांतील स्मृतींचा विसर पडला असावा. गगन-विहारी पांखरांचं असंच आहे. एकदां कां डोळ्यांत अस्मान तरंगू लागलं कीं त्यांची फांदीवरली पकड सैल होते . . . सुटते. तूं तर काय ? व्दिजराज. युद्धसंघर्षानें रक्त-लांछित झालेल्या जगाला पुनर्जीवन देण्यासाठीं तुला अमृत-कलश आणायचा होता. तो आणायला म्हणून तूं गेलास, तो परतलास नाहींस.
जगाला अजूनहि तुझ्या त्या निवास-स्थानाची ओढ आहे.
इतर इमारतींसारखे ते कांही दगडविटांचे अगर चुन्या-मातीचें शिल्प नाहीं. त्याच्या दालनादालनांतून नेहरू कुटुंबांतील तीन पिढ्यांच्या मोहरलेल्या संकल्पाचा मोहर दरवळतो आहे.

११-१२-७२

## : ४७ : छळांतून आत्मबळ वाढते

स्वातंत्र्य संग्रामांतील घटनांपैकीं तुझ्या मनावर चिरंतन परिणाम करणारी कोणती घटना असेल, तर ती नाभा संस्थानांत झालेल्या अपमानाची. नाभा हे त्यावेळीं शीख अधिपत्याखाली असलेलें संस्थान. १९२३ मध्यें ब्रिटीशांविरुद्ध चाललेल्या निदर्शनाची पहाणी करण्यासाठीं दोन सहकाऱ्यांबरोबर तुला आमंत्रण केले होते.

त्या प्रसंगी तुम्हांला अटक झाली. एवढेच नव्हे
तर बेडया घालून अमानुषपणें रस्त्यांतून रांगत नेण्यांत आले. धिंडच म्हणायची ती. याहिपेक्षां अपमानास्पद वागणूक म्हणजे तुम्हांला अत्यंत गलिच्छ . . . घुशी वावरतात अशा गोठ्यांत ठेवण्यांत आले.

परिणामीं तूं विषमज्वरानें बरेच दिवस आजारी पडलास. पण त्याची किंमत तुला मिळाली. तुझे मन पूर्वीपेक्षां शांत आणि निर्मळ झाले. आयुष्यांत अनुभूतीच्या चढणी चढण्यास पायांत शक्ति यावी म्हणून मनाला यातना देणाऱ्या अशा घटना घडाव्या लागतात,

देहांत छळ मुरल्याशिवाय आत्मबळ वाढत नाहीं.

१४–१२–७२

## : ४८ : मनोगतांतील वीज

( बुद्धमूर्तीपुढील स्वगत )

" काळाच्या किनाऱ्यावर शतकांच्या लहरीमागून
लहरी फुटत आहेत . . . विरत आहेत
तरीपण तूं आमच्यापासून फारसा दूर
गेलेला नाहींस.
लेण्यांतून प्रतिध्वनीत होणारा तुझा तो
धीर गंभीर आवाज . . . तूं कुठें तरी जवळच
बोलत असल्यासारखा वाटतो आहेस
ते नादब्रह्म सांगते आहे –
" संकटाला सामोरे व्हा ! अचल मनोधैर्यानें
त्याच्याशीं सामना करा. जीवनांत याहून महान
संधि कशी येईल, तिच्यावर स्वार होऊन आपली
प्रगति कशी करतां येईल, हे पहा !
पंचवीस वर्षांपूर्वीं बंदीशाळेंत असतांना
तुझ्या दर्शनानेच मी स्थिर-चित्त राहूं शकलो. "

तुझे जीवन अशा मनोगतानीं भरलेलें
आहे. अवकाशाच्या कुशींत सामावलेली ही
विचारांची वीज वर्षानुवर्षें काळाचे जीवन-चक्र
चालवील.

१२–१२–७२

## : ४९ : सत्तावनची स्मृति

आंतल्या आवाजाच्या हुंकाराने प्रेरीत होऊन
गांधीजींनी परकीय सत्तेविरुद्ध जे जे
लढे दिले त्यांत तीसच्या लढ्याचा त्यांच्या
अनुयायांवर चिरस्मरणीय परिणाम झाला.
पेशावर येथें तर मोठी नाट्यपूर्ण घटना घडली.
पेशावर ही उत्तर प्रदेशाची राजधानी.
रणशूर पठाणांच्या टोळींचे माहेरघर.
आशियांतून भारतांत प्रवेश करण्याची पायवाट.
खैबर खिंड ... पांच दिवस खुदाई खिजमतदारांच्या
नेतृत्वाखाली ... होती.
सरहद्द गांधी म्हणून पुढें ओळखले गेलेले
खान अबदुल् गफारखान पहाडाप्रमाणे
त्यांच्यामागे उभे होते.
या प्रसंगीं ब्रिटीश पलटणीनीं निःशस्त्र सत्याग्रहींवर
गोळ्या झाडण्याचे नाकारले हे विशेष.
सत्तावनच्या बंडाची स्मृति उजळणारी
ही घटना.
नैनीच्या तुरुंगांत ती बातमी ऐकून
तुझी संघर्षप्रिय मनोवृत्ति उफाळून आली

१६-१२-७२

## : ५० : विजय आणि वेदना

एकोणीसशें सत्तेचाळीस साल
तुझ्या जीवनांत आणि भारताच्या क्रांतिकारक इतिहासांत
अत्यंत महत्त्वाचे होते
दोघांच्या दृष्टीनें संमिश्र भाग्याचे होते.
स्वातंत्र्याबरोबर तुझ्या हातीं अधिकार-सूत्रें
आली खरी
पण त्याच बरोबर पशुतुल्य जातीय संघर्षांत
लाखो निरपराध जीव प्राणाला मुकले
त्याहून कितीतरी कुटुंबियांना घरदार, शेतीवाडी
सोडून मिळेल ते हातीं घेऊन हद्दपार व्हावे लागले.
स्वातंत्र्याच्या बेहोषीची तीव्रता देशाच्या विभाजनामुळें
कमी झाली
महान विजयाचा तो क्षण तितक्याच
महान पराजयाचा होता
सत्तांतरानंतर काश्मीवरील वारशाबद्दल संघर्ष
सुरू झाला.
त्यानंतर महात्माजींचा मृत्यु.
तुझ्या राजकीय जीवनांत प्रथमच तूं एकाकी झालास
तुझ्या मनाला पोरकेपण आले
परंतु तुला आणीबाणीच्या पर्वतप्राय प्रसंगांतून भारताचे
सारथ्य करावयाचे होते.
भावी काळांत एकामागून एक घडणाऱ्या घटनांची
कुणालाच कल्पना नव्हती.
तुझे मन मिळालेल्या विजयांनीं फुललेलें होते
तसें विभाजनाच्या वेदनांनी विव्हळलेलें होते

२७-१२-७२

## : ५१ : अखेरची मानवंदना

महात्माजी तुला गुरुस्थानी.
रूढीनुसार दहन-संस्काराच्या वेळी
त्यांना अखेरची मानवंदना देतांना तूं म्हणालास,
" एक व्यक्ति म्हणून आणि भारतीय शासन - यंत्रणेचा
एक प्रमुख म्हणून मला बोलायला शरम वाटते कीं
आपणासाठीं असलेला हा मोलाचा ठेवा जतन करणे
आपणाला अशक्य ठरले.
आतां त्यांची प्रशंसा करायला शब्द कमी पडतात.
त्यांच्या मनाचा व्यास मापायला आपल्यापाशी मानदंड
नाहीं.
तुमच्या आमच्या वृत्तीचा कुंभ ज्या मृत्तिकेंतून
घडविला गेला आहे, त्याहून त्यांच्या कुंभाची मृत्तिका
वेगळी होती.
आज तेजाने आपल्याकडे पाठ फिरविली आहे.
ज्या सूर्याने आपल्याला ऊब दिली, आपले जीवन
दीप्तिमान केले, तो मावळलेला आहे. आपलें अस्तित्व
आतां अंधारलेलें आहे. गत गोष्टीचा शोक
करणे हा सर्वसाधारण मानवी-स्वभाव आहे. आपल्या
राष्ट्रपित्यास आपण विसरणें शक्य नाहीं. परंतु
आपण केवळ शोकच करीत बसलों तर त्यांच्या
आत्म्याला ते आवडणार नाहीं. तेव्हां त्यांच्या वृत्तीला
शोभणारे सुपुत्र म्हणून आपण जगूं या ! "

२८-१२-७२

## : ५२ : अतूट नातें

लॉर्ड माऊंट बॅटनचा सहवास आणि स्नेह ही तुझ्या जीवनांतील
एक उल्लेखनीय बाब होती.
परस्परांच्या लोकप्रियतेंत आणि मनस्वास्थ्यांत भर घालणारा
तो एक अतूट पाश होता.
ती मैत्री अनेक धाग्यांनीं गुंफलेली होती.
त्यांतील काहीं धाग्यांचा पीळ अनाकलनीय होता.
त्याचे पहिले आणि प्रबळ कारण म्हणजे दोन समान
व्यक्तिमत्वांतील परस्पराबद्दल वाटणारी ती ओढ होती.
तुम्हीं दोघेहि स्वाभिमानी,
तुमची दोघांचीहि मनें पाश्चात्य विचारवैभवाने
संस्कारलेली.
दोघांचेहि जीवन अमीरी सुखांत साकारलेले.
दोघेहि कृतिशील ... जनतेशी आंतरिक प्रेमाने बांधलेलें
... तरीपण दिमाखांत वावरणारे.
परंतु तूं अधिक भावनाप्रधान. म्हणून सतत द्विधा
मनोवृत्तीनें लहरलेला आणि माउंटबॅटन स्वतःच्या
कर्तबगारीवर विश्वास असलेला
तुझी वृत्ति पाऱ्यासारखी चंचल . . . तो सदैव शांत मनोवृत्तीचा
तुझे मन उमदे . . . विशाल . . . व्यक्तिमत्त्व कारुण्याने भारलेले.
तुझी दृष्टि दिगंतरस्पर्शी . . . तुझी नीतीची कल्पना अधिक
स्पष्ट. आपापसांतील मतभेद तुम्ही समंजसपणे दूर
केलेत.
तुमच्या जीवन-विषयक कल्पना देखील एकमेकांना
जवळ आणणाऱ्या होत्या.
तुझा विज्ञानाकडे असलेला कल
तुझे धर्मातीत आचार-विचार
तुझ्या कल्याणकारी योजना

यामुळ तुझ्या दुसऱ्या कोणत्याहि सहकाऱ्यापेक्षां
त्यांचे तुला सहानुभूतीपूर्वक सहकार्य लाभले.
शिवाय तुम्ही दोघेहि आपला उमरावी दर्जा विसरून
वागत असल्यामुळे परस्पर विचार विनिमयासाठीं
एकत्र येऊ शकला. भारताला स्वातंत्र्य मिळवून
देण्यासाठी त्या स्नेहाचें विशेष सहाय्य झाल्यामुळें
तर तुम्हीं मनानें अधिक जवळ आलात.
माऊंटबॅटन यांना आपल्या ऐतिहासिक
स्थानाची पूर्ण कल्पना असल्यामुळें प्रत्येक
पेच-प्रसंग त्यानीं मोठ्या कौशल्यानें हाताळला.
माणूस ओळखण्यासाठीं लागणारी अंतरदृष्टि जशी
त्यांच्यांत होती तसेंच आपल्या प्रभावानें दुसऱ्याचें
मन वळविण्याची किमयाहि होती.
भारतीय क्रांतीच्या वादळलेल्या परिस्थितींत देखील
त्यांची वृत्ति अचल आणि शांत होती.
अधिकारी वर्गांत सहसा न आढळणाऱ्या गुणसमुच्चयामुळे
सर्व सामान्य भारतीय मन त्यांच्याकडे ओढले गेले.
असा उमदा अधिकारी तुझ्या आयुष्यांत आल्यामुळें
राजकीय पेंच-प्रसंगानें पिचलेल्या तुझ्या
मनाला दिलासा मिळाला. तुझ्या एकाकी जीवनांतील शल्यें
त्यानें अनेक प्रकारें भरून काढली.
तुला लाभलेलें त्यांचे कौटुंबिक सख्य देखील
स्वातंत्र्य प्राप्तीनंतर . . . मरणाच्या अगदी अखेरच्या
क्षणापर्यंत टिकले.
इतिहासाला तुमच्या ह्या अतूट नात्याची नोंद
करावी लागेल.

३०–१२–७२

## :५३ : ममैव सारे

प्रशासकाचे कर्तव्य तुला तितकेसे योग्य तऱ्हेनें
बजावता आलेलें दिसत नाहीं
पहायला गेलं तर प्रमाणापलीकडे तुझ्या हातांत
सत्ता होती.
सारे निर्णय तुझ्या मुठींत होते.
परंतु मंत्रिमंडळांतील कामाचे वाटप योग्य
प्रमाणांत करायला लागणारें दूरदर्शित्व आणि
मनाचा समतोलपणा . . . . हे दोन्हीं विशेष
तुझ्यात नव्हते.
शिवाय एखाद्या कार्यक्षम व्यक्तीकडे ते काम
सोपविण्याकडे तुझ्या मनाचा कल नव्हता.
त्यामुळें तुझ्या दीर्घकालीन
गैरहजेरींत अनेक महत्वाच्या बाबींचा
निर्णय घेणें सहकाऱ्यांना अशक्य झाले.
याच कारणानें हरघडी त्यांना तुझ्यावर अवलंबून
राहण्याची संवय लागली.
भारताचा भूगोल प्र-गतीत ठेवण्यासाठीं
विश्वाशी दळणवळण असणारी सारी खाती
तुझ्या मेजाच्या कोनांत वावरत असल्यामुळें
तुझ्यापुढें त्यांचे व्यक्तिमत्व उठून दिसत
नव्हते.
म्हणूनच 'तुझ्यानंतर कोण ?' हा प्रश्न उभा
राहिला
कारण तूं 'ममैव सारे' होतास.

२-१-७३

## : ५४ : प्रत्यय

पंडित मालवीजयी म्हणजे भक्तीचा कैलास
निश्चयाचा मेरुमणि
जनता त्यांना धर्मगुरूमाणें मानी.
त्यांच्या हृदयांत कारुण्याची यमुना आणि
आचमनांत पावित्र्याची गंगा होती
सरकार दरबारीं त्यांना जितका
मान होता त्याहून अधिक मान जनमनाच्या देव्हाऱ्यांत होता.
तरीपण १९१४ सालीं . . . पर्वकाली . . . संगमावर सामुदायिक
स्नान करण्याची त्यानीं सरकारकडे परवानगी मागितली.
ती त्यानीं नाकारली तेव्हां प्रतिष्ठेचा प्रश्न आला. जनता
प्रक्षुब्ध झाली. जनतेची श्रद्धास्थानें उध्वस्त करणाऱ्या
सरकारच्या मनोरथाचा आस कधी वाकेल सांगतां येत नाहीं.
मालवीयजीनी सत्याग्रह करण्याचे ठरविले. उषःकालच्या
घटकेला असंख्य भाविकानी नियमाचे अतिक्रमण
केले त्यांत तुला पाहून जनता आश्चर्यचकित झाली.
पण तिला तोपर्यंत माहीत नव्हते कीं ज्वलंत देशभक्तीचा
स्फुल्लिग तुझ्या देहांत अखंड जागा आहे. जिथे जिथे
अन्यायाचे दर्शन होईल तिथें तिथें त्या ठिणगीचा
वणवा होईल.
मालवीयजींच्या मागोमाग ' हर गंगे ! ' या
उद्घोषानें तूंहि त्या जलाशयांत सूर घेतलास.
तुझ्यानंतर सारा समुदाय गंगामय झाला.
ह्या सत्याग्रही स्नानाने पर्वकाळाची
संधी साधल्याचे समाधान भाविकांना मिळाले.
आणि तुला . . . . साम्राज्याची सत्ता देखील सत्यापुढें
कशी वाकते याचा प्रत्यय आला.

३–४–७३

## : ५५ : केवळ शब्दांचे आसूड

भारतीयांच्या सामाजिक जीवनांतील अनेक उण्या
प्रवृत्तींचा तूं आयुष्यभर निषेध केलास
परंतु तुझ्या वाणींतील वेदान्त अनेकदां कृतींत उतरला
नाहीं.
मुलुकी खात्यांतील वशिलेबाजी आणि लांचलुचपत यावर
तूं कित्येकदा कडाडून हल्ला चढविलास.
रोगराई आणि झोपडपट्टी हा शहरी जीवनावरील
एक कलंक आहे, असा तूं वारंवार आपल्या भाषणांतून
उल्लेख केलास.
काळाबाजारवाल्यांच्यावर तूं कोरडे ओढिलेस
त्यांना गोळी घालून ठार करावे, चौकाचौकांत
सर्वांसमक्ष चाबकाने फोडून काढावे असे तूं
रागाच्या झटक्यांत बोलत होतास.
इतकेहि करून देशाच्या कोनाकोपऱ्यांत तुला
नको ते व्यवहार राजरोसपणें चालूच होते.
समाज सुधारण्याचें कार्य तूंच करायला हवे
होतेस असा त्याचा अर्थ नव्हे.
पण केवळ पल्लेदार वक्तृत्वानें समाज-मन
बदलत नसते, हें तुझ्या स्वप्नाळू वृत्तीला कळलें नाहीं.
भोवतालच्या जगांत जीवन-मूल्यांचा ऱ्हास होत
असलेला पाहून तुझ्या भावना उफाळून येणें साहजिक
होते. शब्द कृतींत उतरविण्यासाठीं जहाल धोरण
स्वीकारावे लागते. कडक वृत्तीचा अवलंब करावा लागतो.
ते तुला जमण्यासारखे नव्हते
तूं समाजसुधारक होतास, क्रांतिकारक नव्हतास.
त्यामुळे शब्दांचे केवळ आसूड उगारण्यापलीकडे
तुझ्या हातून काहीच झाले नाहीं.

२-१-७३

## : ५६ : सुवर्ण मध्य

अहिंसा हा आपल्याला भारताच्या प्राचीन परंपरेंतून
मिळालेला एक वारसा आहे.
बुद्धकालापासून बेचाळीसच्या युद्धकालापर्यंत
चालत आलेला.
महात्माजींनी तर त्याचा उपयोग ऋषिमुनींप्रमाणें
एक अस्त्र म्हणून केला.

स्वतंत्र भारताच्या राज्यकर्त्यांवर त्याचा ठसा
वज्रलेप होऊन राहिला आहे.
अहिंसेच्या मार्गानें स्वातंत्र्याची वाटचाल रंगविण्याची
महात्माजींची कल्पना काही अंशीं तुला आणि बहुतांशी
तुझ्या सहकाऱ्यांना तितकीशी समर्पक वाटली नाहीं.
हैद्राबाद नि कश्मीरमध्यें तुला शस्त्राला शस्त्रानें उत्तर
द्यावे लागले.
तरीपण महात्मा प्रणीत तत्त्व या दृष्टीनें शक्य झाले तिथें
तूं अहिंसेतून मिळणाऱ्या भाव–बळाचाच वापर
केलास.

भारताच्या अहिंसक धोरणामुळें जगांतील राष्ट्रामध्यें
असलेला युद्धाचा तणाव कमी झाला हे निश्चित.
त्याचा परिणामकारक दाखला तूं हाताळलेल्या गोव्याच्या
संघर्षांत पहावयास मिळतो.

सैनिकी सामर्थ्याच्या केवळ देखाव्यावरच
गोव्याचा प्रश्न सुटला. शस्त्रबळाचा वापर करावाच
लागला नाहीं. ह्या कृतीला देखील तुझा तितकासा दुजोरा
नव्हता.

एक तर पाश्चात्य राष्ट्रांशी असलेले स्नेहसंबंध तुला
तोडावयाचे नव्हते आणि दुसरे म्हणजे अहिंसेचे उल्लंघन केल्यामुळें
विचारवंताकडून होणारी प्रतिकूल टीका तुला
टाळावयाची होती.
तत्त्वाचे पालन करतांना सुवर्णमध्य साधण्याच्या
तुझ्या ह्या वृत्तीमुळेंच जग एका महायुद्धाच्या खाईतून
वाचले.

३०-१२-७२

## : ५७ : पंडित सार्थ नांव

नेहरू एक कश्मिरी ब्राह्मण.
ब्राह्मण म्हणजे विद्वत्तेचं प्रतीक असलेली
धर्मोपदेशकाचा अधिकार प्राप्त
झालेली आणि अंतर्बाह्य साधुत्व असलेली
पंडित म्हणून ओळखिली गेलेली एक जात.

भारतीय समाजांत एके काळी ब्राह्मण हा
उच्च श्रेणीचा गणला जाई.
योद्धयापेक्षां ज्ञानियाचा मान मोठा होता.
राजदरबारांत पंडित प्रधानाच्या हुद्यावर असे.
मानानें आणि मनानें तो भरसभेंत ताठ
उभा राहून राजाला आशीर्वाद देई....
त्याच्यापुढे लवत नसे.
कश्मिरी ब्राह्मण फक्त देवापुढेंच लोटांगण
घालील.

तुम्हां नेहरू कुटुंबाच्या स्वभावदर्शनांत देखील
हेंच प्रत्ययाला आलेले आहे. तूं नमलास
तो देवतुल्य ऋषींपुढें . . . ज्ञानेश्वरांपुढें.
पंडित हें नांव तूं कश्मिरी अर्थानें
सार्थ केलेस.

चिनी आक्रमणानें भारताचा एक मोठा फायदा झाला
त्यामुळें हिंदी सैन्यांत आमूलाग्र बदल झाला.
ते बलवत्तर झाले.

पराजयाशिवाय आत्मसामर्थ्यातील उणेपणा जाणवत नाहीं.
तूं शस्त्रागारांत लक्ष घातलेस तेव्हां लक्षांत आले कीं आपली
युद्धसामुग्रीच त्यांच्यापुढें कमी दर्जाची ठरली.
ती अद्यावत् शस्त्रांनीं युक्त नव्हती.
हे समजतांच मेनन यांचे कृष्ण कारस्थान उघडकीस आले.
त्यांना मंत्रिमंडळांतून जावे लागले.
मेनन तुझे विद्यालयीन स्नेही.
परंतु तुझ्या अनेक सहकाऱ्यांना ते अधिकार पदावर नको
होते.
त्यापैकीं एकजण तर एका आणीबाणीच्या प्रसंगी वळलेल्या
मुठी मेजावर आपटून म्हणाले, " त्यांना ह्या स्थानावरून
हलवा. चीनच्या आक्रमणाचा परिणाम आपल्याला
येथून हलविण्यांत झाला असतां, हे लक्षांत घ्या ! "

पुढें त्या जागीं यशवंतराव आले.
यशवंतराव ... कणखर मनाचा, बलवत्तर इच्छाशक्तीचा
एक सत् प्रवृत्त मराठा गडी !
छत्रपतींच्या महाराष्ट्राचा पहिल्या श्रेणीतील एक
मानकरी.
नजर ठरत नाहीं इतक्या उंचीचे सह्यकडे
सहज चढून जाणाऱ्या जातीचा एक पहाडी पुरुष.

योग्य माणसाच्या हातीं महाभारताच्या संरक्षणाची

सूत्रें दिल्याबद्दल तूं महाराष्ट्राचा दुवा घेतलास.
त्याच्या मनांतील तुझ्याविषयीची राजकीय
किल्मिषें दूर झाली.

तुझ्या, डोळ्यांदेखत तीनशें वर्षांनीं पुन्हां
एकदां सह्यगिरीची शिखरे उंचावली

५-१२-७२

## : ५९ : ओठाचा अडसर

'You must keep a stiff upper lip like the British'
-Motilal Nehru

देह हे आत्म्याचे घर आहे आणि चेहरा हा त्या
घराचा दर्शनी भाग आहे.
डोळे त्या घराच्या खिडक्या आहेत.
आणि मुख हा त्याचा दरवाजा आहे.
मन जितके स्थिर तितकी त्या दरवाजाची
उघडझांप संयमित– पण एकदा का मनाचा
तोल सुटला कीं ती उघडझांप सारखी चालू राहते.
असा तोल जाण्याचीं कारणें बहुविध असतात.
हर्ष-खेद, सुख-दुःख, फायदा-तोटा यापैकीं कोणत्याही
एकाचा अतिरेक झाला कीं मनाचा तोल जाण्याचा
संभव असतो. म्हणून पुरुषार्थाला संयमाची आवश्यकता आहे.

एकदां तुझी बहीण कृष्णा खेळतां खळतां पडली.
तिच्या हातापायाला थोडेसे खरचटले. ती रडत रडत
मोतीलालजींकडे गेली. ते म्हणाले, "किती
लागले हा प्रश्न नाहीं, पण माझ्या मुलानीं रडतां कामा
नये. क्षुल्लक जखम झाल्यावर मनानें असा अक्रोश
करणें मला नाहीं आवडायचे. ब्रिटिशांप्रमाणें वरच्या
ओठांच्या अडसरानें सारी दुःखें आंतल्या आंत
ठेवायला शिकले पाहिजे. त्यासाठी सहनशीलता हवी"

वडिलांच्या ह्या शब्दांत तुमच्या मोठेपणाचें
सारसर्वस्व आहे, सदाकदा दुःखालाच अवसर देत
बसले तर सारें आयुष्य अश्रूंत विरून जाईल

९-१२-७२

## : ६० : असे उणेपण क्षम्य

पिचलेली बघुनी मनोरथाची चाके
भवितव्य चितारित भाव तुझा साशंके
वदलास एकदां काजळत्या घटकेला
" मम दहन–शिला भूषवा अशा आलेखें

या मातीच्या थराखालती
एक विसावे आत्मा
प्राणाहुनि प्रिय जनता ज्याला
तिलाहि तो परमात्मा
ती वदली ' हा पुरुषोत्तम
ह्या आकांक्षा दुर्दम्य
जीवन–चित्रांतील तयाच्या
असे उणेपण क्षम्य "

: ६१ : आत्मदर्शन

नेत्याची भूमिका स्पष्ट करणारे तुझे हे विचार
" नेता जर जातिवंत सेवाभावी वृत्तीचा असेल
तर त्यानें जनतेला मार्गदर्शन करायलाच हवे. त्यानें
जनतेच्या कलाप्रमाणें वागून चालणार नाहीं. जर तो आपल्या
मनाला येईल तसे वागूं लागेल तर ज्या जनतेनें आपले
अनुकरण करावे असें त्याला वाटते तीच त्याच्यापासून दूर
राहील. जर तो सर्वसामान्य लोकांच्या पातळीवर
येऊन वागेल तर त्याला आपली वैचारिक उंची कमी
करावी लागेल. नको त्यांच्याशी समझोता करावा लागेल.
राजकारणांत हरघडी मिळते-जुळते घेण्याची सवय
लावून घेतली, तर त्यांच्या नेतृत्वाचा पाया डळमळीत होतो."

नेत्याच्या मनोधारणेविषयी केलेल्या ह्या विवेचनांत
तुला तुझेच स्व-रूप दिसते आहे. तुझ्या जीवन–विषयक
स्वप्नांची ज्यामुळें छकलें झाली, त्याची ती मीमांसा आहे.
मनांतल्या कल्पना तुला कागदावर उतरवितां आल्या
नाहीत, हे तुझ्या नेतृत्वाला खाली आणणारे उणेपण आहे.
राष्ट्राचा रथ हाकारतांना हाताखालच्या अधिकाऱ्यांशी प्रसंगी
कठोर वागावे लागते. ते वागणे तुझ्या मनोधर्मात नव्हते,
तुझी लोकसत्ताप्रिय वृत्ति हेहि त्याचे एक कारण असूं शकेल
पायरीवर उभ्या राहिलेल्या हरएकाला संतुष्ट
करायचे म्हटले तर पेचप्रसंगांतून बाहेर पडण्याच्या
घेतलेल्या निर्णयाला मुरड घालावी लागेल. मतभेद ज्या
ठिकाणी पराकोटीला गेले त्या ठिकाणीं अनेकांचा रोष पत्करून
तूं काहींना अधिकार-पदावरून खाली आणलेही आहेस.
तरीपण तुझ्या मनाची प्रवृत्ति दडपणामुळें नमण्याचीच होती.

दर्शनी तुझ्या जीवन-विशेषांत अशा उणीवांची नोंद
तुझे भाव चित्रण कलंकित करणारी वाटते. पण ज्या अनंत अड -
चणीतून तूं देशाला तारलेस, जनतेचा उद्धार केलास, त्या दृष्टि -
कोनांतून त्यांचा विचार व्हायला हवा

कारण व्यक्ति म्हणून काय किंवा मुत्सद्दी म्हणून काय,
तुझी उंची असामान्य होती. राजकीय मोठेपणा राष्ट्राला
त्रस्त करणारे पेचप्रसंग सोडविण्यांत आहे. कालसागराच्या
पर्वतप्राय लाटेवर स्वार होऊन जनतेला मार्गदर्शन करण्यांत
आहे.

त्या दृष्टीने आजचा भारत तुझ्या स्वप्नांतून साकारला
आहे असे म्हणण्यांत अतिशयोक्ति नाही.

४–१–७३

ज्योतीचे तेज सर्वस्पर्शी असले तरी ती ऊर्ध्वमुखीं असते.
आर्यसंस्कृतीच्या मंदिरांतील ही ज्योत आज कित्येक शतके
तेवत आहे.
... दिगंताचा कोन नि कोन उजळण्यासाठीं.
वादळवाऱ्याने ती ज्योत कधीं लहरली असेल, कधीं लवली असेल,
कधीं फुरकुरली असेल.
पावसापाण्याच्या तुषारानें कधी ती तडतडली असेल.
पण तिची नजर अव्याहत अनंताकडे आहे.
जेव्हां कधीं कोणी एखाद्या आडदांड मनगटानें
तिला अधोमुख करण्याचा प्रयत्न केला
तेव्हां तिनें रुद्ररूप धारण केले.

जालियनवाला बाग हे सेनापती डायरच्या
पशुवृत्तीने पेटविलेले एक अग्निकुंड होते
तीन बाजूंनी उत्तुंग इमारतीनीं वेढिलेल्या एका चौकांत
सणानिमित्त जमलेल्या वीस हजारांच्या जमावावर
त्याच्या सैनिकांनी राक्षसी गोळीबार केला. रोखलेल्या
संगिनीतील एखाद दुसरीच गोळी वाया गेली असेल. दीड
हजारावर माणसें ठार झाली. साडेतीन हजार
जखमी झाली. ह्या भीषण कृत्यामागे सत्तावनच्या
क्रांतीचा सूड होता. सिद्धांर्थाची कसोटी पहाण्यासाठीं
उन्मत्त अंगुलीमालाच्या अंगारलेल्या डोळ्यांत हत्येची
धुंदी चढली होती.
परंतु अशा प्रवृत्तीला काळ देखील धडे शिकवतो.
असंख्यांचे हें बलिदान निरर्थक ठरले नाहीं. डायरच्या
ह्या कृत्याने ब्रिटिशांच्या 'भू-जलनिधी' वरील पकड
सैल झाली. सर्व धर्मांचे, सर्व पक्षाचे लोक अत्यंत भीतीच्या
भावनेनें का होईना, पण सूड बुद्धीने एकत्र आले.

मोतीलाल म्हणाले "माझे रक्त उकळते आहे." त्यांची जर ही अवस्था, तर तुझ्या रक्ताची वाफ झाली असेल.

हा काहीं समोरासमोर प्रतिकार करणाऱ्यांशी सामना
नव्हता. तर बागेंत जमलेल्या निःशस्त्र निरपराध जमावाची
माथेफिरू सत्तेनें जाणून बुजून केलेली ती हत्या होती.
अग्निकुंडातील अशा असंख्यात आहुतीनेच भारतीय
स्वातंत्र्य जवळ आणले.
कारण त्या आहुतीत समर्पणांतील आध्यात्मिक दृष्टि
होती. तेव्हांपासून जालियनवाला बाग ही अग्नि–कुंडांतील
आहुतींची स्मरणिका झालेली आहे.

६–११–७२

## : ६२ : गर्दी आणि एकांत

तूं नेता की तत्त्ववेत्ता हा मला कित्येकदा प्रश्न
पडतो. नेता तत्त्वनिष्ठ असतोच असें नव्हे, तसेंच
तत्त्ववेत्त्याला नेतृत्व मिळेलच असेही नव्हे.
तूं दोन्ही होतास.
नेता म्हणून तुझ्यामागे भारतीय जनता तर होतीच,
पण उच्च अर्थानें जगांतील विचारवंत राष्ट्रांचे नेतृत्वही
तूं केलेस, त्या त्या देशांच्या नेत्यानीं तुझा गौरव केला.
तुला मानले.
तत्त्ववेत्ता चिंतनशील हवा. आणि चिंतनासाठीं एकांताची
अत्यंत आवश्यकता असते.
आयुष्यांत तुला चिंतनाला अवसर मिळाला तो तुरुंगांत.
तुझ्या आयुष्याची दहा-अकरा वर्षे तुरुंगांत गेली.
भारताच्या दृष्टीनें हा काळ मोठा भाग्याचा म्हणतां
येईल. इतकी वर्षे तूं ‘ आंत ’ नसतास तर
तुझें विचारदर्शन ग्रंथरूपानें ‘ बाहेर ’ आले नसते.
तूं बाहेर होतास तेंव्हां जनतेच्या प्रेमाने तुला
इतके वेढले होते कीं त्यांत तूं बुडून गेलास.

गर्दी . . . गर्दी . . . आणि गर्दी ! ! !
तुला गर्दीचे विलक्षण वेड
ते सगळ्याच नेत्यांना असते.
प्रत्येक पक्षाचे अनुयायी आपापल्या नेत्यांच्या
पालखीला खांदा द्यायला अहमहमिकेनें पुढें येतात.
पण तुझ्या प्रेमासाठी अखिल भारतीय जनता
वेडी झालेली होती.
विसाव्या शतकांतील जनतेचे अनुयायित्व डोळस
आहे. सारासार विचारांतून तिनें आपलें मन बनविलें

आहे. सुपातला कोण नि तुपातला कोण
हे तिनें अचूक ओळखले आहे.
वैयक्तिक उंची वाढविण्यासाठीं जनतेला मुठींत
ठेवतो तो सुपातला . . . म्हणजे स्वार्थी
मतलबी, आणि तिच्या अंतःकरणात स्थान मिळावें
म्हणून जो विरतो, तो तुपातला . . . म्हणजे परमार्थी.
तुला लोकानी वेढलें . . . ते गंगेच्या तीरावर स्नानासाठी
जमणाऱ्या यात्रिकाच्या वृत्तीनें ...
तूं विश्वाला तारणारा आहेस या भावनेनें.
ही गर्दी महात्माजीनंतर फक्त तुझ्यासाठीच जमली.
त्यांच्या भोवतीची गर्दी भक्तानी संतांच्या पायीं
मारलेल्या मिठीसारखी होती.
आणि तुझ्या भोवतीची ?
ती उत्कट देशभक्तीतून उमललेल्या प्रीतीसारखी होती.
गर्दीचें तुझ्यावर एवढे प्रेम होते म्हणून तुला मिळालेल्या एकांताच्या
घटका जागवितां आल्या.
तुझे विचार लेखणीत उतरू शकले; जनतेपर्यंत पोहचूं
शकले.
आपल्या समाधीनें दुरितांचे तिमिर जात आहे.
विश्व स्वधर्म–सूर्याचें दर्शन घेते आहे,
या विश्वासानें कुणाच्या मनाला शांति
मिळणार नाहीं ?
क्षणाचाही एकांत नसलेल्या गर्दींत
तूं जितका रंग भरलास, तितकाच कसलाही
गोंधळ नसलेल्या एकांताने लेखन-चिंतनांत तूं दंग राहिलास.

८–१२–७२

## : ६४ : गरुडाची पिलें

नेहरू कुटुंबाच्या चरित्र-ग्रंथांत कृष्णा हाथीसिंग एके ठिकाणी
लिहितात .– ,, कोणत्याही स्त्री-पुरुषानी नेहरू या आडनांवाशी
लग्न लावू नये. कारण त्यांच्यासारखं जगणं त्यांना कठीण जाईल"
तुझी पत्नी कमल ... तिचे जीवन ज्योतीवर धरलेल्या
प्रासादांच्या कोनांत ठेविलेल्या पूजेंतील कमलासारखे होते.
तुझी आई स्वरूप राणी ... वारंवार आजारी असल्यामुळें
खंगत गेली. तरी तिनें आपला धर्म अखेरी जागविलाच.
'प्यारा तिरगा' च्या पार्श्वभूमीवर तिची केशरी साडी रंगत
गेली.
विजया आणि कृष्णा ह्या तुझ्या दोन भगिनी.
विजयानें तर आपल्या शब्दलालित्याने परदेश गाजविले
आणि जगांतील देशांत भारताला मानाचे स्थान
मिळवून दिलें.
कृष्णानेहि आपल्या कपड्यांना राजकीय रंग दिला.
तरी पण तिचें सुखलोलुप मन क्रांतीशी तितकेसे
एकरूप झाले नाहीं.
आणि तुझी इंदिरा ... ती तर बोलाचालायला लागल्या पासून
तुझ्या आणि तिच्या आजोबां भवती वाढली. पतीच्या
प्रेमापेक्षां पित्याच्या पराक्रमांत रस घेणारी ...रंग
भरणारी .. सम'रूप' होणारी
तुझ्याबरोबर तिने अक्षरशः भूगोल पायाखालीं
घातला.
तुझ्या सारखाच तिला गर्दीचा छंद जडला.
आपलाच आवाज ऐकत राहण्याचा नाद लागला.

कृष्णा म्हणाली ते खरंच आहे. नेहरू कुटुंबांतील
व्यक्तींना जन्मतःच स्थान मिळाले पहाडाच्या

उंचीचे .. अस्मान स्पर्शी.
इतर पाखरांच्या पंखांत इतके उड्डाण घेण्याचे
सामर्थ्य कुठले असायला ?
त्यामुळे तुमच्याशी संबंध आलेल्या माणसांना
तो विश्वसंचार मानवला नाहीं.
त्यांना तेवढी दिगंतव्यापी झेप घेता आली नाहीं.
क्षितिजाच्या परिघांत त्यांना फेर धरतां आला नाहीं.
तुमचे सहचर तुमच्या त्या अश्रांत श्रमंतीनें थकले ...
... वाकले ... आणि म्हणूनच जनतेच्या चिरंतन
प्रेमाला मुकले.
तुम्हीं सारी वादळ प्यायलेली ... गरुडाची पिले
होतात.

३-१२-७२

## : ६५ : तृणाची पाती

लंडन येथील हॅरो स्कूलमध्ये शिक्षण घेतलेल्या इतर
विद्यार्थ्यांप्रमाणें तुलाही त्या शाळेबद्दल एक प्रकारची ओढ
होती. त्या वातावरणाशी तुझे एक नाते जुळले होते.
सर विन्स्टन चर्चिल हे देखील त्याच
शाळेचे एक विद्यार्थी. पण कॉंग्रेसच्या नेत्यांकडे ते तुच्छतेनें
पहात. गवताची पाती ( Men of straws) म्हणून त्यांचा
उल्लेख करीत. बहुसंख्य भारतीयांबद्दल ब्रिटीशांच्या
मनांत वसत असलेल्या अनादराचे ते एक प्रतीक होते.
पन्नास साली ते इंग्लंडचे पंतप्रधान झाले.
तेव्हां तूं भारताचा पंतप्रधान होतास.
तुम्हां दोघांच्या मनोरचनेंत अनेक बाबतींत विरोध
असून देखील हॅरो स्कूलची स्मृति हा तुमच्या मधील
समान दुवा होता. म्हणून हॅरो येथें शिक्षण घेतलेल्या
माजी विद्यार्थ्यांनीं तुझ्या सन्मानासाठीं खाना द्यावयाचे
ठरविले.
चर्चिल त्यावेळीं मोठे खुषींत होते. तुझ्या धैर्याची
आणि प्रामाणिकपणाची त्यानीं मुक्त कंठानें स्तुति केली.
भारताच्या पारतंत्र्यांतील काळात आलेले कटु अनुभव
जमेस धरून देखील भारताला संघटित राष्ट्रकुलांत
सामावून घेण्याचा मनाचा मोठेपणा तुझ्यांत कसा
आहे, हे त्यानीं खुल्या दिलानें सांगितले. तूं
ती भावमुद्रा ओळखलीस आणि गतजीवनातील
उण्या-अधिकावर पडदा टाकलास.
दोन देशांच्या नेत्यांमधील अडीच
तपांचा भावनात्मक विरोध चिरुटाच्या धूम्रवलयां-
बरोबर विरून गेला. भारतीय
नेते म्हणजे तृणाची पाती म्हणून उपहासानें
उल्लेखिलेले पुरुष वादळलेल्या विश्वांतही तग
धरून राहतात हे तूं सिद्ध केलेस.

## : ६६ : आत्म्याचा गंध

मातेच्या मृत्यूनंतर तू अधिकच अस्वस्थ झालास.
कमला तर तुला त्या आधीच सोडून गेली होती.
विजया मंत्रीपदावर असल्यामुळे . . . तुझ्याइतकी नाहीं,
तरी बरीचशी राजकीय व्यूहांत सापडली होती.
राहता राहिली कृष्णा. तिला 'आपल्या भावाचे
आपल्याकडे दुर्लक्ष होत आहे, आपण त्याच्यापासून
दूर जात आहोत' असें वाटूं नये, म्हणून तूं लिहिलेस,
" या परिस्थितीच्या पेचामुळें तूं आमच्यापासून
दूर गेली आहेस, आमचे तुझ्यावरील प्रेम कमी झाले
आहे, असा समज करून घेऊं नकोस.
आपलें कुटुंब अपवादात्मक आहे. किंवा
मी असें म्हणेन कीं आपल्याला असें जगणे भाग पडले.
आणि अशा तऱ्हेच्या जगण्याचे महत्व जरी ते
हवे त्या प्रमाणांत जगाच्या नजरेंत आलेलें नसले,
तरी प्रिय मानायला हवे. आनंदभवन
हे तुझेहि घर आहे. तिथें राहणाऱ्या नोकर माणसांचा
तुझ्यावरहि लोभ आहे. तुझ्यासाठीं ती हवं ते करतील.
पण मला तिथें जाऊन राहणे आज परक्यासारखे
वाटेल. माझ्या घरांत मी पाहुणा आहे असे वाटेल.
इतक्या माझ्या त्या वास्तू बद्दलच्या भावना विरलेल्या आहेत."
पत्नीच्या शीतल छायेला मुकलेल्या
तुझ्या व्यक्तिगत जीवनांत काजळी अंधार असतांना देखील
धाकटया बहिणीबद्दल तुझ्या मनांत केवढी ही
आपुलकी ? नात्यांतील बंधनाला आत्म्याचा
केवढा हा गंध ?

४-१२-७२

## : ६७ : गुरुभूमिकेची जाण

महात्माजींच्या प्रयाण प्रसंगीचें तुझे भाषण त्यांच्या
व्यक्तिमत्वाचे अचूक मूल्यमापन करणारें आहे.
याचे कारण तुझ्या पित्याच्या पश्चात् त्यांच्या इतका योग्य
सदुपदेश तुला कोणीहि दिला नव्हता.
तुझ्या इतकी त्यांची जवळीक कुणालाहि लाभली नव्हती
आपल्यांतील दोषाची जाणीव ठेवून गुणांचे मोल
करणारा कुणीतरी बाजूला असला कीं जीवनाला
गति येते.
तेव्हां तुझा त्यांच्याबद्दलचा आदर आणि
'कठिण समय येतां' त्यांच्या सल्ल्यावर विसंबून
राहण्याची तुझी संवय आदर्श पुरुष- शिष्याला
शोभून दिसण्यासारखीच होती.
तुमच्या राजकीय दृष्टिकोनांत तीव्र मतभेद होते.
तरी पण तुमच्या नात्याला कृष्णार्जुनाचा रंग होता.
तुझ्यांत 'शिष्यस्तेऽहम्।' चे सौजन्य होते.
स्वातंत्र्य-युद्धांतील तुमच्या भूमिका परस्पर पूरक होत्या.
महात्माजी हे प्राचीन भारतीय-परंपरेचें प्रतीक.
जनतेला कार्यसिद्ध करण्यासाठीं नेत्याला लागणारे
भावबळ त्यांच्याजवळ होते. भारताच्या इतिहासांत
हे कार्य इतक्या विशाल प्रमाणांत दुसरे कोणीही केलेलें
नाहीं.
आणि तूं ?...जहाल मतांचा
समाजांत आमूलाग्र सुधारणा करू इच्छिणारा एक तळमळीचा कार्यकर्ता.
पाश्चात्य पांडित्याने प्रभावित झालेला.
समाजसत्तावादी...शास्त्रीय प्रगतीवर पूर्ण विश्वास असलेला.
आणि नवसमाजाचें स्वप्न जागृतावस्थेंत पहाणारा.

शहरांतील मध्यमवर्ग आणि कामगार यांना राष्ट्रीय
चळवळीकडे आकर्षित करणारा.
महात्माजींच्या विचारानुसार शेतजमिनीचा प्रश्न तूं
सोडविलास.
त्यामुळें किसान एकजुटीनें तुझ्यामागे उभे राहिले.
तुम्हीं उभयतानीं 'भरत-नाट्यांतील'
आपल्या भूमिका पुरेपुर जाणून केल्यात.
स्वातंत्र्य-लढा चालूं असेपर्यंत गांधीजींसारखा
विचार-प्रवण नेताच भारताचा सूत्रधार राहणें योग्य होते.
मुक्तीनंतर आपोआपच ते नेतृत्व तुझ्याकडे येणार होते.
आणि तसें ते आले.
पंचवार्षिक योजना हाती घेऊन भारतांत वेगवेगळे
प्रकल्प सुरू करणें गांधीजींना कितपत जमलें असते
याची शंका आहे.
पूर्वपश्चिमेच्या व्यक्तित्वांत अद्वैत पहाणारा तुझ्यासारखा
अष्टपैलू अग्रणीच ते करूं शकला.
गुरुभूमिकेची जाण ठेवून अंतर्गत मतभेद
तूं मोठ्या संयमानें मिटविलेस, यांतच तुझ्या मनाचा
मोठेपणा आहे.

१९–१२–७२

## : ६८ : स्वातंत्र्याला मोल आले

स्वातंत्र्य-लढ्याची तीव्रता कमी व्हावी म्हणून ब्रिटिशांनीं
भारतीय जनतेला काहीं आमिषें दाखविली.
भुकेलेल्या कुत्र्यांच्या कळपांत मालक ज्या बेदरकारीनें
भाकरीचे तुकडे फेकतो त्या तुच्छतेनें.
पण आमची भूक काहीं दुपारच्या घांसापुरती नव्हती.
ती चिरंजीव जीवन्मुक्तीसाठीं होती.
प्राणाच्या मोबदल्यांत स्वातंत्र्य प्राप्त करून घेण्याची होती.
१९२८ साली 'सायमन कमिशन' आले, ते याच बडेजावी
पावित्र्यांत.
पण मोराच्या नजरेंत तोरा भरतो तो जीवन-
दानासाठीं ओथंबलेल्या मेघमालेचा
धूर्त बगळ्यांच्या उड्डाणामुळें निर्माण झालेल्या
फेनधवल शारदीय अभ्रांचा नव्हे.
देशभर काळ्या निशाणानें कमिशनचे स्वागत (?) झालें.
लखनौ येथें एका सत्याग्रही पथकाचा पुढाकार तुझ्याकडे होता.
अधिकाऱ्यानें उर्मटपणानें विचारले, " चांगल्या
वागणुकीची लेखी हमी द्याल तर तुम्हांला सोडतो "
तुझ्या अभिमानाची ज्वाला उफाळून आली.
तूं ते नाकारलेस.
ह्या धारदार स्वभावामुळेच इतर समकालीन
नेत्यांत तूं उठून दिसलास.
तुझ्या मनांत द्वंद्व सुरू झाले...भेकडा-
सारखे कबूल व्हायचे कीं धैर्यानें सामोरे
जायचे ?
निमिषार्धात तूं पुढें झालास.
मरणाच्या तयारीने केलेल्या प्रतिकारानें
चिडलेल्या पोलिस अधिकाऱ्यानीं

तुला डोळ्यांपुढे अंधेरी येईपर्यंत मारलें.
परंतु तूं सत्त्याग्रही तंत्राच्या शिस्तीत
वाढलेला स्वातंत्र्य–सैनिक होतास.
त्या क्षणीं तुझ्या डोळ्यांपुढे त्याची भारतीयांच्या तिरस्कारानें
तडकलेली रक्तपिपासु वृत्ति उभी राहिली.
त्या वृत्तींत केवळ माथेफिरूपणा होता.
सहानुभूतीचा किंवा माणुसकींचा लवलेशही नव्हता.
संयमाने आणि सहनशीलतेनें असे प्रहार तुझ्यासारख्यानें
माथ्यावर पेलले म्हणूनच स्वातंत्र्याला मोल आले.

१५–१२–७२

## : ६९ : एक पाउल पुढें

स्वातंत्र्य मिळाले, पण कोणत्या अवस्थेंत ?
दोन जमातींच्या हाती श्रीफलाची दोन छकले पडली.
शेंडीचा भाग एकाच्या हातीं आणि दुसरा भुंडा
गरगरीत भाग दुसऱ्याच्या हातीं
आंतील तीर्थ पायाखालीं तुडविलें गेले.
तेंच अनर्थाला कारण झाले.
दिल्लींत विरोधी जमातीत हिंसक हल्ले सुरू झाले
शहरांत शांतता नांदावी म्हणून 'शांतिदूत' महात्माजीं
बाहेर पडले...निर्लेप निःशस्त्र पण निर्भय अंतःकरणानें,
गल्ली गल्लींतून मोहल्या मोहल्यांतून शहराच्या हरएक
भागांत ते हिंडले.
हात जोडून प्रार्थना करून माथेफिरूंना शांत राहण्याची
त्यानी विनंती केली.
वयाच्या अठ्याहत्तराव्या वर्षी त्या कृश देहांत
केवढी आध्यात्मिक शक्ति होती !
पण स्वातंत्र्या पूर्वीच्या त्यांच्या अहिंसेच्या तंत्राचा...
शांति मंत्राचा लाखाच्या निर्वासितानी वेढिलेल्या
शहरावर काहींच परिणाम झाला नाहीं.
त्यांच्या (अति) मानवतावादी दृष्टिकोणाचे दुष्परिणाम
लक्षांत घेऊन तूं परिस्थिति हाताळलीस.
एका रात्रीं जातिविव्देषाच्या ज्वालानीं भडकलेल्या
रस्त्यावर तूं उतरलास.
ठायी ठायी धर्मवेडानें विरलेल्या मनांच्या
झालरींच्या चिध्या विखुरलेल्या तुला दिसल्या.
त्या ज्वाला महात्माजींच्या मनोधर्माची रक्षा करण्यासाठीं
वलयें घेत होत्या.

शिरावर संम्राटाचा शिरपेच नसलेल्या भारताच्या
त्या अनभिषिक्त राजाचे शिर परस्पर कुणीतरी
उडविलें तर हवे होते.
अशा अवस्थेंत रस्त्यांरस्त्यांतून माथेफिरू फिरत होते.
एके ठिकाणीं प्रलयाच्या भीषण घोषणा देणाऱ्या
हल्लेखोरा समोर तूं उभा राहिलास
आणि अंगारलेल्या नजरेनें त्याला प्रश्न केलास–
"कुणाच्या नरड्यांतून हे जहर लहरते
आहे ? ज्यांच्या पायाशी सर्वस्व वेंचून
वाकायचे त्यांच्यांवर हात टाकायची तुमची तयारी ?
सैतान ! आधीं माझ्यावर वार करा. चला ! व्हा कुणीतरी
पुढें ! "
भेकडांची गुंडगिरी गर्दीच्या ठिकाणीं, सत्याच्या
नजरेला नजर भिडविण्याचे सामर्थ्य साम्राज्यांतही
नसते.
काळे तोंड करून ते गुपचूप निघून गेले.
निर्भयतेच्या बाबतींत तूं महात्माजींच्या एक पाऊल
पुढें टाकलेस.

३०–११–७२

## : ७० : तूं तर दीप हिरण्मय रे !

तूं तर दीप हिरण्मय रे !
आम्हीं मृण्मय, वर्षाचे वय
अमुचे, तेज तमांत विरे

होते दिन तुझिया बाल्याचे
'भारत परवश' या शल्याचे
भवतालिल वलयांत क्रांतिच्या–
तुझ्या उरीं चैतन्य स्फुरे
तूं तर दीप हिरण्मय रे !

असुनि घरीं लक्ष्मीचे लालन
भूषविसी विद्येचे दालन
दिगंत संचारांतुनि तुझिया–
विश्वांतिल अनुभूति झरे
तूं तर दीप हिरण्मय रे !

अमिराची सोडून हवेली
स्वीकारिसि फकिराची झोळी
सर्वस्वाची केलिस होळी–
कीर्ति खरी त्यागात तरे
तूं तर दीप हिरण्मय रे !

असून तुझिया अवती-भवती
अगणित नक्षत्रांसम ज्योती
तुझ्या निळ्या स्वप्नांची कांति–
अवकाशांमधि भरुनि उरे
तूं तर दीप हिरण्मय रे !

" जनतेचे जाणून मनागत
एकच हा उद्धरील भारत "
राष्ट्रपित्याने तुला शंसिले–
याहुनि चीज नसे दुसरे
तूं तर दीप हिरण्मय रे !

पेलिलेस शिरिं काळाचे घण
तेव्हां आले तुला ' तुझे ' पण
अमर दीप्तिनें उद्यां उजळतिल
आणि वितळतिल हिमशिखरे
तूं तर दीप हिरण्मय रे !

## : ७१ : छाव्याचा पंजा

ब्रिटीश मनोवृत्तीशी तुझा सरळ सरळ संघर्ष उद्‌भवला
तो मसुरीला
त्याचं असं झालं–
१९१९ मध्यें झालेल्या चकमकी संबंधी
सलोख्याची बोलणी करण्यासाठीं ब्रिटीशांच्या
वकिलांना भेटण्यासाठीं अफ्‌गाण प्रतिनिधी तेथें
आलेले होते.
दुर्दैवाने तुझ्या विश्रांती स्थानाशेजारीच
ते प्रतिनिधी रहात होते. एकाएकी तेथील पोलीस–
प्रमुखाचे तुला बोलावणे आले. त्यानीं तुला असे
बजावले कीं यापुढें या पठाण-प्रतिनिधींशी तूं
कोणत्याही प्रकारचा संपर्क ठेवतां कामा नये.
हेतु हा की, " ब्रिटिशांविरुद्ध ( त्यांच्या दृष्टीनें )
घातकी चळवळी करणारा तुझ्यासारखा माणूस
त्यांच्या मनांत कालकूट कालवील."
तुला त्या अफ्‌गाणांच्या
ब्रिटीश वकिलांपाशी असलेल्या कामांची
काहींच कल्पना नव्हती. परंतु यामुळें
तुझा स्वाभिमान डिवचला गेला.
तूं तसे वागण्याचे निक्षून नाकारलेस.
त्याचा परिणाम असा झाला कीं तुला मसुरी सोडून
जावे लागले.
तुझा तो प्रतिकार म्हणजे सिंहाच्या छाव्यानें
उगारलेल्या पंजा होता.
स्वाभिमान डिवचल्याशिवाय झुंज रंगत नाहीं.

२९–११–७२

## : ७२ : तूंही उदास झालास

शिक्षण संपवून तूं भारतांत परतलास तेव्हां
इथें लक्षांत येण्यासारखा असा बदल झालेला नव्हता..
या उपखंडाचे स्वामी होते तेच होते. बंगालच्या
फाळणींतून देशांत असंतोष निर्माण झाला होता. लोकमान्यांच्या प्रक्षोभक
भाषणानें श्रमजीवि मध्यमवर्गांत जागृति उत्पन्न झालेली असली
तरी पारतंत्र्याची तीव्र जाणीव शहरांतील मूठभर
सुशिक्षित बुद्धिवंतातच होती. ब्रिटिशांशी एकनिष्ठ
असलेल्या काँग्रेसची अधिवेशनें भीतभीतच भरत असत.

जहालमतवादी नमले होते. त्यांचे पुढारी कांहीं
तुरुंगांत होते तर काहींनीं आपण होऊन हद्दपारी स्वीकारली
होती.

किसानांच्या संघटना सुस्तावलेल्या होत्या
गांधीजी दक्षिण आफ्रिकेंत होते.
तुझ्यापुढील भारत होता तो असा–
त्याच्या डोळ्यांत राजकीय उदासीनता होती.
कोटयावधी जनतेच्या कानांतून मनांत उतरणारा
मंत्र सांगणारा कुणीतरी ' हरीचा लाल ' तिला
हवा होता.

वैशाखाच्या आगीनें पाय पोळले कीं
नजर पश्चिमेच्या धारेवरून वर चढणाऱ्या
मेघाकडे लागते. ह्या अवस्थेंत तूंही उदास
झालास.

१२–१२–७२

## : ७३ : ज्योतीसारखी स्मृति

" मुबारकअल्ली हे आमच्या कुटुंबांतले...
अत्यंत विश्वासातले गृहस्थ
वडिलांचे ते मुन्शीजी
आम्ही सारे त्यांना आमच्यांतलेच
एक समजत असूं
एका सुखवस्तु घराण्यांत जन्मलेला हा माणूस
सत्तावनच्या बंडांत ब्रिटीश पलटणीकडून
प्रपंचाबाहेर फेकला गेला.
तो घरादाराला, बायकोमुलांना मुकला
या दुख:द जीवनामुळेंच त्याच्यातील सहृदता
जागी झाली
मुलांशी ... विशेषत: माझ्याशीं ... खेळण्यांत
तो रंगून जाई
माझ्या एकटेपणांत मी त्याचा आश्रय घेई

फिकट करड्या रंगाच्या दाढीमुळे माझ्या बाल-दृष्टीला
तो एकाद्या वेदकालीन मुनीप्रमाणे भासे
त्यांच्याबरोबर पांघरुणांत लपेटून घेऊन
मी तास तास त्याने सांगितलेल्या सत्तावनच्या कथा
ऐकत राहीं
व्यक्तिगत व्यथेंत भिजलेल्या त्या कथा सांगताना
तो ऐकणाऱ्याशी विलक्षण एकरूप होई.
मी चांगला जाणता झाल्यावर मुन्शीजी वारले.
पण त्याची स्मृति माझ्या मनाच्या देव्हाऱ्यांत
ज्योतीसारखी तेवत आहे. "

मराठी ग्रंथ संग्रह ... शाखा (स्थ... १८६...

## : ७२ : तूंही उदास झालास

शिक्षण संपवून तूं भारतांत परतलास तेव्हां
इथें लक्षांत येण्यासारखा असा बदल झालेला नव्हता..
या उपखंडाचे स्वामी होते तेच होते. बंगालच्या
फाळणींतून देशांत असंतोष निर्माण झाला होता. लोकमान्यांच्या प्रक्षोभक
भाषणानें श्रमजीवि मध्यमवर्गांत जागृति उत्पन्न झालेली असली
तरी पारतंत्र्याची तीव्र जाणीव शहरांतील मूठभर
सुशिक्षित बुद्धिवंतातच होती. ब्रिटिशांशी एकनिष्ठ
असलेल्या काँग्रेसची अधिवेशनें भीतभीतच भरत असत.

जहालमतवादी नमले होते. त्यांचे पुढारी कांहीं
तुरुंगांत होते तर काहींनीं आपण होऊन हद्दपारी स्वीकारली
होती.

किसानांच्या संघटना सुस्तावलेल्या होत्या
गांधीजी दक्षिण आफ्रिकेंत होते.
तुझ्यापुढील भारत होता तो असा–
त्याच्या डोळ्यांत राजकीय उदासीनता होती.
कोटयावधी जनतेच्या कानांतून मनांत उतरणारा
मंत्र सांगणारा कुणीतरी ‘ हरीचा लाल ’ तिला
हवा होता.

वैशाखाच्या आगीनें पाय पोळले कीं
नजर पश्चिमेच्या धारेवरून वर चढणाऱ्या
मेघाकडे लागते. ह्या अवस्थेंत तूंही उदास
झालास.

१२–१२–७२

## : ७३ : ज्योतीसारखी स्मृति

" मुबारकअल्ली हे आमच्या कुटुंबांतले...
अत्यंत विश्वासातले गृहस्थ
वडिलांचे ते मुन्शीजी
आम्ही सारे त्यांना आमच्यांतलेच
एक समजत असूं
एका सुखवस्तु घराण्यांत जन्मलेला हा माणूस
सत्तावनच्या बंडांत ब्रिटीश पलटणीकडून
प्रपंचाबाहेर फेकला गेला.
तो घरादाराला, बायकोमुलांना मुकला
या दुख:द जीवनामुळेंच त्याच्यातील सहृदता
जागी झाली
मुलांशी ... विशेषत: माझ्याशीं ... खेळण्यांत
तो रंगून जाई
माझ्या एकटेपणांत मी त्याचा आश्रय घेई

फिकट करड्या रंगाच्या दाढीमुळे माझ्या बाल-दृष्टीला
तो एकाद्या वेदकालीन मुनीप्रमाणे भासे
त्यांच्याबरोबर पांघरुणांत लपेटून घेऊन
मी तास तास त्याने सांगितलेल्या सत्तावनच्या कथा
ऐकत राही
व्यक्तिगत व्यथेंत भिजलेल्या त्या कथा सांगताना
तो ऐकणाऱ्याशी विलक्षण एकरूप होई.
मी चांगला जाणता झाल्यावर मुन्शीजी वारले.
पण त्याची स्मृति माझ्या मनाच्या देव्हाऱ्यांत
ज्योतीसारखी तेवत आहे. "

मराठी ग्रंथ संग्रहा
१८६८
शाखा (स्थल

## : ७४ : मलयजशीतल स्पर्श

गांधीजीनी आनंदभवनांत पाउल टाकले आणि –
तुमच्या कुटुंबाचा कायावाचामनें पालट झाला. स्वामित्व भावनेनें
चाल करून आलेल्या विश्वामित्राच्या सेनेचा धुव्वा उडविणाऱ्या
वसिष्ठाची कामधेनु ... अहिंसा ... ते आफ्रिकेंतून घेऊन आले
होते.
प्रथम तूं त्यांच्याबरोबर बाहेर पडलास. तुपांत ओलावलेला
चांदीचा चमचा मेजावर तसाच ठेवून.
महालाच्या संगमरवरी पाषाणांतून परावर्तित होणाऱ्या
चंदेरी दुनियेचा त्याग करून . . .
तेव्हां तुझे पिताजी घरांत म्हणाले–
' तो पुढें झालाच आहे. त्याच्यामागून मी . . .
आणि आमच्या मागून आमचे म्हणून जे जे असेल
ते सारे काहीं. '
१९२१ साली पोलिसांनी आनंद-भवनाला अचानक
घेरले. अधिकाऱ्यांनीं झडतीचें वॉरंट दाखविलें,
तेव्हां मोतीलालजी हंसत म्हणाले, " घ्या झडती.
पण हें घर झाडून पहायला तुम्हांला सहा
महिने लागतील "
त्याचवेळी तुम्हां दोघांना . . . पितापुत्रांना अटक
झाली. इंदिराजी तेव्हां केवळ चार वर्षांची होती.
पण त्या वयांतहि तिचा चेहरा अंगारला. आपल्या
घरांत घडते आहे ते कांहींतरी जगावेगळे आहे
देशाच्या दृष्टीने त्याला कांहीं विशेष महत्व आहे,
याची तिला कल्पना आली होती,
तेव्हांपासून तिनें पुढें सत्तावीस वर्षे
महात्माजींना जवळून पाहिले. पित्याबरोबर
पश्चिमेच्या सफरी करतांना

तिला पूवचा विसर पडला नव्हता. किंबहुना
पूर्व-पश्चिमेचा मनोज्ञ संगम हे तुमचे नेहरू
कुटुंबाचे वैशिष्ठ्य म्हणता येईल,
तुमच्या तीन पिढ्यांना महात्माजींचा सहवास
घडला. त्यांचा सल्ला मिळाला, त्या मलयजशीतल
छायेंत तुम्हीं वाढला नसतात तर तुमच्या उल्हसित
उत्साहित आणि उन्मेषित वृत्तीनें मर्यादित क्षेत्रांत
नांव कमविलें असते.
बुद्धिवादी माणूस मोठेपणा मिळविण्याच्या
इर्षेनें पेटला कीं आपला भोवताल प्रकाशवूं
शकतो. पण त्याच्याबरोबर त्याचा अंत होतो.
तुमच्या जीवन-ज्योतींचा प्रकाश जगांतील
देशांना मार्गदर्शक ठरला. तो तेवत ठेवण्यांत महात्माजींची
मलयजशीतलता उपकारक ठरली.

१०–१२–७२

## ७५ : उचलेगिरीचा प्रसाद

वडिलांबद्दल माझ्या मनांत भीतियुक्त आदर होता.
त्यांचे भाव-सामर्थ्य धैर्य आणि चातुर्य विलक्षण होते. आपले
प्रौढपण असे साकारावे असे मला वाटे. नोकर माणसांवर
ते रागावत तेव्हां त्यांचे अंगांग थरारे ते लाल होत.
त्यांचे ते दर्शन परिसर दुभंगून टाकणारे असे.
मी ही एकदां त्यांच्या रागाला बळी पडलो होतो.
तेव्हां मी सहा वर्षांचा असेन. त्यांच्या मेजावर दोन
पेनें होती ..उंची आणि आकर्षक, तीं पाहून
माझे मन लोभावले मनांत म्हटलं, " एकाच वेळीं
कुणी दोन्ही पेनें वापरीत नाही. आपण यांतले एक
उचलावे " आणि मी ते उचलले.
घरांत चोरीस गेलेल्या पेन्चा तपास चालू झाला.
मी हबकलो. मी जे काय केले त्या भीतीनें मला घाम सुटला.
तरीपण ते घेतल्याचे मी
कबूल केलें नाही.
अखेरीस माझी उचलेगिरी घरांतल्यांच्या लक्षांत आलीं.

पहाडाच्या कड्यासारखा वडिलांचा राग माझ्यावर
कोसळला. त्यानीं मला झोडपून काढले. त्या वेदनेनें
माझ्या देहाचा कणन् कण बधिरून गेला. मी बेशुद्ध
पडलो. माझी मानहानि मी आईच्या कुशींत लपविली.
पुढे कित्येय दिवस माझी पाठ ठणकतच होती.
पण ह्या कठोर शिक्षेने देखील
माझ्या मनांतील वडिलांबद्दलचा आदर कमी झाला नाहीं.
कारण ती शिक्षा अतिरेकी असली तरी
लाडावलेल्या वयांत वाढणाऱ्या मनाला जरब
बसवायला अशी अद्दल घडायला हवीच
अशी अखेरपर्यंत माझी समजूत होती.

२७-१-७३

: ७६ : अहिंसेची उपासना

स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं गांधीजीनी आयुष्यभर अहिंसेचा आणि
शांततामय मार्गाचा अवलंब केला,
इतकेच नव्हे तर इतरांचे मतपरिवर्तन करण्यासाठीं
त्यानीं आपल्या प्रभावी विचारसरणीचा प्रार्थनेतून आणि
प्रवचनांतून उपयोग केला.
त्यांची भाषा अनलंकृत आणि भावना निरहंकारी होती.
त्यांच्या दर्शनांत शांति असली तरी मनांत ज्वालामुखीची
दाहकता होती. त्यांनीं उच्चारलेला हरएक शब्द ऐकणाऱ्याच्या
अंतःकरणास जाऊन भिडे. कारण त्यांच्यामागे सिद्धार्थाची
तपश्चर्या होती.
त्यांनी दर्शविलेला मार्ग खडतर खरा,
पण तो चिरंतन स्वातंत्र्याकडे नेणारा होता.
म्हणूनच मी त्यांचे अनुयायित्व स्वीकारले.
'तरवारीचे तत्त्वज्ञान' या आपल्या लेखांत ते
लिहितात, "भित्रेपणा आणि हिंसा या दोहोंतून एकाची
निवड करावयाची झाली तर मी भारताला शस्त्र
हाती धरायला सांगेन. दुबळेपणांतून निर्माण झालेल्या
भीतीनें माघार पत्करण्यापेक्षां शस्त्र धारण केलेलें बरे.
पण मला वाटते कीं हिंसेपेक्षां अहिंसा कितीतरी
पटीने श्रेष्ठ.
पौरुषाचे दर्शन शिक्षेपेक्षां क्षमेत अधिक
प्रभावी असते. क्षमा हे वीराचे भूषण आहे. शौर्याने
एखाद्याला जिंकण्याचें बळ अंगीं असतांना त्याला
जो क्षमेनें जिंकतो तो संयमी . . . तो पुरुषोत्तम. दुबळ्या
जीवानी प्रतिकारापुढें मान वाकविणे म्हणजे हिंसेचे
पालन करणे नव्हे.
भारत हा एक दुबळा देश आहे असे इतरांप्रमाणे
मला वाटत नाहीं आणि त्या देशाचा

एक नागरिक म्हणून मीहि दुबळा नाहीं.
माझ्या मतें बळ हे 'बाहु' वाचक नसून
'भाव' वाचक आहे.
माझा ध्येयवाद व्यवहारी आहे. अहिंसेचा
धर्म ऋषिमुनींनींच आचरावा असे कुठें सांगितलेले
नाहीं. सर्व साधारण माणसाला देखील
तो कृतींत उतरवितां येण्यासासारखा आहे.
भारतीय जनतेसमोर मी फक्त आत्मयज्ञाचा प्रयोग
करीत आहे. अहिंसा आणि असहकार ही या यज्ञाची
दुसरी दोन नांवे आहेत. अहिंसेचे आचरण करणारे
ऋषिमुनी न्यूटनपेक्षां अधिक प्रतिभावान होते आणि वेलिंग्टन-
पेक्षां अधिक शूर होते शस्त्रानें होणारा संहार त्यानीं प्रत्यक्ष
पाहिला होता. म्हणूनच अहिंसेची थोरवी त्यांना समजली.
अहिंसा प्रभावी ठरायला हवी असेल तर
आत्मक्लेश पराकोटीला पोचायला हवेत.
जुलमीप्र तिकारापुढें सर्वस्वाचें समर्पण म्हणजे अहिंसा. अशा
उत्कट इच्छाशक्तीनें प्रतिकारासाठी उभी राहिलेली एक
व्यक्तीदेखील सम्राटाला नमविण्यास समर्थ ठरेल.
मला भारताला आत्म्याच्या अमरतेची
जाणीव करून द्यावयाची आहे. अखिल विश्वाचे
असुरी सामर्थ्य एकवटले तरी अहिंसक आत्म्यांपुढें
त्या विराट परंतु राक्षसी वृत्तीला लवावे लागेल.
तरवारीच्या धारेवर मिळालेल्या स्वातंत्र्याला
चिरजीवन नाही. तशी स्वातंत्र्यप्राप्ति माझ्या
भारताला नको आहे. त्याने आपल्या
आचरणानें जगापुढें एक वेगळाच आदर्श
ठेवावा असें मला वाटते."

महात्माजींच्या या अहिंसेच्या प्रात्यक्षिकाने
मी त्यांच्याकडे ओढला गेलो. शिष्याच्या
नात्यानें त्यांच्या जीवनाशी आमरण जोडला गेलो.
'आधीं केले आणि मग सांगितले' या
समर्थांच्या उक्तीचे ते एक उपासक होते

३०-१-७३

## : ७७ : जीवनांतला रंग नवा

किसानांच्या प्रतिनिधि-मंडळाचे नेतृत्व स्वीकारल्यावर मला एका वेगळ्या जगाचा शोध लागला.

त्यांचे जीवन-विषयक प्रश्न सोडवितांना मी शरमलो.

...मला दुःख झाले.

शरम...माझ्या सुखासीन राहणीची.

आणि वरच्या थरांतील मंडळींबरोबर कागदी राजकारणाची चर्चा करतांना श्रमलक्ष्मीची पूजा करणाऱ्या अर्धनग्न आणि अर्धभुक्त जीवांकडे बघण्याची.

त्या क्षेत्रांत पाऊल टाकले आणि माझी दृष्टि बदलली.

आपली व्यथा शब्दांत व्यक्त करतां न आल्यामुळें नजरेंत प्रश्नचिन्हें उभी करून पाहणाऱ्या त्या जीवानीं माझ्या अंतःकरणाचा ठाव घेतला.

माझ्या स्वप्नाळू पण कार्यक्षम मनाला नित्य नवे क्षेत्र हवेच होते, ते मिळाले.

पण त्यांच्याशी बोलतांना मला शिक्षकाच्या समजूतदारपणानें बोलावे लागे. सहानुभूतीनें वागावे लागे. भाषा साधी सरळ आणि सोपी वापरावी लागे. त्याना समजणारी आणि विचार करायला लावणारी.

ह्याचा परिणाम इतका झाला कीं आसपासच्या खेड्यांतून लोक मला पहायला येत. तसे पहायला गेले तर त्यांच्या प्रश्नांकडे जिव्हाळ्यानें पहाण्यापलीकडे मी काहीच करीत नव्हतो. त्यांतील कित्येकांना तर माझी भाषाही समजत नसे. पण भावना ओळखायला कित्येकदां ोळ्यांचे माध्यम पुरेसे होते.

आपल्या डोळ्यांतून ह्या मनांत उतरतो आहे, आपल्या पिचलेल्या मनाची ह्याला जाणीव आहे, याची त्यांना कल्पना आली होती.

अशिक्षित माणसें अधिक भावजीवि असतात.
. . . अधिक सुसंपन्न असतात. संस्कृति आणि शिक्षण यांचे प्रमाण बहुधा व्यस्त असते. त्यांच्या भक्तीच्या एकतारीचा सूर लागायला वेळ लागत नाहीं. कारण त्यांची वृत्ति आपल्या मानलेल्या दैवताशी एकरूप झालेली असते.
माझ्या लोकप्रियतेचे कारण ( मला वाटते ) माझ्या श्रोत्यांच्या डोळ्यांतून मनांत आणि जीवनांत उतरण्यांत आहे.
किसानांच्या हातीं घेतलेल्या या कार्यानें
माझ्या जीवनांत नवा रंग भरला.

१३–१२–७२

शिकण्याची उमेद होती तोपर्यंत वडिलांना देतां आले तेवढे आणि
मला घेतां आलें तेवढें शिक्षण मी घेतलें.
पश्चिम भूगोलार्धातील विज्ञान–विश्वाचे दर्शन
घेऊन मी मायदेशी परतलो.
परतलो तो उराशी मोठी आशा बाळगून.
पण . . . येथील राजकीय वातावरण गारठले होते.
क्रांतीच्या निखाऱ्यावर राख बाजली होती.
काँग्रेस ही एक मवाळांची संघटना झाली होती.
ऊबदार कोट आणि परीट घडीच्या पँट् घातलेल्या
इंग्रजी जाणणाऱ्या मध्यम वर्गीय उच्चभ्रू लोकांचे
वर्षांतून एखादे संमेलन भरे. तिथें सरकारच्या
वृत्तींचा निषेध करणारा एखाद दुसरा गुळमुळीत ठराव
पास होई. पण त्यांत क्रांतीचा स्फुल्लिग नसे.
प्रतिकाराचा प्रक्षोभ नसे.
१९१२ च्या नाताळमध्यें बंकीपूरच्या
काँग्रेस अधिवेशनांत मी प्रतिनिधि होतो. दक्षिण
आफ्रिकेंतून नुकतेच परतलेले गोपाल कृष्ण गोखले
या अधिवेशनास उपस्थित होते.
गोपाल कृष्ण . . . भारतीय किर्तीची . . . महात्माजींनी
गुरुस्थानीं मानलेली एक अलौकिक व्यक्ति. राष्ट्राविषयीच्या
राजकीय आणि सामाजिक विचारानें अहोरात्र पछाडलेली
जी काहीं चारदोन माणसें या देशांत मी पाहिली त्यापैकीं
ते एक होते
माझें स्वप्नाळू मन त्यांच्याकडे ओढले गेलें
उच्च शिक्षण घेऊनहि मला जे शहाणपण मिळालें नाहीं.
ते या अधिवेशनांतून केलेल्या अशा बारीक–सारीक कामातून
मला मिळालें. मनुष्य बुद्धीनें कितीही उंच असला

तरी अनुभवासाठीं त्याला कुठेतरी उमेदवारी केल्याशिवाय
आपल्या व्यक्तिमत्त्वाचे मोल वाढवितां येत नाहीं.
अनुभवाची क्षितिजें उंचावून नवे जीवन जगण्याची
उमेद निर्माण करते ती खरी उमेदवारी. काँग्रेसच्या
अधिवेशनांतून केलेल्या उमेदवारीच्या
बारीक सारीक कामांतूनच मला पुढील आयुष्यांत
राष्ट्राची जबाबदारी पेलता आली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## : ७९ : भिंतीचे भय पाकोळीला

नैनीच्या तुरुंगाच्या भिंती दिवसा देखील आकाशाला
झाकायला निघालेल्या वाटत. त्यांतून त्या वर्तुळाकार असल्यामुळें
तर मला तो बंदिवास अधिकच जाणवे. एकांत अंधारून जाई.
त्या भिंतीनीं वलयांकित केलेल्या आकाशाच्या तुकड्याकडे
मी उत्कंठित चैतन्याने पाही.
एखादा तरळता मेघ अगर लहरता पक्षी दिसला कीं
क्षणभर मनाला हलके वाटे.
चढत्या रात्रीं तर त्या भिंती माझेपण अंधारांत अधिकच
गुरफटून टाकीत.
मनाला खोल खो ..ल विहीरीच्या तळाशी असल्यासारखे
वाटे. पण त्या अवस्थेंतही आकाशाचें नक्षत्रांकित
निळे कंगोरे पाहून माझे मन उल्हसित होई.

माझी कोठडी कुत्ताघर या नांवानें ओळखिली जाई.
संवयीने साऱ्या गोष्टी अंगवळणी पडतात
हे खरें, तरीपण इतर गुन्हेगारांना तिथें रुळणे कठीण गेले.
तुरुंगाच्या रुक्ष वातावरणानें आणि खाण्याने कैद्यांची
प्रवृत्ति आणि प्रकृति खिळखिळी होते. पशु आळवतात
तो याच पद्धतीनें
पण मला मात्र बंदिवासांतील
हा काळ तितकासा विरल्यासारखा वाटला नाही. आयुष्याच्या
उत्तरार्धांत साकारलेली माझी अनेक स्वप्नें इथें मोहरली.
दगडी भिंतींचे भय संध्येबरोबर अंधत्व येणाऱ्या पाकोळीला.
पहाडाच्या कड्यावरून
मार्तंडाचें तेज प्राशन करणाऱ्या पक्षिराजाला नव्हे.

३१-१-७३

त्रिपुरा काँग्रेस-अधिवेशनाच्या कांहीं दिवस आधीं
गांधीजी आणि सुभाषबाबू यांच्यातील मतभेदाची पाझरती
जखम भरून येण्यासाठीं तूं मनोभावनेनें त्यांची शुश्रुषा
केलीस. सुभाषबाबूंचा कलही समझोता घडवून आणण्याकडे
होता. त्यासाठी त्यानीं तुझा सल्ला मानला. पण गांधीजींचा
निश्चय त्यांना काँग्रेसपासून दूर करण्याचा होता.
तू गांधीजींना लिहिलेस :–
" मला वाटतं मी दिल्ली येथें बोलल्याप्रमाणे
त्यांना अध्यक्षपद द्यायला तुमची हरकत नसावी. त्यांना
काँग्रेसच्या बाहेर ठेवण्यात आपण चूक करीत आहोत. "
परंतु गांधीजींची भूमिका ठाम होती.
ह्या मतभेदाचा समारोप महायुद्धाच्या संधिकाळांतच
झाला. सुभाषबाबूंची बंडखोरी चिरडली गेली. पण पंख
पिंजले तरी आत्मबलाच्या जोरावर गरुड क्षितिजें
उल्लंघू शकतो, इतकी त्याच्यांत इच्छाशक्ति असते.
तो प्रतिभावान गरुड भारताबाहेर भरारला तो न
परतण्यासाठी.
या घटनेनें तूं बेचैन झालास. कारण त्यांची
चैतन्यदायी झेप तूं पाहिली होतीस.
भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्व क्षितिजावर उधळलेल्या
' जयहिंद ' ह्या शब्दाचा अमरगंध तुझ्याही प्रतिभेंत
दरवळत होता.

२०–१२–७२

## : ८१ : संयमपूर्ण वक्तृत्व

" आज अनेक वर्षे आपण आपले भवितव्य उजळण्याचा
प्रयत्न करीत आहोत. देशाच्या मुक्तीसाठीं आपण सर्वस्वाचे दान
करण्याची शपथ घेतली. आज आपण सर्वस्वी नव्हे तरी बहुतांशी
त्या प्रतिज्ञेतून मुक्त झालो आहोत. मध्य रात्रीच्या
घटकेला जेव्हां सारे जग निशेच्या स्वप्नांत असेल तेव्हां भारत
आपल्या जीवन्मुक्तीच्या स्वप्नांतून जागा होईल. राष्ट्राच्या इतिहासांत
असा एखादा क्षण येतो कीं जेव्हां जुन्या जगाचा अंत होतो
आणि देशाच्या भावनांना शब्द फुटतो. आज ज्या कार्यसिद्धी प्रीत्यर्थ
आपण सोहळा साजरा करीत आहोत, ती उत्कर्षाच्या
सोपान-परंपरेची पहिली पायरी आहे. यापुढें आपणास
याहून महान विजय संपादन करावयाचे आहेत. शांति
ही दर्शनातीत आहे तशीच मुक्तीही आहे ... आणि तशीच
भरभराट.
त्याचप्रमाणें या विश्वावर आलेले युद्धाचें अरिष्ट
आपण सर्वांनी मिळून दूर करावयास हवे. हे माझे ...
हे तुझे असे विभाजन करून चालणार नाहीं. माणसा-
माणसांत जसें भावनात्मक ऐक्य हवे
तशी त्यानी हातीं घेतलेल्या कार्यांत एकात्मकता हवी.
दुसऱ्याचे दुःख ते आपले दुःख मानण्यातच खरे
सुख आहे."
१४ ऑगस्टच्या मध्यरात्रीं भारताच्या
मुक्ति-दिनीं तूं केलेल्या या भाषणांत गंगौघाची
धीरगंभीरता जाणवते. ऊतू जाणाऱ्या आनंदाच्या
घटकेला देखिल मनाचा तोल सांभाळणारे केवढे
हे संयमपूर्ण वक्तृत्व !

२२-१२-७२

## : ८२ : मी सुखावलो नसतो

भारत हा अमाप लोकसंख्येचा देश. शहरें गर्दीनें गजबजलेली.
अशा देशांत मनस्वास्थ्यासाठीं लागणारा एकांत मिळणेंच शक्य नाहीं
हे लक्षांत घेऊन, मी सिलोनला जायचे ठरविलें.
सिलोन...म्हटलें तर जवळ, म्हटलें तर दूर–अलिप्त.
तिथें ऐतिहासिक महत्त्वाचे अनेक भग्नावशेष आहेत, तसे
बुद्धकालीन मठ आणि पुतळेही आहेत. अनुराधापूर येथें वृद्धावस्थेंतील
बुद्धाचा पद्मासनस्थ महान् पुतळा आहे.
डहराडूनच्या तुरुंगांत असतांना माझ्या एका मित्रानें
त्या पुतळयाचे चित्र असलेली दिनदर्शिका मला पाठविली
होती. त्या चित्राच्या दर्शनानें माझे मन एकाग्र होई. त्याच्या
चेहऱ्यावरील उदात्त भावनेच्या छटा माझा मनोभार हलका
करीत. त्या एकांतात त्या चित्राचे दर्शन मनाची पोकळी
भरून काढण्याचे एक साधनच झाले होते.
पण माझ्या वृत्तीला बुद्ध आवडे तो धार्मिक
दृष्टीनें नव्हे. बुद्ध धर्माच्या तत्त्वप्रणालीभोवती माझ्या
मनानें कधींच फेर धरला नाहीं. मी भारला गेलो तो
त्याच्या चेहऱ्यावरील भारदस्त भावनेच्या छटानीं
बुद्ध भिक्षुकांची लौकिक विश्वांतील
विवंचनेपासून दूर राहणारी ती शांतवृत्ति
मला स्वीकारार्ह वाटली. त्या भिक्षुकांच्या
डोळयांत बुद्धीचा तजेला नव्हता. पण मानवी अंतःकरणांतील
काजळलेल्या कोनांत चाललेल्या पशुवृत्तीचें थैमानहि नव्हते
त्यांच्या दृष्टीनें जीवन हा काळाच्या महासागराकडे
संथपणानें वहात जाणारा गंगौघ आहे ..पतितांचा
उद्धार करणारा.

त्यांच्या त्या समाधानी वृत्तीचा मला
काहींसा हेवाही वाटायचा. पण त्याच वेळीं मला
हीही जाणीव व्हायची कीं आपलें जीवन
यांच्यापेक्षा सर्वस्वी वेगळे आहे.
मला त्यांची जगण्याची पद्धत अनुसरून चालणारे
नव्हते.
महासागराचे मंथन करणाऱ्या वादळाशी
झुंजणाऱ्या नावाड्यानें किनाऱ्यापासून दूर असलेल्या
पर्णकुटींतील शांति-दूताच्या मनोधर्माचे कौतुक
करावें, पण तसें होण्याचा विचार मनांत आणूं
नये.

माझ्या मनाला शांति हवी होती ती
विवक्षित काळापुरती. चिरंतन शांतीत मी
कधींच सुखावलो नसतो.

३-२-७३

## : ८३ : जगन्नाथाचा हात

गांधीजी भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर आले
तेव्हां राष्ट्रीय चळवळीत जोर राहिला नव्हता. जनतेला मार्ग
दाखवील असा कुणी प्रभावी नेता नव्हता. गांधीजीनीं तींत
नवचैतन्य निर्माण केलें. उद्‌भवलेल्या पेंचप्रसंगांतून मार्ग शोधला.

त्यांच्या मृत्यूनंतर केलेल्या भाषणांत तूं तो
आशय उत्तम तऱ्हेनें वर्णिला आहेस.
तो असा:– " तो कर्मयोगी सदैव आपल्या सर्वस्वी
प्रयोगांत मग्न होता. त्याची कार्यपद्धति आमच्याहून सर्वस्वी वेगळी
होती. आमच्या घोषणेनें आम्हांला मिळवून दिलें ते
फार थोडे. परंतु तो माणूस संयमी बोले कमी. घोषणा
त्यांनीं कधींच केली नाही. सरकार जवळ त्यानीं केलेल्या मागणींत
समजूतदारपणा होता. आक्रमणापेक्षां आवाहनाचा
मार्ग त्याच्या शांत वृत्तीनें पत्करला. मागणी मिळेपर्यंत
तो पाऊल मागें घेत नसे. म्हणून काहीं लोक त्याला
हटयोगी म्हणत असत. पण त्याच्या हटयोगांत दधिचीचे सामर्थ्य होते
त्याग, पावित्र्य आणि इच्छाशक्ति या त्रयींच्या बळावर तो एवढ्या
मोठ्या साम्राज्याला हलवूं शकला. "
त्याच शक्तीनें तुझ्या हातांत गीता दिली.
गीता परिणामावर भर न देतां आपल्या मनोधर्माला
पटेल ते करीत राहण्याचा आणि ते करतांना भगवंताचे स्मरण
करण्याचा मंत्र देणारा आर्यांचा एक पवित्र ग्रंथ.

त्याच शक्तीनें तुझ्या जीवनाला आध्यात्मिक बैठक दिली.
तुझ्या वृत्तींत शांतता शुचिता आणि निर्णायकता आणली

त्या जगन्नाथाचा प्रोत्साहनपर हात पाठीवर पडला नसता
तर तूं गंगेच्या प्रवाहांत प्रतिबिंबित झालेल्या अस्मानीं स्वप्नांत
आपल्या अमीरी वैभवाचा आस्वाद घेत राहिला असतास

१३-१२-७२

भारतीय मन आज शतकानुशतकें गंगालहरीवर तरंगत आहे. गंगेवर त्याची इतकी भक्ति आहे कीं कोणत्याही नदीला ते ‘ गंगामाता ’ म्हणून संबोधते. स्नानाचे पाणी अंगावर घेतांना ते ‘ हरगंगे भागीरथी ’ असा उद्घोष करते. भारतीय मनाचे गंगेवरील हे प्रेम नाभिकमलाच्या ओंकारांतून उमललेलें आहे. पतित मनाला पावन करण्याची आणि विचलित चित्त अचल ठेवण्याची शक्ति तिच्या आचमनांत आहे, अशी भक्तांची श्रद्धा आहे. तिच्या केवळ दर्शनासाठीं ते हजारो मैल पायीं प्रवास करते. तिच्या काठीं एखाद्या धर्मशाळेंत राहून महिने महिने व्रतवैकल्यें आचरून प्रापंचिक बंधापासून ते दूर राहते. कुठे तरी . . . भव्यतेंत दिव्यतेत उत्तुंगतेंत अथांगतेत तनमनाने विलीन होऊन प्रत्यक्षातून परोक्षाकडे जाण्याचा ते प्रयत्न करीत असते.

‘ तूंही एक भारतीयच . . . प्रयागच्या संगमाभोवती
बालपणींचा काळ सुखाचा ’ हरवून बसलेला. तुझ्या बाल्यां-
तील गंगा लहरली असेल ती एक ऋतुचक्राप्रमाणे
वेगवेगळी रूपें धारण करणारी महानदी म्हणून.
पावसाळ्यांत प्रलयकारी चंडिका म्हणून . . .
हिवाळ्यांत प्रसन्नवदना जान्हवी म्हणून . . .
आणि उन्हाळ्यांत तन्वीश्यामा महाश्वेता म्हणून—
तुझ्या कविमनाच्या निळ्या नजरेंत ती विविध रूपे
भरली. पण जसजशी तुझी प्रतिभा प्रगल्भ होत
गेली तसतसा त्या गंगा-तीरावर घडलेला इतिहास
तूं आपल्या आत्म्याच्या शीलेवर कोरलास
तुझ्याही मनांत— “ इथली गंगा : तारि अभंगा ”
हा वारकरी संप्रदायाचा अनुप्रासयुक्त चरण घुमला
असेल. परंतु तुझे अभंगत्व म्हणजे राष्ट्राच्या इतिहासांतील
सोनेरी पानांतील आशय होते, भाबड्या भाविकतेनें

घतलेलें ते आचमन नव्हते.
टाळकऱ्यांची भक्ति ही दैवताच्या कक्षेंत
रंगण घेणारी असते. ती फार तर अधःपात टाळूं
शकते. आवर्तनांतून तीरासारखा वेगानें पुढे जाणारा,
मोक्षाच्या पैलतीरीं नजर लाऊन मानवी मनाचे
विश्लेषण करणारा तुकाराम एखादाच. बाकी
सारे टाळकुटे. 'हटातटानें पटा रगवून शिरीं जटा'
धारण करणारे गोसावडे ... जगण्यासाठीं लाचारी पत्करणारे
आचारहीन विचारहीन.
गंगेवरील तुझे प्रेम जीवन गतिमान करणारे होते.
इतरांप्रमाणें 'ठेविले अनंते–तैसेचि रहावे'
असे स्थितिमान अवस्थेंत राहूं इच्छिणारे नव्हते.
भक्ति ही 'वर्तमान' विसरून भविष्याकडे दृष्टि
खिळवून 'असेल माझा हरी' करीत बसणारी
परंतु तूं–भूतकाळाचे ज्याच्यावरून दर्शन
घडेल आणि वर्तमान घडविता येईल असा
गंगातीरावरील घटनांचा अभ्यास केलास.
मंतरलेल्या पाण्याच्या अभिषेकानें
जीवनाचे वळण बदलते ही भावना तूं कधींच
आदरिली नाहींस
तुझे गंगादर्शन तुला भूतकालांत नेणारे
होते, वर्तमान काळाला प्रेरणा देणारे होते आणि
भविष्यकाळाला जवळ आणणारे होते.

२१–११–७२

## ८५ : आकाशापरि अलिप्त तूं

१९४७ मध्ये स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी काही महिने जातीय
विद्वेषाची ज्वाला भडकली असतांना आशियाई राष्ट्रांतील
राजकीय प्रश्नांत तूं मन घातलेस. जवळ जवळ वीस राष्ट्रानी
यात भाग घेतला. संस्कृति आणि भाषा या दोन्ही दृष्टीनी
सर्वस्वी वेगळ्या असलेल्या ह्या राष्ट्रानीं जागतिक राजकारणांत
आशियाई स्थान कुठें आहे, हें अजमावून पाहिले.
तुझ्या युगांतील दुसऱ्या कोणत्याही मुत्सद्यापेक्षां भोवतालच्या
जनतेची स्पंदनें तुला अधिक जाणवतात.
या प्रसंगी आशियांतील राष्ट्रांना जगात मान्यता
मिळावी आणि समान दर्जा प्राप्त व्हावा ही तीव्र इच्छा तं
आपल्या भाषणांत व्यक्त केलीस.
तूं म्हणालास, " आज कित्येक वर्षें आपण पाश्चात्यांच्या
दरबारांत अर्जदार म्हणून ओळखले जात आहोत. यापुढ
आपण हे लाचारीचे जिणें जगायचे नाहीं.
दुसऱ्याच्या स्वाधीन व्हायचें नाहीं. "

उद्यांच्या आशियाचे स्वरूप सर्वस्वी पालटणारी
ही परिषद तुझ्या कारकीर्दीतील स्मरणीय घटना म्हणून
उल्लेखिली जाईल. विशेष म्हणजे याच घटकेला इतर
पुढारी अंतर्गत सत्तेच्या लोभात रुतलेले होते.
तुझ्या ह्या पुढारीपणानें आंतरराष्ट्रांत भारताचे
वजन वाढले तुझं वेगळेपण सर्वांना आपल्यात सामावून
घेणाऱ्या आणि तरीही सर्वांपासून अलिप्त राहणाऱ्या
आकाशासारखे होते.

२१-१२-७२

## : ८६ : तो तुझ्यापेक्षां मोठा

तुझ्याइतका नवविध व्यक्तिमत्त्वाचा पुरुष जगाच्या पाठीवर
एखाद दुसराच असेल...अगर नसेल,
नबाबाला लाजविणारे काश्मिरी देखणेपण
संस्थानिकाच्या तोलाचे वैभव
आणि बृहस्पतीलाहि मागे टाकणारे चौफेर ज्ञान.
या त्रयींना तुझ्या सौजन्याने अधिक अलंकृत केले.
महात्माजींच्या सहवासांत तुझ्या विचार-विलासांना वाव
मिळाला. बेचाळीसच्या लढ्यापूर्वी कित्येक वर्षें अगोदर
त्यानीं ओळखिलें होते कीं तुझ्या हातांत भारतीय नौकेचे
सुकाणूं दिलें तरच ती स्वातंत्र्याचा किनारा गाठूं
शकेल. इतरांना दिशाज्ञान नाहीं. लागोपाठ फुटणाऱ्या
लाटांचे तडाखे त्यांना चुकवितां येणार नाहींत.

" जगांतील देशांत भारताबद्दलचें लोकमत
काय आहे ? " याची अचूक जाणीव असलेला
तूंच एक प्रभावी नेता त्यांच्यासमोर होतास. भारताचे
हे नेतेपण तुझ्याकडे सोपविल्यानंतर साहजिकच इतरांच्या
मनांत तुझ्याबद्दलची असूया अंकुरली असेल.

तुझ्या व्यक्तित्वांतच मुळी कुणालाहि हेवा
वाटावा इतक्या गुणांचा ठेवा होता. तुझ्या बरोबरीच्या
सर्वांच्यांतील एकेक गुण तुझ्यांत, होताच. पण तुझ्यांतील
एकापेक्षां अधिक गुण कुणाच्यांतच नव्हते.
मंदिरांतील जागत्या दैवताभोवती तेवत
राहणाऱ्या असंख्य ज्योतींप्रमाणें तुझे जीवन देखील
ज्योतिर्मय होते खरे. पण त्या ज्योति देवापेक्षां आपल्यालाच
प्रकाशांत ठेवणाऱ्या होत्या. तुझे तेज गजा :—

गजामधील अंतर दर्शविणाऱ्या पणतीसारख नव्हते.
देव्हाऱ्याच्या स्तंभाची भव्यता भासमान करणाऱ्या
समईसारखे नव्हते. तर दैवताच्या जवळ राहून त्याच्या
मुखमंडळावरील रेषान् रेषा प्रकाशमान करणाऱ्या
नंदादीपासारखे होते

भारतीय स्वातंत्र्य-मंदिरांतील हे तुझे स्थान
जवळच्यांत नेणताच वैर उत्पन्न करणारे होते
आणि दूरच्यांत देखील तुझ्या कैवाऱ्याबद्दल मनांत वैर
धरणारे होते तूं मात्र अजात शत्रू
होतास. ज्याला आपलें शत्रूहि अखेरपर्यंत ओळखतां
आले नाहींत तो अजातशत्रू, या अर्थानें. पण ज्या
जवळच्यानीं तुझा कधींच हेवा केला नसेल. तो मात्र
तुझ्यापेक्षां मनानें मोठा असंच मी म्हणेन.

१४–११–७२

बोलायला उभी राहिलेली प्रत्येक व्यक्ति सभा जिंकीलच
असे नाहीं. समुदायाचे मन जिंकण्याची कला फार थोडयांजवळ
असते त्यापैकीं तूं एक
तसें म्हटलें तर तुझ्या भाषणांत वक्तृत्वाचे कोणतेच
पैलू नव्हते त्यांत विचार-दर्शनाची चौकट नसे. मनांतला
विचार तंत्रांत बसवितां येतो तो उत्तम वक्ता.
विचारांच्या आविष्कारांतील तो रेखीवपणा डॉ. राधाकृष्णन्
यांच्या वाणीत आढळतो.
तरीपण तुझे भाषण जनतेच्या मनाला मोठी मेजवानी
वाटे याचे कारण तुझ्या प्राणाच्या ताम्हनांत श्रोत्यांच्या मनाचे
निरांजन तेवत असे. तुझ्या भावनेच्या ज्योतीवर एकेक कल्पना
कर्पूराप्रमाणें जळत असे. भक्तीची तळमळ अनेकांच्या उरीं असते.
पण कातडे बचावून ती व्यक्त करणारे कोण आणि समर्पणाच्या
भावनेनें आंतडे पिळवटून व्यक्त करणारे कोण, हे जनता बरोबर
ओळखते.
भुकेल्या जिवाला भाकरीचे तत्त्वज्ञान सांगून चालणार
नाहीं त्यांच्या हातावर तुमच्या थाळींतला घास ठेवला.
नाहींत तर माध्यान्हीच्या घटकेला तो थाळी हिसकावून घेईल.
जनतेला जीवनांतल्या तत्त्वज्ञानापेक्षां जगण्यांतला तपशील हवा असतो.
म्हणूनच
मनांतले मुठींत ओतणारा तुझ्यासारखा वक्ता लाखांच्या सभा
मंत्रमुग्ध करूं शकतो.
तुझ्या मनांत कित्येकदां विचारांचा गोंधळ उडे. त्यामुळें त्यांत
विसंगती निर्माण होई.
वाक्यरचना अचूक शब्दांसाठी थबके.
मुद्दे मागेपुढें होत. तरीपण तुला ऐकतांना लोक कंटाळत
नसत.

" ह्या नेता प्राणापलीकडले प्रेम आपल्याला देत आहे, राजवाडचा
तील अमीरी सुखाचा त्याग करून आपल्यासाठीं झिजत
आहे, " याची जाणीव जनतेला होती, म्हणूनच वाणींत
मैदानी वक्तृत्वाचे गुणधर्म नसूनसुद्धां मैदान भरून
उरणाऱ्या श्रोत्यांच्या पायाखालील धुळीला ध्येयाच्या
दिशेनें उधळण्याचें सामर्थ्य तुझ्या वाणींत होते.

ती वाणी शरद्ऋतूंतील चांदण्याचा ठेवा
उराशी धरून चालणारी मंदाक्रांता मंदाकिनी नव्हती
तर श्रावणांतील मेघमालेचा ठेवा रिता करणारी,
परिसरांतील लाखो मैलांचा प्रदेश आपल्यांतच
बुडवून टाकणारी ती कल्लोलिनी होती.

२३-११-७२

" मला असत्याकडून सत्याकडे ने !
अधाराकडून प्रकाशाकडे ने !
मृत्यूकडून अमरत्वाकडे ने ! "
हे गायत्री मंत्रांतील चरण अजूनही लाखो
भाविक मोठ्या आस्थेनें गातात
राजकीय दृष्टया भारताची छकलें झाली असली
तरी त्याचा स्वतःचा असा एक विशिष्ट सांस्कृतिक
वारसा आहे संकटाच्या घटकेला त्याची ऐक्याची
भावना जगाला थक्क करणारी असते भूगोला-
वरील इतर प्राचीन देशांप्रमाणें इथेही सत् असत्
प्रवृत्तींचे मिश्रण आहे पण इथें जे चांगले होते ते
जगाच्या निदर्शनास यावे तितके आले नाहीं दुर्वृत्तीचा
दुर्गंध मात्र दिशादिशांत पसरला.
इंग्रज आले. पण दीड शतक त्यानीं
राज्य केलें ते भारतीय देहावर, मनोवृत्तीवर
नव्हे त्यानीं भारताच्या डोळ्यांतून मनांत उतरण्याचा
प्रयत्नच केला नाहीं. तशी त्यांना जरूरही भासली
नाहीं, आणि भारताची भूमिका परवशतेंतून निर्माण
होणाऱ्या लाचारीची होती इतक्या दीर्घ कालापर्यंत
दोघे समोरासमोर होते. त्यानें मनाचा परकेपणा जाऊ
शकला नाहीं परस्परांना जाणण्याची त्यांच्यांत तितकीशी
ओढ नव्हती. रंगण्यासारखा प्रश्न डोळ्यांसमोर असतो
तेव्हांच अंतरंगाचे उत्तर सांपडते.
आर्थिक दृष्टया भारत अवनत असून देखिल
त्याच्याजवळ मनाचा उमदेपणा आणि दृष्टीची
विशालता आहे. नारिकेल फळासारखा त्याचा देह
दर्शनीं करडा असला तरी आत्मा अमृतमयी आहे

युगानुयुगें त्याने ज्ञानाची उपासना केली आहे.
परकीयांशी व्यापार-धंदा केला आहे.
परमोच्च वैभवाचे दिवस जसे त्याने उपभोगिले
आहेत, तसेच अत्यंत मानहानीचे प्रसंगही सहन
केले आहेत परंतु हे करीत असतांना त्यानें आपली अतिप्राचीन
संस्कृति सोडली नाहीं. तींतून त्यानें सामर्थ्य आणि चैतन्य मिळविलें
आहे. घटियंत्राच्या लंबकाप्रमाणे त्या संस्कृतीनें आंदोलने घेतली
आहेत. आपल्या विचार-वैभवाला 'स्वर्गीय ठेवा' म्हणून नामाभिधान
प्राप्त करून दिलें आहे

भारत-दर्शन हे जगांतील कोटयावधींच्या दृष्टीला
मातेच्या दर्शनासारखे वाटते. भारतमाता ही विश्वोद्धार चिंतिणारी
एक स्त्री आहे. वयानें वृद्ध पण वृत्तीनें चिरतरुण
निराधार . . . करुण नजरेची . . . परकीयांकडून अमानुष वागणूक
मिळालेली आणि आपल्या संरक्षणासाठीं आपल्या लेकरांचा
धावा करणारी. तिची मुले विशेषेकरून शेतकरी कामकरी
पेशांतील आहेत . . . मातींत मळलेली . . . कारखान्यांत काजळलेली.
अशा मुलांची माता दर्शनी सुंदर कशी असणार ?
भारताला हजारो वर्षांचा इतिहास आहे, जगाच्या डोळयांत
भरणारा लष्करी विजय त्यानें कधींच मिळविलेला नाही. संपत्तीचा
लोभ त्याला कधींच सुटला नाहीं. " सत्तेच्या मागे लागणाऱ्याना
प्रतिष्ठा लाभत नाहीं. सेवा करणाऱ्यांच्या चरणीं ती नम्र होते "
हे त्यानें ओळखले आहे.

शेकडो शतकांच्या वादळी वातावरणांत ह्या संस्कृतीनें
आपलें बाह्य अवशेष कसेबसे टिकवून धरलें आहेत.
पण अंतरंग ? आज तिला वनिया वृत्तीच्या बलवान अशा
पाश्चात्यांशी मुकाबला करायचा आहे. ह्या वृत्तीपुढें तिला
नमावे लागेल. कारण तिच्याजवळ शास्त्रीय शोधाचे

सामथ्य नाहीं. त्यानें लाखांच्या भाकरीचा प्रश्न सुटणार आहे.
भारताला आपल्या अंगावरली जीर्ण वस्त्रे टाकून नवीन धारण करावी
लागतील. पण ती वस्त्रे त्याच्या
आर्य–प्रवृत्तीला शोभणारी हवीत.
तुझ्या आत्मचरित्रांत अशा आशयाचे
अनेक उतारे आहेत. यावरून आर्य–प्रवृत्तींत
विचारांचा केवढा संयम आढळतो, हे लक्षांत
यईल.

१२–२–७३

## : ८९ : तुझेपण उजळले

" मित्रांनो आणि सहकाऱ्यांनो !
आपल्या जीवनांतला प्रकाश गेलेला आहे.
चहूंकडे अंधार दिसतो आहे. आपला प्रिय नेता ...ज्यांना
आपण बापू म्हणत असूं . ज्यांना आपण राष्ट्रपिता म्हणून
गौरविले . तो यापुढें आपल्यांत नाहीं. असे म्हणण्यांत
कदाचित् माझी चूक होत असेल. कांहीं झालें तरी इतकी
वर्षे आपण जसें त्यांना प्रत्यक्ष पहात होतो, तसे
ते आपल्याला पहावयास मिळणार नाहींत.
वेळ प्रसंगीं त्यांचा सल्ला विचारण्यासाठीं त्यांच्याकडे
आपल्याला धाव घेता येणार नाहीं. त्यांच्यापासून
मिळणाऱ्या हितोपदेशाला आपण आता मुकलो. देशावर
हा एक वज्राघातच झालेला आहे.
प्रकाश गेला असं मी म्हटलं पण नाहीं. तो गेलेला नाहीं.
कारण ह्या देशाला प्रकाशमान
करणारी त्यांची जीवन-ज्योत इतर ज्योतीसारखी मर्यादित
काळापुरती जळणारी नव्हती. ती या देशाला पुढील
शेंकडो वर्षे प्रकाशांत ठेवील. असंख्य आत्म्यांना
ती ज्योत बुद्धाची शांति देईल.
त्या ज्योतीची वलयें केवळ वर्तमान काळाच्या कडा
उजळणारी नव्हती. तर जे जे सजीव
आहे शाश्वत आहे, सन्मार्गाचें स्मरण करून देणारे
आहे, वामांगापासून दूर ठेवणारे आहे, त्याचे दर्शन
घडवून या देशाला मुक्तिमार्ग दाखविणारी होती."

बुद्धानंतर भारताला याच अमर-ज्योतीनें
आपल्या जीवन-मूल्यांची जाणीव करून दिली आणि
त्याच ज्योति-वलयांत तुझेपण उजळले.

२३–१२–७२

## : ९० : हिमनगा !

( तुरुंगाच्या गजांतून दिसणाऱ्या हिमशिखरांच्या दर्शनाने मनांत आलेले विचार )

हिमनगा !
तुझ्या दर्शनी दंग
इथें मी ... तुझ्या दर्शनी दंग
घटका घटका बघत राहतो तव शिखरांचे रंग

मानदंड तूं या देशाचा
संरक्षक सीमा-रेषांचा
विषय कितींच्या उन्मेषाचा
अनंतास तव संग
लाभतो अनंतास तव सग

ही येथिल अंधार कोठडी
भल्या भल्यांची ईर्षा रगडी
माझेही करि जीवन दगडी
कुठले भाव-तरंग ?
अंतरी कुठले भावतरंग ?

मजभवतीचे विश्व अमानुष
ह्या एकांती पिचते पौरुष
परी शंकरापरि पचविल विष
मम वाचन-व्यासंग
जागता मम वाचन-व्यासंग

बंध-मुक्तिचा ध्यास चिरंतन

व्यापुनि उरले अवघ जीवन
चिंतनेच वाढते तपोधन
आणिक वृत्ति अभंग
राहते आणिक वृत्ति अभंग

अचल उभा तूं उशागतीला
जागवीत स्वातंत्र्य-रतीला
मरगळलेल्या मनस्थितीला
तूं गमसी बजरंग
आमुच्या तूं गमसी बजरंग

हिमनगा !
तुझ्या दर्शनीं दंग
इथें मी तुझ्या दर्शनीं दंग

८-२-७३

## :९१: बुध्दाची विचार-पल्लवी

साठी उलटल्यावरचा तुझ्या जीवनांतील लक्षांत यण्याजोगा
फरक म्हणजे बुद्धाच्या विचार-पल्लवीची तुझ्यावर
पडलेली छाया. याचे कारण धर्मभोळेपणाविषयीं
तुला वाटणारा तिरस्कार आणि तुझें अहिंसामय आचरण.
रशियन नेतां निकिता क्रुश्चेव्ह यानीं जेव्हां
तुला अभिमानाने सांगितले कीं आमच्या शास्त्रज्ञांनी लाखांचा
संहार करणारे एक महाभयंकर अस्त्र शोधून काढलें
आहे, तेव्हां त्याची ती अहंकारयुक्त भाषा शांतपणे ऐकून
घेऊन तूं म्हणालासः–
" दोन हजाराहून अधिक वर्षापूर्वीं भारतावर
परम-चक्रधारी अशा एका महान् योध्द्याचे राज्य होते.
त्याचे नांव सम्राट अशोक. अखंड युद्ध-प्रयत्नानें त्यानीं
आपल्या राज्याचा विस्तार वाढवीत वाढवीत दिगंतापर्यंत
नेला. त्याचे सरसेनापति पराजय घेऊन कधींच परतले
नाहींत. हरएक लढाईत लाखानें सैनिक मरत आणि तितकेच
गुलाम म्हणून ताब्यांत घेतले जात. या परिणामानें सम्राट
अस्वस्थ झाला. ह्या कसाई-वृत्तींतून त्याला उपरती झाली.
सिंहासनावरून उठून त्यानीं आपले खड्ग म्यानांतून बाहेर
खेचले. त्याचे तुकडे तुकडे केले आणि तो गर्जला,
" पुरे झाली ही प्राणहत्त्या. यापुढें माझ्या मातींत
चंदनाचा गंध आणि मनःशांतीचा आनंद राहील. "
क्रुश्चेव्हने हे तुझे शहाणपण शांतपणे
ऐकून घेतले. मानवतेचे सूक्त उद्घोषणाऱ्या
या कथेवर भाष्य करण्याचें त्याच्या
मनांतहि आले नाहीं. अण्वस्त्राला अहिंसेची ओळख
पटली होती.

३१-१२-७२

## ९२ : प्रेरणा

भारतीय राजकारणांत गांधीजींचा प्रवेश अगदीं
योग्य त्या घटकेला झाला. परंपरागत प्रवृत्तीवर जगणाऱ्या
आणि परकीयांकडून शतकानुशतकें छळल्या गेलेल्या
या देशांची कैफियत जगापुढें मांडायला त्यांच्या सारखाच विशाल
मनोवृत्तीचा माणूस हवा होता.
त्यांच्याच प्रेरणेनें मी स्वातंत्र्य लढ्यात उतरलो.
लोकांच्या मनावर त्यांची विलक्षण पकड आहे.
त्या लोकसत्तेचे विराट स्वरूप जेव्हां ब्रिटीशांच्या दर्शनास
येईल तेव्हां ते आपोआप हा देश सोडून जातील.
भारतीयांच्या मनांत त्यांनीं निर्भयतेची
जाणीव उत्पन्न केली. त्यांना पुरुषार्थाचा व्यापक
अर्थ समजाऊन सांगितला. शिस्तीचे आणि सहनशीलतेचें
पाठ दिले. उन्मत्तांना अहिंसेनें जिंकताना
होणाऱ्या आनंदाची सोदाहरण कल्पना दिली.
ते म्हणत, " धैर्य हा चारित्र्याचा पाया आहे. त्याच्याशिवाय
धर्म नाहीं, नीति नाहीं आणि प्रेमही नाहीं. भीतिग्रस्त माणसाच्या
तोंडून सत्याचा उच्चार होणार नाहीं. भीतीचा मी हिंसाचारा–
इतकाच धिक्कार करतो. आत्मत्यागाशिवाय आणि
शिस्तीशिवाय जीवनांत मुक्ति नाहीं–प्रगतीची आशा नाहीं. पण
त्यांचबरोबर शिस्तीशिवाय केलेल्या त्यागाला मोल नाहीं. "

प्रवचनांतून ते धर्मावर अधिष्ठित
असलेली जीवनविषयक उद्धाराची सूक्तें वापरीत. पण
त्यांच्या शब्दामागें साम्राज्य उलथून पाडण्याचे सामर्थ्य
होते. आणि जगाला त्याची जाण होती.
मी साकारलो तो त्यांच्या याच प्रेरणेंतून.

## : ९३ : विरक्ति

तुझ्या अनेक आवडींत निसर्गाच्या सान्निध्यांत यथेच्छ
हुंदडण्याची एक आवड होती. एकदां तूं शिकारीला गेला
होतास. चित्त्या-लांडग्यासारखे एखादे हिंस्र श्वापद
अंगावर यावे नि त्याला पहिल्याच गोळींत आपण
खतम् करावे हें तुझ्या साहसी वृत्तीचे स्वप्न. पण पुढें
आला तो हरिणांचा कळप...भगवंताचे ध्यान करणाऱ्या
मीरेच्या गळयांतील विस्कळलेली रुद्राक्षाची माळ.
जमिनीला स्पर्शही न करतां अस्मानाच्या दिशेनें
धांव घेणारे राजीव...निष्पाप जीव. त्यांच्या
दर्शनानें तुझ्या मनांत कोमलतेची भावना स्पर्श
करते न करते तोंच तुझ्या बंदुकीतून
गोळी सुटली नि त्यांतील एक पाडस खाली
कोसळले.
त्या कमल-कोमल देहांतून उडालेले रक्त
गतप्राण झालेले ते दोन प्रश्नचिन्हात्मक डोळे पाहून
तुझे चित्त विव्हळले. त्या क्षणापासून तूं शिकार
सोडलीस. महात्म्याचे शिष्यत्व पत्करणाऱ्या वृत्तीचा
उगम ह्या विरक्तींत आहे.

१-४-७३

## : ९४ : तुरुंगाची देवालये झाली

गेल्या शतकापर्यंत तुरुंगाबद्दल भारतीय जनतेच्या
मनांत दरारा होता. तिथें जाणाऱ्याबद्दल अनादर होता. चोर दरोडेखोर आणि खुनी यांचीच ती विश्रांति स्थानें असतात अशी समजूत होती. तुरुंगाची शिक्षा भोगून आलेल्या कैद्याकडे लोक प्रश्नचिन्हात्मक दृष्टीनें पहात. आणि त्या काळी होतंही तसंच.
विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकापर्यंत तुरुंगांत जाणाऱ्याला
प्रतिष्ठा नव्हती. जनतेची, शेजाऱ्यांची इतकेच नव्हे तर स्वकीयांची
सहानुभूति तो गमावून बसे. त्याचे दर्शन तिरस्करणीय असे.
पण स्वातंत्र्यवीरांच्या आणि लोकमान्यांच्या तुरुंगवासानें
तेथील अंधाराला उजाळा दिला. तेथील भिंतीना बुद्धकालीन
गुहांच्या शीलांचे महत्त्व प्राप्त करून दिले आणि
जनतेच्या सेवेने मळलेल्या तळव्यांचा स्पर्शाने तेथील गजांना
माणुसकीचा ओलावा दिला.

१९२० पासून तर तुरुंग ही भारतीयांची
मंदिरेच झाली. स्वातंत्र्यप्राप्तीच्या जिद्दीने पेटलेल्या देशभक्तांनी

सर्वस्वावर तिलांजली ठेवली होती. सारी माणसे ' भग 'वंत
होण्यासाठीं आपण होऊन तुरुंगाच्या गजाआड गेली होती. मानवतेची
गीता चिंतिण्यासाठीं जो एकांत लागतो तो
बाहेर राहून तितकासा मिळत नाहीं. भावसमाधि लागते तेव्हांच
आंत-बाहेरच्या व्यधि-उपाधि विसरतां येतात. म्हणूनच मनस्विनीनीं
हा तुरुंगाचा मार्ग पत्करला.
लौकिक सुखाचा भोग जितका कमी करतां येईल तितका करावा,
ही शिकवण महात्माजींनी भारताला दिली. गरजा वाढत चालल्या
कीं त्या भागविण्यासाठीं माणूस नवनवीन उपाय शोधूं लागतो. जवळ
असलेली अक्कल तो नसत्या ठिकाणी वापरतो. आणि अंती अनेक
अपप्रवृत्तींच्या आधीन होतो. म्हणून जीवनांतील गरजांची

बेरीज उलटया क्रमांकानें शून्याकडे येऊ द्या, असे त्यांचे
सांगणे आणि त्याआधीं वागणें होते.

तुरुंगाच्या भिंतीआड माणूस दीर्घकाल राहिल्यावर तो मनानें
'माणूस' म्हणून उरणे कठीण. त्याच्या देहाची तर धूळधाणच होते. पण
भारतीय स्वातंत्र्याचे युद्ध तर माणसाला स्वतंत्र माणूस म्हणून
जगण्याच्या हक्कासाठीं सुरु झाले होते. त्यामुळें मुक्तीसाठीं
तुरुंगांत गेलेला प्रत्येक बंदी उत्तर आयुष्यांत माणुसकीनें जगला.

तुझ्यासारख्या आनंदभवनांत बादशाही वातावरणांत
वाढलेल्या नेत्यांनी महात्माजींच्या पावलानीं मळलेल्या बंदिशाळेचा
हा मार्ग पत्करला. तेव्हापासून तुरुंगवासाला अधिकच
प्रतिष्ठा प्राप्त झाली. राजकीय नेत्यानीं याच
बंदिशाळेच्या भिंतीवर आपल्या श्वासानीं कोरलेली
वचनें जग आज सूक्ते म्हणून प्रवचीत आहे.
ह्या तुरुंगाची तुम्हीं मंडळींनी देवालये केलीत.

## : ९५ : धरणें नव्हेत, स्वप्नें

राष्ट्रीय धुरंधरांच्या पापण्यांतील स्वप्नें सत्यांत उतरायला
हवी असतील तर मेघांच्या कुशींत वीज लवायला हवी ..
...पेरलेले बीज रुजायला पायाखालील जमीन भिजायला हवी ..
यासाठीं तूं पंचवार्षिक योजनांचा उद्घोष केलास.
देशाच्या जीवनांतील दारिद्र्याच्या वेदना कमी होण्यासाठीं तुझी
ही ओंकारमय वाणी आहे. कोणतेही कर्तृत्व
आकाराला येण्यासाठीं नाभिकमलाच्या कोषातून श्रद्धायुक्त
अंतःकरणानें उमटलेला ध्वनि म्हणजे ओंकार. आंतड्यांना
पीळ पडल्याशिवाय तो ध्वनि कंठांतून ओठापर्यंत चढतच नाहीं.

तुझ्या पंचवार्षिक योजनेंतून आकारलेले अनेक प्रकल्प
ही नव्या भारताची स्वप्नें आहेत. सतलज नदीवरील भाक्रा
धरण हे त्यापैकींच एक उत्तुंग स्वप्न होय.
ह्या धरणाच्या पाण्यानें सारे राजस्थान फुलून
निघेल. जगांतील सर्वांत उत्तुंग आणि विशाल असें
हें धरण बांधताना कारागिरांनी वापरलेलें साहित्य
साध्या बॉंब्-पतनानी दुभंगणारे नाहीं. भारतावर
जर उद्या शेजाऱ्यांनीं अणुबॉंब् टाकलाच तर ते फुटेल.
पण त्या विध्वसनांत त्या शेजाऱ्याचाच सर्वस्वी
नाश होईल. पानशेतनें फक्त पुण्याचाच अवशेष फस्त
केला. पण ह्या धरणानें पाकिस्तानची पंचवीस
वर्षाची प्रगति रसातळाला जाईल.
अशा स्वप्नांतूनच 'वंदेमातरम्'
गीताच्या 'सुजलां सुफलां सस्यशामलाम्' ह्या
चरणांचा अर्थ आपल्याला भविष्यकालांत
प्रत्यक्षांत उतरविता येईल.

१८-२-७३

## : ९६ : गीता

बापूंची आठवण झालीं की तूं गीता हाती घेत असंस.
भारतीय मनाला गीता आणि सीता ही दोन नांवें
जिवापाड प्यार.
गीता हा आर्यांच्या जीवनांतील गहनगूढ प्रमेये उकलणारा
ग्रंथ आणि सीता ही आर्यमनाला सहनशीलतेचे
पाठ देणारी आदर्श गृहिणी.
वेचक शब्दांत मांडायचे तर...

‘ सहनशीलता सीता
संयम शिकवी गीता ’

– हे असे.

स्वातंत्र्य – लढ्यांत तुरुंगांतील यातनामय
एकांतात सैनिकापासून सेनापतीपर्यंत अनेकांना
गीतेनें तारले. कुणी तिच्यांतील रहस्यांची उकल
केली, कुणी तिच्यावर प्रवचनें दिली तर कुणी
तिच्या हृदयांतील नवनीत घरोघरी पोचविले.
कुरुक्षेत्रावर धर्मयुद्धासाठीं सज्ज झालेल्या
पार्थाच्या विचलित मनाला ताठपणें उभे करण्याचे
सामर्थ्य गीतेंत आहे.

भारतीय युद्धांत तुझी भूमिका पार्थाचीच
होती. बापूजी तुझ्या मनोरथाचे सारथी होते. गीतेच्या
अखंड अध्ययनांतून स्फुरलेल्या त्यांच्या वाणींतून
तू प्रेरणा घेतलीस. पण त्यांच्या मृत्यूनंतर...
मनाची बैठक अढळ राहावी म्हणून तूं गीता
हातीं घेत असंस.

## : ९७ : जमीन-अस्मान

महात्माजी राजर्षि होते. त्यानीं दोन पुरुषांचे व्यक्तिमत्त्व
पुरेपूर जाणले नि त्यांना जवळ केले.
त्यांतील एक तूं आणि दुसरे विनोबा.
अहिंसेतून स्वराज्य पहाण्याचे त्यांचे स्वप्न दिसायला
अस्मानी वाटले तरी त्यांतील सत्य मातीतूनच अंकुरले
होते.
विनोबांची राहणी आणि विचारसरणी
मातीची स्पंदणें ऐकणाऱ्या ऋषींची .. म्हणून ती
भूदानाकडे वळली.
तुझी राहणी आणि विचारसरणी पाश्चात्य विज्ञानाच्या
प्रगतीनें रंगलेली...म्हणून ती अस्मानाचा वेध
घेणाऱ्या यंत्र-सामर्थ्याकडे वळली.
विनोबानीं मातींतून माणूस उभा केला नि त्या माणसाला
वेदांतील ऋचाचा भावार्थ अतिशय
सोप्या भाषेत सांगितला.
तूं . वरुणाच्या दानानें रित्या झालेल्या
मेघांच्या पखालीसाठीं धरणें उभी केलीस.
विनोबांनी महात्माजींच्या आचाराचा अर्थ लाविला.
तूं त्यांच्या विचारांचे स्वनिल रंग वेगवेगळे
करून दाखविलेस.
विलक्षण सौजन्यशीलतेनें तुम्ही दोघे
महात्माजींच्या चरणीं विलीन झाला नसतात,
तर भारतीयांच्या नजरेला आज स्वप्नांतील
स्वर्ग सत्यांत उतरलेला दिसला नसता.
तुम्ही दोघे त्यांच्या कल्पनेंतील
जमीन–अस्मान एकरूप करणारे भगीरथ–पुत्र
आहांत.

१८–२–७३

## ९८ : ' त्या ' दिवसाचे दर्शन

भारतीय अंतरिक्षांत एकाच वेळी दोन परस्परविरोधी
प्रवृत्तींच्या ग्रहांचा प्रभाव पडलेला इतिहासानें पाहिला
तो बराचसा स्वातंत्र्यापूर्वीच्या दीड-दोन दशकांत आणि
थोडासा नंतरच्या अडीच-तीन वर्षांत.
हे दोन ग्रह म्हणजे एक वल्लभभाई आणि दुसरा तू.
एक अन्यायाविरुद्ध वज्राची झेप घेणारा आणि
दुसरा अनुनयानें चंदनाचा लेप देणारा.
एक शेतकऱ्यांच्या नांगरासारखा कठोर...श्रमाने
जमीन भुसभुशीत करणारा. दुसरा वरुणाच्या कारुण्यानें
ओथंबलेला . . . बापूजींनी पेरलेली बीजें
फुलविणारा.
एक सूर्यासारखा प्रखर. अंधाराला छेद देणारा. दुसरा
चंद्रासारखा प्रसन्न . . . स्वप्नांचा वेध घेणारा.
एकाची मूठ प्रतिकारासाठी वळलेली. दुसऱ्याची
अंजलि अनुकारासाठी जुळलेली.
एकाची नजर अंतर्भेदी . . . मातृभूमीच्या सीमा
रक्षण करणारी. दुसऱ्याची नजर विश्वाशी
सुसंवादी . . . दिगंताच्या कोनांत संचारणारी.

परंतु तू . . . महात्माजींना जवळचा.
साहजिकच आहे. सत्य अहिंसेच्या उपासकाला
सूर्यापेक्षां चंद्रच दर्शनीय वाटणार. पहायला
गेलं तर ' त्या ' दिवसाचे दर्शन दोघांच्याही
भ्रमण-गाथेंत आहे.

१०-२-७३

१९९ : जखमी पक्षीण

तुरुंगातून माझी सुटका फक्त अकरा दिवसापुरतीच होती.
कमलाच्या दुखण्यापाण्याची विचारपूस करण्याइतक्या अपुऱ्या
दिवसांची. मी बाहेर आलो खरा, पण माझे मन राजकीय विचारांत
रंगण्यापेक्षां कमलच्या विचारानीं दुभंगले होते.
मी पाहिले तो ती अत्यंत कृशावस्थेंत आपल्याच
छायेंत पडून होती. दीर्घकाल ठाण मांडून बसलेल्या दुखण्याचा
दुर्बल प्रतिकार करीत. काहीं दिवसांतच तिला मी दूरावणार
या असह्य कल्पनेने मला पछाडलेले होते. आमच्या
विवाहाच्या अठरा वर्षांचा कालांतील घटनांची मनांत उजळणी
चालली होती. लग्नांत मी सव्वीस वर्षाचा होतो आणि ती फक्त
सतरा वर्षाची यौवनगंधा. भोवतालच्या जगाच्या मतलबी नजरेंतील
रंग न जाणण्याइतकी निरागस. आमच्या वयांत
अंतर फार होतं...पण त्याहीपेक्षा अंतर होतं ते आमच्या
दृष्टिकोनांत. तिच्यापेक्षां मी कितीतरी प्रौढ दिसत होतो. माझ्या
वैचारिक प्रगल्भतेचा तो परिणाम असावा.
कमल रसिक भ्रमराच्या हळुवारतेनें हाताळावयास
हवे. त्याचीं दलें कलाकलानें उलगडायला हवीत.
परस्परांवर आम्ही आरक्त असलो तरी
आम्हां उभयतांच्या विचारांची पार्श्वभूमि वेगळी होती. त्यामुळें काही
काही वेळीं आमच्या मनांत मतभेदांच्या मेघांच्या
सरी वर्षत. पण घटकाभरांतच ओलावलेल्या
भावना आंतरिक प्रीतीनें पाचूंसारख्या चमकूं लागत.
वरचेवर उद्‌भवणारा तिचा आजार आणि
मला वारंवार भोगावा लागणारा तुरुंगवास यामुळें आमच्यांत
दूरावा निर्माण झाला होता. तसा तिने मला धीर देण्याचा
प्रयत्न केला...पण आंतून तिला आपल्या साथीदाराचें

आपल्याकडे दुर्लक्ष होत आहे असे वाटत असावेसे तिच्या चेहेऱ्यावरून
माझ्या लक्षांत आले.
अठरा वर्षाच्या वैवाहिक जीवनानंतरही तिच्या
चेहऱ्यावरील काश्मिरी गुलाबाचे तेज कमी झाले नव्हते.
तच्या अपूर्व सौंदर्यावर काळानें आपली काजळी
उधळली नव्हती. पण माझ्यांत विलक्षण फरक पडत होता.
माझा चेहरा मलाच ओळखूं येईनासा झाला होता. केस
कमी कमी होत चालले होते. डोळ्याभोवती किर्मिजी
वलयें उमटली होती. अपरिचितांना तर कमल
माझी मुलगीच वाटे. इतका मी वाकलो होतो.
माझ्या मनाच्या एकांतात तिचा दीर्घकालीन आजार घर करून
बसला होता. जेव्हां मला ती जवळ हवी होती तेव्हां ती
मला सोडून तर जाणार नाहीं ना, असं मला राहून राहून वाटे.
इतक्या वर्षानंतर आम्हीं जवळ येत होत. आमचे
सहजीवन सुरू होत होते. परस्परांच्या सल्ल्यानें
आम्हीं वागूं लागलो होतो. आम्हा दोघांना
राष्ट्रासाठी बरेचसे काही करावयाचे होते. त्या अकरा
दिवसांत देहाने तिच्या सहवासांत असून देखिल
माझे मन तिच्या अस्तित्वाभोवती घिरट्या घालीत होते.
घरट्यांतील जखमी पक्षिणीवर नजर ठेऊन अस्मानाचा
वेध घेणाऱ्या पक्ष्याप्रमाणें.

## : १०० : यशाचे मम

तुझ्या मनाच्या पार्श्वभूमीवर सदैव दोन महात्म्यांचे
दर्शन घडते. एक गांधीजीचे . दुसरे बुद्धाचे.
गांधीजींनी तर पहिल्या भेटींतच आपल्या
तेजानें तुला किनारले. त्या वलयांत तूं आनंदभवनाची
पायरी उतरून क्षितिजाच्या रंगणांत आलास.
वैराग्याने विलासावर मात केली.
राखेच्या स्वस्तिकापुढें सुखस्वप्नें चितारणारी रांगोळी
हतप्रभ झाली.
आणि पुढें सबंध आयुष्यभर त्या वल्कलधारी तपस्व्याच्या
आशीर्वादाशिवाय तुझे पाऊल पुढे पडले नाहीं.
इतक्याजवळून दुसऱ्या कोणत्याहि भारतीय नेत्यानें
त्यांना पाहिलें नाहीं.
अत्तराच्या दिव्याच्या प्रकाशांत वावरणाऱ्या, गाद्यागिरद्यांत रुतलेल्या
तुझ्या विलासी जीवाला तुरुंगांतील तरटावर पहुडण्यांत
आनंद वाटावा इतका तो बदल प्रभावी होता. ह्या परिवर्तनांत
तुझ्या मनोवृत्ती इतकेच त्यांच्याहि प्रभावाला स्थान आहे.
गांधीजींइतकेच तुला बुद्धाचे आकर्षण होते.
नेत्रांच्या शिंपल्यांतून अवघ्या प्राणिमात्राचे अश्रु प्राशन
करणारा तो महात्मा...त्या मनांतील उदात्त विचारांच्या
चेहेऱ्यावर उमटलेल्या गंभीर छटा यानीं तुला
हजार वर्षे मागे नेले. रक्तपातानें मिळविलेल्या सत्तेचा लोभ
सोडून विरागी बनलेल्या
सम्राट अशोकाच्या जीवन-कालांत.

भारताच्या प्यारा तिरंगाच्या हृदयावर
अशोक-चक्र आहे. ते चक्र युद्धाला विटलेल्या
आणि बुद्धाचे गुरुत्व पत्करलेल्या साम्राज्याचे

बोधचिन्ह होते.
तुझ्या जीवनांत आणि मनांत गांधीजी आणि बुद्ध
आले नसते तर...
तर एक विलासी जीवन गंगातीरावरील आनंदभवनांत
मोहरले असते...
आणि अलाहाबादच्या पंचक्रोशीत आपल्या व्ययसा–
यांतील यशाची स्मृति मागे ठेऊन विरले असते.
तुझ्या यशाचे मर्म ह्या दोन महात्म्यांच्या विचार-
धारेंत आहे.

१२–२–७३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## : १०१ : गुणी च गुणरागी च ।

पुणे ही आर्य-संस्कृतीचे अनेक पैलू जतन करणारी
एक कर्मभूमि आहे. तिने योग्याच्या भाली वैराग्याचा
टिळा लावला. ज्ञानियाच्या पायाखाली श्रद्धेचा चौरंग
ठेविला. संतांच्या मुखांतून अभंग-गाथा वदविला.
आणि सेवकांच्या काखेंत स्वातंत्र्याची दीक्षा देण्यासाठी
भिक्षेची झोळी दिली.
कोकण प्रांतांतून मुरुडच्या वाटेनें आपल्या वेशीपाशी आलेल्या
अशाच एका कर्मयोग्याला पुण्याने आपल्या कुशीत
घेतलें. तो कर्मयोगी म्हणजे महर्षि कर्वे. आपल्या
कर्मभूमींतून श्रीफळ आणि सुपारी ही दोन सौभाग्य -
चिन्हें घेऊन आलेला एक पदयात्रिक.
पर्वतीच्या पायथ्यालगतच्या पर्णकुटींत
–हिंगणे येथें अनेक तपें स्त्रीजीवनांतील व्यथा
जाणून त्या दूर करण्यांत रंगलेल्या या पुरुषोत्तमाला
शासनानें भारतरत्न ही यथार्थ पदवी देऊन
गौरविले, तेव्हां त्या सोहळ्याचे प्रमुखपण तुझ्याकडे
होते. त्या आधीं दोन तपें ते मानधन तुलाहि
मिळालेले होते.
पुण्यपुरीने ओळखिले की शतकाची वाटचाल कार्यक्षमतेनें केलेल्या
योग्याच्या सत्काराला अध्यक्ष
हवा तो तुझ्यासारखा . . . ‘ गुणी च गुणरागी च । ’
. . . विश्वशांतीचा उद्‌गाता.

## : १०२ : दिगंत किनारणारी दृष्टि

मनांतील कित्येक स्वप्नें सत्यांत कधींच उतरत नाहींत हे
खरे. पण त्यांत रमण्यासाठीं लागणार थयथयत चैतन्य,
आणि क्षितिजापलीकडील प्रेय पाहण्याची दूर-दृष्टि
तुझ्यात होती. म्हणून तर तू यौवनांत चितारलेली
अनेक स्वप्नें सत्यसृष्टींत उतरली.
तुझे मन भारताच्या गतवैभवाचे केवळ पोवाडेच
गात बसले नाहीं. भवितव्य घडविण्यासाठीं लागणारी जिद्द
तुझ्या मनगटांत होती. भारतीय जनतेच्या आशा–आकाक्षांचा
तूं प्रतिनिधि होतास. त्यामुळें त्या जनतेने तुझ्या तेजोवलया–
भवती रिंगण धरले.
तुझ्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध अंगांचा जेव्हां मी विचार
करतो तेव्हां मला राहून राहून वाटतं कीं तुझ्याइतक्या अलौकिक
देणग्यांची खैरात परमेश्वरानें कुणावरच केली नसावी. शतका–
नुशतकें पारतंत्र्यांत महिरलेल्या एवढ्या विशाल राष्ट्रांतील
स्वातंत्र्य–वन्हि चेतविणे फक्त सूर्यासारख्या प्रतिभाशाली
ग्रहगोलालाच शक्य होते, याची जाणीव उद्यांच्या
जगाला झाल्याशिवाय राहणार नाहीं.
तूं अचूक ओळखलेस कीं आपल्यावर इतकी
शतके राज्य करणारे जेते शौर्यशाली नव्हते तर आपल्यातील
वैमनस्याचा फायदा त्यानीं घेतला म्हणून
राष्ट्रांत भावनात्मक ऐक्याची जाणीव उत्पन्न करण्यासाठीं
तू जिवापाड श्रम घेतलेस. ह्या श्रमाची व्याप्ति शेवटी
विश्वाच्या सीमा रेषा किनारणारी ठरली.
जाणणारे आहेत ते जाणतील कीं
तूं मानवाच्या मुक्तीसाठीं आपली सारी चित्‌शक्ति अखेरच्या
घटकेपर्यंत वेचिलीस. अंतर्दर्शी माणसेंच इतके प्रभावी
कार्य करूं शकतात.

१६–३–७३

## : १०१ : गुणी च गुणरागी च ।

पुणे ही आर्य-संस्कृतीचे अनेक पैलू जतन करणारी
एक कर्मभूमि आहे. तिने योग्याच्या भाली वैराग्याचा
टिळा लावला. ज्ञानियाच्या पायाखाली श्रद्धेचा चौरंग
ठेविला. संतांच्या मुखांतून अभंग-गाथा वदविला.
आणि सेवकांच्या काखेंत स्वातंत्र्याची दीक्षा देण्यासाठी
भिक्षेची झोळी दिली.
कोकण प्रांतांतून मुरुडच्या वाटेनें आपल्या वेशीपाशी आलेल्या
अशाच एका कर्मयोग्याला पुण्याने आपल्या कुशीत
घेतलें. तो कर्मयोगी म्हणजे महर्षि कर्वे. आपल्या
कर्मभूमींतून श्रीफळ आणि सुपारी ही दोन सौभाग्य -
चिन्हें घेऊन आलेला एक पदयात्रिक.
पर्वतीच्या पायथ्यालगतच्या पर्णकुटींत
–हिंगणे येथें अनेक तपें स्त्रीजीवनांतील व्यथा
जाणून त्या दूर करण्यांत रंगलेल्या या पुरुषोत्तमाला
शासनानें भारतरत्न ही यथार्थ पदवी देऊन
गौरविले, तेव्हां त्या सोहळ्याचे प्रमुखपण तुझ्याकडे
होते. त्या आधीं दोन तपें ते मानधन तुलाहि
मिळालेले होते.
पुण्यपुरीने ओळखिले की शतकाची वाटचाल कार्यक्षमतेनें केलेल्या
योग्याच्या सत्काराला अध्यक्ष
हवा तो तुझ्यासारखा . . . ' गुणी च गुणरागी च । '
. . . विश्वशांतीचा उद्‌गाता.

## : १०२ : दिगंत किनारणारी दृष्टि

मनांतील कित्येक स्वप्नें सत्त्यांत कधींच उतरत नाहींत हे
खरे. पण त्यांत रमण्यासाठीं लागणार थयथयत चैतन्य,
आणि क्षितिजापलीकडील प्रेय पाहण्याची दूर-दृष्टि
तुझ्यात होती. म्हणून तर तू यौवनांत चितारलेली
अनेक स्वप्नें सत्यसृष्टींत उतरली.
तुझे मन भारताच्या गतवैभवाचे केवळ पोवाडेच
गात बसले नाहीं. भवितव्य घडविण्यासाठीं लागणारी जिद्द
तुझ्या मनगटांत होती. भारतीय जनतेच्या आशा–आकांक्षांचा
तूं प्रतिनिधि होतास. त्यामुळें त्या जनतेने तुझ्या तेजोवलया–
भवती रिंगण धरले.
तुझ्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध अंगांचा जेव्हां मी विचार
करतो तेव्हां मला राहून राहून वाटतं कीं तुझ्याइतक्या अलौकिक
देणग्यांची खैरात परमेश्वरानें कुणावरच केली नसावी. शतका–
नुशतकें पारतंत्र्यांत महिरलेल्या एवढ्या विशाल राष्ट्रांतील
स्वातंत्र्य–वन्हि चेतविणे फक्त सूर्यासारख्या प्रतिभाशाली
ग्रहगोलालाच शक्य होते, याची जाणीव उद्यांच्या
जगाला झाल्याशिवाय राहणार नाहीं.
तूं अचूक ओळखलेस कीं आपल्यावर इतकी
शतके राज्य करणारे जेते शौर्यशाली नव्हते तर आपल्यातील
वैमनस्याचा फायदा त्यानीं घेतला म्हणून
राष्ट्रांत भावनात्मक ऐक्याची जाणीव उत्पन्न करण्यासाठीं
तू जिवापाड श्रम घेतलेस. ह्या श्रमाची व्याप्ति शेवटी
विश्वाच्या सीमा रेषा किनारणारी ठरली.
जाणणारे आहेत ते जाणतील कीं
तूं मानवाच्या मुक्तीसाठीं आपली सारी चित्‌शक्ति अखेरच्या
घटकेपर्यंत वेचिलीस. अंतर्दर्शी माणसेंच इतके प्रभावी
कार्य करूं शकतात.

१६–३–७३

## : १०३ : जवाहिराचा देश

अवघं जग तुला स्वप्नाळू म्हणतं.
मीही त्यांतील एक आहे.
सर्वसामान्य माणसं बाह्यदर्शनावरून व्यक्तीचं मोजमाप
करतात आणि त्यावरून अनुकूल अगर प्रतिकूल
मत बनवितात. आडाखे बांधतात.
तुझ्या स्वप्नाळू वृत्तीकडे कौतुकाने पहाणारा वर्ग बराचसा परदेशांतील
आहे. आणि थोडासा इथला...
आपल्या देशांतील आहे.
स्वप्नें पहाणारं मन जलाशयासारखं अथांग
आणि निर्मळ असावं लागतं. तरच त्यांत अस्मान उतरतं.
तुझे सर्वच निंदक काहीं तुला न ओळखण्याइतके
खुजें आणि खुळे नाहींत. पण आपल्या दृष्टिपथावरील
व्यक्ति इतकी उंच असलेली पहाण्याचा निर्लेपपणा
अतिमानवांतच असूं शकतो संकुचित रंगणांतून बाहेर
येऊन चंदनशीतल वृत्तीने गुणग्रहण करणारे उजवे
हातावरील बोटांच्या संख्येइतकेच.
पण तुझे वाक्‌चातुर्य, प्रयत्नशीलता,
मनोधैर्य आणि प्रामाणिकपणा . . . या गुणांतून
साकारलेल्या भारताचे दर्शन जगांतील थोर पुरुषांना
घ्यावेसे वाटते.
प्रचंड लोकसंख्येच्या बहुसंख्य निरक्षर जनतेला
लोकशाहीची तत्त्वें तपशीलवार समजावून देण्यासाठी
आकाशाच्या कोनांत तरंगणाऱ्या तुझ्या स्वप्नांना किती
खाली यावे लागले असेल याची कल्पना करून
तुझ्या थोरवीच्या चर्चेत भाग न घेतां मौन धारण
करणेंच बरे. तुझे मोठेपण हा चर्चेचा विषय नाहीं.
चर्चेने कंठ कोरडा होतो. अर्चेच्या तीर्थाशिवाय तो ओलावत

नाही.
नाना मनोधर्माचे कोटयवधि जीव एकत्र
आणण्यापूर्वी त्यांच्या उद्धारासाठीं तुझ्या अनेक घटका
चिंतनांत विरल्या असतील. तुझी स्वप्नें आज
भारताच्या मुठींत आहेत. त्या झाकल्या मुठींतील
ठेवा जगांतील राष्ट्रानीं पोटीं असूया बाळगावी
इतक्या तोलामोलाचा आहे.
उद्यांचे जग आम्हांला ओळखील ते आम्हीं जवाहिराच्या देशांतील
रहिवासी म्हणून

१०–३–७३

## : १०४ : आनंदभवन

आनंदभवन
तुझ्या वडिलानी आपल्या कमाईतून साकारलेले
अभिरुचीनुसार अलंकारलेले
एक प्रासाद-तुल्य शिल्प
त्यांच्या विलासी जीवनाचे कवन
आनंदभवन

बालपणीं याच ठिकाणी
भारतीय मुत्सद्यांच्या मुखांतून
तू ऐकिलीस
जागतिक राजकारणाची चर्चा
तुला घडले नेत्याचे विचार-दर्शन
तू पाहिलेस असंख्यानी देशासाठीं केलेलें
सर्वस्वाचे होमहवन
आनंदभवन

एके दिवशीं तुझ्या पायरीवर
उभा राहिला एक सिद्धार्थ
शून्यापर्यंत विरला होता ज्याचा स्वार्थ
तुम्हा कुटुंबियांना
त्यानें दिला स्वातंत्र्याचा मंत्र
पटवून दिले अहिंसामय क्रांतीचे तंत्र
तुझ्या वृत्तीची लय
होती संस्कारमय
त्या योग्याची सावली
तुला वाटली माउली

मग तुझे महालांतले सुख सरले

कोजागिरीचे चांदणे विरले
तुपांत भिजल्या ओठी उरले
फक्त कोटिकोटींच्या मुक्तीचे स्तवन
आनंदभवन

ज्या वयांत बालकाने
घराभंवतीच्या बगीच्यांत लहरावे
नवरंगी पाखरामागें भिरभिरावे
त्या वयांत तुझा एकांत
प्रौढत्वानें जागला
थोरामोठ्यांसारखा वागला
आवडीनुरूप वाचलेस खूप
तुझे बालपण झाले, तपोवन
आनंदभवन

तुझ्यामागे
घरादारावर तुलशीपत्र ठेऊन
सारे आले
वडिल म्हणाले, " स्वातंत्र्याच्या पालखींत
माझा गुणगंभीर सामील झाला....अभीर लावून
आतां काय करायचे आपण मागे राहून ?"
तुझी आई....सति वृत्तीची
काय झाली असेल गत तिची ?
एकांतात रडली असेल
आंतल्या आंत कढली असेल
कमल : तुझ्या यौवनाचा परिमल
आस्वादावाचून विरला असेल

काहीही असो
त्या योगेश्वराच्या ओंजळीत
तुम्ही वाहिलेत
तन मन, इतकेच नव्हे
आयुष्याचे धन
आनंदभवन

आणि मग
भारताच्या मुक्तीसाठी आसेतुहिमाचल भ्रमण
विश्वशांतीसाठी भूगोलाभंवती परिक्रमण
दिगंतात भिनले तुझ्या स्वप्नांचे रंग
आनंदभवनाचा दूरावला संग
महात्माजींच्या स्पर्शानें मोहरलेला तू
घराची पायरी उतरलास
आणि " हे विश्वचि माझे घर " म्हणता म्हणता
अनंताशी एकरूप झालास

अलाहाबादला गंगातीरावर
अजूनही आहे उभे तुझे ते आनंदभवन
पण निष्प्राण ... तुझ्या विरहानें
काळवंडलेले पाषाण
दर्शनानें डोळे भरून येतात
मौनानेच होते मग मनाचे सान्त्वन
आनंदभवन

२२-३-७३

: १०५ . तुला

तुझ्या व्यक्तिमत्त्वाची तुला करणाराला तुझा वंशगत
वारसा विसरून चालणार नाहीं, हे जितकं खरं, तितकीच
तुझी चिंतनशीलता ... तींतून साकारणारी मनाची घडण ...
विस्तारलेली विश्वकुटुंब-वृत्ति दृष्टिआड करून चालणार
नाहीं हेहि खरं.
उमरावाच्या वंशांत जन्म घेऊनहि तुझ मन
लोकशाहीत रंगले. भक्तानें आपल्या दैवताची पालखी
अहमहमिकेनें खांद्यावरून मिरवीत न्यावी तसे तुझे प्रेम
जनतेनें शिरोधार्य मानले आपल्या लाडक्या ' लाल ' जीवर
त्यानीं अलोट प्रेमाचा गुलाल उधळला. इतका कीं त्या
थराआड लपलेली तुझी आंतरिक तळमळ आणि
आकांक्षा यांचे कित्येकांना दर्शनच झालें नाही.
तुझा पिंड खरा कलावंताचा. राजकीय वरमंचका
तू वठविलेल्या अनेक भूमिका पाहून जग थक्क झाले.
कोणत्याही गहन विषयाचे विश्लेषण करतांना तुझी अभ्यासू
वृत्ति जाणवते.
कधी तू संयमशील वाणीनें, तर कधी
भावविवशतेनें जनतेवर कडाडून हल्ला
चढवून लाखो मनें मुठीत ठेविलीस. पण याचे कारण
जनतेच्या मनांत सदैव जागी असणारी तुझ्या
अद्वितीय कर्तृत्वाची जाणीव, हेच होय.
तुझ्या मेघगर्जनेंत प्रतिस्पर्ध्याशी हाडवैर
साधण्याचा हेतु नसे. तर तीत जनतेच्या कल्याणाची
मनीषा पुरी करण्याची तीव्र लालसा असे. कुठें अव्यवस्था दिसली
कुठें रांगडी वागणूक मिळाली, अगर कुठें रीतिरिवाजाचा
अभाव दिसला तर तुझ्या कलात्मक आणि सात्त्विक मनाला
चीड येत असे.

तुझ्या जीवन विषयक गरजा किती तरी कमी होत्या.
पण होत्या त्यांत कमालीची टापटीप होती. त्यांत काही गैरशिस्त
दिसले तर तुझा त्वेष उफाळून येई.
तुला लाभलेल्या अलौकिक यशामुळे तुझ्या भोवती न कळत
असे एक प्रभा-मंडळ तयार झाले
होते, की त्यामुळ तुझे जवळचे सहकारी मनाने तुला
दूरावले होते. तुझ्यापुढील समस्यांचा विचार विनिमय
करावयास जवळ यायला ते धजले नाहींत. कारण साधारण
परिस्थितींत तुला कुणाच्याच सल्ल्याची जरुरी भासली नाहीं.
आणि आणिबाणीच्या परिस्थितींत तुझे सल्लागार वेगळेच
होते.
त्यामुळें अखेरपर्यंत तू एकटाच राहिलास. तुझे
जीवित-स्वप्न साकारील असा दुसरा कुणी
तुला दिसलाच नाहीं. त्यामुळें तुझी तुला अशी
झालीच नाहीं.

१५-३-७३

अहमदनगरच्या तुरुंगांत तुम्हीं राजबंद्यानी आपल्या एकांतातील जडावलेल्या घटका काव्य-शास्त्र-विनोदानें तरल केल्यात. राजा अकबराच्या जीवनांतील एक विशेष प्रसंग ऐकून तुझे कान उमलले होते.

तो प्रसंग हा :– " राजा अकबर
एकदां माजलेल्या हत्तीवर स्वार होऊन फेरफटका करण्यासाठीं निघाला. दौडता दौडतां त्याच्या लगामेवरील ताबा सुटला. ओढता ओढता ती तुटली. पिसाट धावत सुटलेला हत्ती नदीच्या वाटेनें धावूं लागला. लोक घाबरून ओरडूं लागले. म्हणाले. " महाराज, उडी टाका ! अहो जीव धोक्यांत कां घालता ? परंतु त्यानीं त्यांचे ऐकिले नाहीं. " राजा आतां आपल्याला जिवंत मिळत नाही " असं लोकांना वाटलं. हत्ती नदींत घुसला तेव्हां त्यानीं एकच गिल्ला केला आणि पाण्यांत उडी टाकण्याची विनंति केली. तरीहि त्यानीं तिकडे लक्ष दिलें नाहीं. त्या उन्मत्त पशूचा कैफ उतरविण्याचा तो आटोकाट प्रयत्न करीत होता. हत्तीनें आपल्या मस्तीतच नदी पार केली. पैलथडी गेल्यावर देखिल तो उधळतच होता. अखेरी अकबरानें त्याला काबूत आणले आणि तबेल्यांत परतविले. हा धोका पत्करल्याबद्दल लोकानीं जेव्हां आपली प्रेमयुक्त नाराजी व्यक्त केली, तेव्हां त्यांना त्यानीं फार मार्मिक शब्दांत उत्तर दिले, " मी तुमच्या म्हणण्याप्रमाणें वागलो असतो तर राज्यकर्ता म्हणून माझी सारी कीर्ति धोक्यांत आली असती. एका पिसाळलेल्या पशूला जर मी आवरूं शकत नसेन तर साम्राज्याचा सारथि म्हणवून घेण्याचा मला काय अधिकार ? "

आपल्या साहसी मनोवृत्तीची पकड घेणारी ही घटना ऐकून तूं मनांत म्हणाला असशील,

" आवरूं शके जो सहजी मत्त गजेंद्र
नमतील तयाच्या पदीं राजराजेंद्र "

२१–३–७३

गांधीजी, राजेंद्रप्रसाद, मौ. आझाद, सरोजिनी नायडू, राजगोपालाचारि आणि तूं...स्वातंत्र्याच्या चळवळींत पडला नसतात, तर तुम्हीं मानवी जीवन-मूल्यांचे प्रचारक झाला असतात. शैक्षणिक सांस्कृतिक वाङ्मयीन अगर तत्त्वज्ञान विषयक क्षेत्रांत तुम्हीं उल्लेखनीय कार्य केले असतेत. मानवी आचार-विचारांची सूक्तें तुम्हीं जगाला विशद करून सांगितली असतीत.

स्वातंत्र्य-लढ्यांत तुम्हीं भाग घेतलात तो काहीं सत्तालोभानें नव्हे, तर स्वतंत्र असल्याखेरीज आपल्या जनतेचें कल्याण साधता येणार नाहीं ही जाणीव त्यामागे होती. तुझी प्रमुख भूमिका जनतेची विचारसरणी जाणून घेणारीच होती. ही प्रेरणा तुला गांधीजींकडून मिळाली होती. सर्व साधारण नागरिकांच्या प्राथमिक गरजा भागल्याशिवाय त्यांना जीवन-स्वप्नांच्या अंतरिक्षांत झेप घेतां येणार नाहीं हे तूं ओळखलेस. मानवी सुखासाठीं केवळ विज्ञान-विषयक प्रगतीच आवश्यक आहे असें नव्हे तर त्यांतून निर्माण होणाऱ्या बळाचा योग्य तो वापर करण्यासाठीं विश्व-कल्याण साधणाऱ्या प्रवृत्तीचीही आवश्यकता आहे, हे तूं प्रतिपादन केलेस. रवींद्रनाथांची विश्वाचें शांति–निकेतन करूं इच्छिणारी विचारसरणी तूं आपल्या लिखाणांतून मांडलेली आहेस.

" माझ्या घराला मला कुंपण नको आहे. तसेच खिडक्यांना गज नकोत. अष्टदिशांतून वाहणारे नव्या जुन्या संस्कृतीचे वारे तिथे मुक्तपणें खेळायला हवेत. पण त्याचबरोबर माझ्या देशाच्या संस्कृतीत रुतलेली माझी पावले आणि रुजलेले माझे विचार त्यामुळें

विचलित होणार नाहींत जाति धर्म आणि वंश यांतून
उद्भवणाऱ्या अहंकाराला माझ्या घराच्या पायरीवर थारा नाहीं "

भारतीय मनांत मंदिराचे मांगल्य निर्माण करणारी तुझी ही
विचारसरणी डोळ्यांपुढें उभी राहिली
की वाटते ही पृथ्वी युगानुयुगे तुझ्या गुरुत्वाभोवती
भ्रमत राहील.

२७–३–७३

: १०८ : नेतृत्वाची बैठक

तुझा कामाचा उरक पाहून शेजारच्या खुर्चीवरील
सहकारी थक्क व्हायचा. दिवसाचे अठरा अठरा तास तुझा देह
कामाच्या ओझ्याखालीं वाकलेला असे.
त्यांतून सत्तेचाळीस साल ऑगष्ट महिना
सत्तांतराचा काळ . . . मनावर कामाचा विलक्षण ताण.
पंचवीस ऑगष्टचा दिवस असेल. एवढया गर्दीच्या
घटकांत तूं ' मृच्छकटिक ' वाचीत होतास. मृच्छकटिकाचा
नायक चारुदत्त . . . सहृदय वृत्तीमुळे कफल्लक झालेला.
पण अशा गुणी माणसावरच जनता दिल उधळते.
गांधीजीनी देखील ' हरिश्चंद्र ' नाटक अनेक वेळा पाहिले.
आपल्या जीवनावर चिरंतन संस्कार करणारी नाटके
वेळांत वेळ काढून नेते पहातात याचे कारण
जगाच्या रंग मंचावर त्यांना त्यापैकींच एखाद्या
नायकाची भूमिका वठवावयाची असते.
भारतीय संस्कृति ही विवेकाच्या चौरंगावर
अधिष्ठित झालेल्या शतभुजा देवतेसारखी आहे.
तिच्या एकेका हातांत एकेक भावपुष्प आहे. यांतील
एखादे पुष्प जरी तिनें प्रसन्न होऊन आपल्या भक्ताच्या
अंगावर उधळले तरी त्या गंधानें तो परिसर
भारून टाकील. तूं तर त्या संस्कृति-देवीचा लाडका.
अनेक भावपुष्पे तिने तुझ्यावर उधळिली होती. त्याच
भावगंधाच्या आस्वादावर संतुष्ट होऊन अष्टदिशा
तुझ्या भोवती फेर धरूं लागल्या.
चिरंतन जीवन-मूल्यांच्या निकषावर
आपले कर्तृत्व घासून-पुसून पहाण्यासाठीं तुझे असे
वाचन चालूं असे. तुझ्या नेतृत्वाची बैठक
मृच्छकटिकांतील चारुदत्ताच्या भावबंधनाची
होती.

२८-३-७३

## : १०९ : वेद घोष

प्रदीर्घ संघर्षानंतर जेव्हां एखाद्या राष्ट्राला स्वातंत्र्य
प्राप्त होतं, तेव्हां त्याची पहिली काहीं वर्षें संभ्रमावस्थेंत जातात.
जनता आणि नेते यांच्या आचार-विचारांत फार मोठी तफावत
पडते. दोघांच्याहि मनांत आचरणांत उतरावं असं पुष्कळ असतं
पण त्यांतील कृतीत थोडंच उतरतं. या लढयांतील नेते
रचनात्मक कार्याला वाहून घेण्यापेक्षां प्रजेवर टीकास्त्र फेकीत
असतात.

स्वातंत्र्य मिळविणं कठीणच. पण तें मिळविल्यानंतर
जे मंत्र गावे लागतात, जे तंत्र अवलंबावे लागते ते त्यांना
अवगत नसेल, तर ते अधिकारावर राहणार नाहींत.
जातिवंत सेवकालाच जनता मानकऱ्याच्या मोलानें
तोलते.
तुझ्यासारख्या अलौकिक चारित्र्याच्या बोधि-सत्त्वाच्या
हातीं ती स्वातंत्र्य-धुरा देण्याचीं दूर दृष्टि महात्माजींजवळ
होती.
तुझी कित्येक वर्षें तुरुंगांत गेली
पण स्वातंत्र्यप्राप्तीनंतरहि ब्रिटिशांबद्दल तुझें मन जहरलें नाहीं.
क्षूद्र मनाला लगडणाऱ्या क्षुद्र गोष्टीनें
तूं कधींच अगतिक झाला नाहींस.
अशी सत्ता हातीं आल्यावर नेता हुकुमशाहीकडे
वळण्याची शक्यता असते. लोकशाहीच्या मार्गा-
पेक्षां, " नको ते रोखा आणि ठोका " हा हुकुमशाही मार्गच
त्याला जवळचा वाटतो. पण तो न स्वीकारण्याइतकी
विचारांची उदारता आणि उदात्तता तुझ्यापाशी होती.
जगांत आज हुकुमशाही आणि लोकशाही
यांची वैचारिक रस्सीखेच चालू आहे. त्यापैकीं भारत हा

लोकशाही मनोवृत्तीचा . . . अयोध्येच्या मनोधारणचा
( युद्ध नको म्हणणाऱ्या विचारसरणीचा ) राम. आजची
बहुसंख्य आशियाई राष्ट्रें भारतावर विश्वसून वागणारी
आहेत. मधुनमधून त्यांच्यावर अण्वस्त्रांकित
राष्ट्रांचे आक्रमण होते तेव्हां ती भारताकडे
सल्ल्यासाठीं धाव घेतात.

आणखी काहीं वर्षे जगांतील स्वामित्ववादी
राष्ट्रांत भारतावर आपला पगडा असावा यासाठीं
चुरस राहील. पण अंतीं तुझ्याच मनोधारणेचा विजय
होईल. हिमवस्त्रांकित भारतमातेचाच वेदघोष दिगंतात घुमेल.

## : ११० : बापू, मीही आलोच

बापू !

आज आठ दिवस मन काजळलेले आहे. अष्टदिशा तेजोहीन झालेल्या दिसत आहेत. अजूनपर्यंत घटकाप्रहर असे मन वादळे आणि शांत होई. पण गेला आठवडा माझ्याभोवतीची सृष्टि वेगानें अंधारत आहे. कां माझी दृष्टि मंदावत आहे ? काही कळत नाहीं. पण काहीं तरी होत आहे, हे खास.

तुम्हीं आमच्यांतून गेलेल्याला तशी फारशी वर्षे झालेली नाहींत . . . फक्त पंधरा. पण इतक्यांतच आमच्यांतील बरेचसेजण तुम्हांला विसरले. कारण तुमचें विभूतिमत्त्व पेलायला जी निष्ठा हवी होती; ती आमच्यांत नव्हती. तुमच्यावरील आमचें प्रेम मूर्तिबद्ध होते, मांगल्यबद्ध नव्हते. देव देवालयांत परतल्यावर देखिल भावनेंतून पालखीला बोलके करणारे ते प्रेम नव्हते. ते मूर्तीपुढें ढोल बडविणारे होते.

नौखालीच्या जातीय संघर्षात धर्मवेडानें पेटलेल्या पिसाटासमोर तुम्हीं भगवंतासारखे उभे राहिलात. विलक्षण भावसामर्थ्याची माणसेच हे धाडस करूं शकतात. परंतु आत्म-समर्पणासाठी सिद्ध होऊन देखिल धर्मांधानीं पेटविलेला तो जातीयतेचा वणवा तुमच्या हातून विझला नाहीं. उलट त्यांत तुमचीच आहुति पडली.

मानवतेच्या गौरी–शंकरावर प्रवचनबद्ध झालेल्या साऱ्या महात्म्यांचा अंत असाच झालेला आहे. तुमचे मरण अपघाती म्हणावे लागेल. तुमच्या स्मृतीच्या आघातानें मी आज जो विरतो आहे, मरतो आहे, ते मरण कुणाला सांगून कळणार नाहीं. हा आघात आज मला असह्य झाला आहे. गेली चाळीस वर्षे खूप सोसले. पण माझ्या सोसणाऱ्या मनाला जनतेच्या प्रेमानीं इतके पोसले आहे कीं अजूनपर्यंत ते सुरकुतले नाहीं. त्याचा ताजेपणा गेला नाही.

आज मात्र माझ्या स्वप्नांची छकले घेऊन मी
इथे राजघाटावर उभा आहे. आयुष्यांतील एका महान
पराजयाचे हालाहल पचविण्याचा मी प्रयत्न करतो
आहे. एक पराजित म्हणून जगांतील एक विशिष्ठ छिन्द्रावेषी
वर्ग माझ्याकडे बोट दाखवीत आहे. नेत्याच्या उणेपणांत रंग
भरणारे काहीं राजकारणी प्रत्येक देशांत असतात पण
याचा अर्थ मी चुकलो नाहीं, असा नव्हे. मी चुकलोच.
भारताच्या वाटेवरील हा 'चिनी' काटा वेळीच दूर करायला
हवा होता. त्या काटयाचा आज नायटा झाला. माझ्या महान
ध्येयांसाठी ... एका स्वप्नवेडया जीवनासाठीं म्हणा .....
देशाला प्राणाची आणि पैशाची हानि सोसावी लागली.
त्याचे व ठ ह्या पाठीवर उमटलेले आहेत. त्याची जाण
असतीच तर ती बापू तुम्हांला. म्हणून तर मी इथें
तुमच्या समाधीपाशी उभा आहे.
मला पंच्याहत्तरावे वर्ष लागले आहे.
यापुढें जगलो तर 'माझे जग' माझा अमृतोत्सव करील.
पण त्या अभिषेकासाठीं मी आतुरलेलो नाही. माझ्यांतील
'मी' बहुतांशी विरलेला आहे. पंचशीलाच्या स्वप्नांची
अस्मानी कमान माझ्या काजळलेल्या नजरेला दिसत नाहीं.
पुन्हा ह्या घाटावर माझे येणे होईल न होईल.
झालेच नाहीं तर माझ्या भारतीय बंधूना माझी एवढीच
विनंति कीं माझे दहन तुमच्यापासून हाकेच्या अंतरावर
करावे. सलोकता समीपता सरूपता ह्या मुक्तीच्या
पायऱ्यांपैकीं दुसऱ्या पायरीपाशी
माझे रक्षांकित अस्तित्व असूं द्या ! मी तुमच्याजवळ
होतो, तुमच्याशी एकरूप झालो होतो, असं मीच
कस म्हणूं ? ते जगाला म्हणूं द्या ! जे जाणतील ते

म्हणतील.

जगानें माझ्यावर खूप प्रेम केलं. अगदी तुमच्या-
वर केलें एवढे. तुम्हांला जाणून घेतां आलं तेवढं, मी
जाणलं. तुम्हीच मला जगापुढें आणलंत. आतां तुमच्यामागें
राहून मी काय करूं ? आयुष्य कमी होत चालल कीं
जीवनांतील दोष वाढत जातात. दृष्टीला प्रकाशापेक्षां
अंधारच दिसूं लागतो.

मन कधीच मावळतीच्या कडेवर जाऊन
बसलं आहे. आता त्यामागून देहालाहि निघायला हवं.
हा पहा बापू, मीहि आलोच.

१९-११-७२

## : १११ : काश्मीर–एक शोकांतिका

भारत–पाक वैराची शोकांतिका ही सर्वांना परिचित
असलेली एक प्रदीर्घ कथा आहे.
स्वातंत्र्योत्तर कालांत ह्या दोन्ही राष्ट्रांत लहानमोठें
संघर्ष होत असत.

असे संघर्ष म्हणजे उघड उघड न पुकारलेली युद्धेच होती.
अखंड भारताच्या विभाजनानें देशापुढें अनेक समस्या
उभ्या राहिल्या.
काहीं राजकीय, कांहीं तांत्रिक पण सर्वच प्रक्षोभक आणि
दोन्ही राष्ट्रांच्या दृष्टीनें अंती विध्वंसक
त्या सर्वांत मोठी समस्या म्हणजे काश्मीर
अधुनमधून पाककडून भारताला युद्धाची धमकी
दिली जात असल्यामुळे संरक्षणासाठीं भारताला
आर्थिक भार सोसावा लागला.
त्यामुळें सांपत्तिक स्थिति खालावली.
विकास–योजना कागदोपत्री राहिल्या.

युद्धाच्या अखंड तणावामुळें दोन देशांतील
दळणवळण कमी झाले.
भारताविरुद्ध केलेल्या विषारी प्रचारांतून स्थानिक
दंगेधोपे उद्‌भवूं लागले.
अल्पसंख्यांकांची सुरक्षितता धोक्यांत आली.
निर्वासितांचे लोंढेच्या लोंढे भारतात येऊं लागले.

विभाजनाची जखम अजून पाझरतेच आहे.
काश्मीर जर पाकिस्तानला मिळाले तर भारतांतील

अल्पसंख्यांक मुस्लीम सदैव भयभीत राहतील
आपल्यावरील त्यांचा विश्वास आपण गमावून
बसवू, अशी तुझी कल्पना होती.
जिथें सदैव नंदनिच्या फुलांचा सडा पडतो, त्या काश्मिरांत
तुला रक्ताचा सडा पडायला नको होता.

३०-१२-७२

आज तूं पाऊणशेच्या वेशीवर उभा आहेस.
अर्ध शतकांहून अधिक काळ भारतीय राजकारणांतील
पेंच-प्रसंग तूं पाहिले आहेस.
त्यांतील अनेक तूं सोडविले आहेस.
अशा वेळीं कोणाहि विचारवंतानीं तुझ्या
व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घेण्यासाठीं थोडे थबकावे,
तुझ्या जीवनांतील वैशिष्टयपूर्ण घटनांचा अभ्यास करण्याचा
विचार मनांत आणावा, हे योग्यच आहे.
जगांतील सारे देश आज विविध नात्यानीं
भारताशी जोडले गेले आहेत. म्हणूनच आजच्या युगाचे
भवितव्य घडविणारे ' कुरु ' क्षेत्र इथेंच आहे. गेल्या काहीं
दशकांत भारतात झालेल्या क्रांतीने जगाचे डोळे इकडे
वेधले आहेत.
विस्तारानें खंडाएवढया विशाल आणि विचाराने
अस्मानाएवढया उत्तुंग अशा देशाचा तूं शिल्पकार आहेस.
विश्वैक्य साधण्यासाठी ' भूत-भविष्याला ' सांधणारा...
त्यांतून ' वर्तमान ' उभा करणारा तू एक कलाकार आहेस.
आपल्या नैतिक सामर्थ्यावर अण्वस्त्रांकित
राष्ट्राकडे निर्भयतेने पहायला आम्हांला महात्माजींनंतर
तू शिकविलेस.
जगांतील साऱ्या सत्‌जनांना अहिंसेतून मिळणाऱ्या
चिरंतन शांतीची पुरेपूर कल्पना आहे.
यामुळेंच गांधींबरोबर ' भारत भाग्य विधाता '
म्हणून तुझेहि नांव घेतले जातें.
कवि ' बी ' च्या भाषेंत सांगावयाचें म्हणजे
" हृदयाच्या कातळातळी
अक्षय जीवन घे उसळी

पाषाणासी
भेदुनि, प्यासी
जनता ताजी करिल अशी
जादू कोठे मिळे कशी ? ''

माझ्या मतें ती जादू तुझ्या अक्षय थयथयणाऱ्या जीवनांत होती.

१९-३-७३

तुझे जीवन मुक्त-छंदांत लिहिलेलें एक महाकाव्य आहे पाऊणशें सर्गांचे शेंकडो उपसर्गांचे. काश्मीरमधील 'नहरा' कालव्याच्या काठी वास्तव्य केलेल्या राज'कौल' घराण्यांतला तुझा जन्म.

मातेकडून मिळालेला वारसा निसर्ग-दत्त नंदनांतल्या
स्वरूपाचा देवानींहि लौकिक सुखासाठीं (तत्त्व)च्युत व्हावे अशी
खऱ्या अर्थानें पंडिती बुद्धि दिली. रसग्राही अंतरंग दिलें. आणि
म्हणूनच काश्मीरबाबत तुझ्या भूमिकेंत धरसोडीची वृत्ति होती, असा
संशय येतो. एखाद्या श्रद्धास्थानाबद्दल बोलताना....निर्णय
घेतांना निःपक्षपाती मत देणे कठीण असते.
पित्याच्या कर्तव्य-कठोरतेनें तुझी मनोभूमी कसदार
झाली. स्वाभिमान, महत्त्वाकांक्षा, शौर्य आणि त्याग ह्या जीवनाच्या
चतुःसूत्रीचा तुला अत्यंत उपयोग झाला. ब्रूक्ससारख्या गुरुजींकडून
तुला सत्त्वशीलतेचे पाठ मिळाले.
वयाच्या तेराव्या वर्षींच बेझंटबाईनीं तुझ्या
उपनयन संस्काराचे पौरोहित्य केले. त्याच वेदमंत्रांतून
त्यांनीं आपल्या व्यक्तित्वाचा ठसा तुझ्या मनावर उमटविला.
बुद्धाकडून तुला नैतिक अधिष्ठान मिळालें. त्याचा उल्लेख
करतांना तुझ्या आत्म्याची ज्योत एका वेगळ्याच रंगांत पालवते.

इंग्लंडमधील 'हॅरो' गुरुकुलांत तुझे शिक्षण
झाले. तिथेहि ' तुझे ' पण आकारत होते. पश्चिमेचें विज्ञान-विशेष
तू इथें आणलें नसतेस तर आणखी अनेक दशकें आम्हीं
जगाच्या मागे राहिलो असतो.

पुढें जगांतील अनेक प्रभावी व्यक्तींशी तुझा जवळून संबंध आला,
त्यामुळेंच त्यांच्या तोलामोलाची तुला कल्पना

आली. तुझा भाव-सामर्थ्य वाढले. शब्दांना किमत आली. कर्तृत्वाच्या कक्षा वाढल्या. नवीन मूल्यांचा प्रभावशाली प्रचारक म्हणून तुला नांव मिळालें. स्वातंत्र्य–संग्रामांत घेतलेली उडी पैलथडी जाण्यासाठीच, अशी तुझी जिद्द होती.

तुझ्या मनांतील प्रांजल विचारानें देशांतील भोळ्या भाबड्या किसानांना अस्तित्वाची जाग आली. असह–कारितेच्या चळवळीचें मोल कळलें. शेतकरी हा आपला बन्धु बलराम आहे, ह्या कृष्णाच्या भावनेने तूं त्यांच्या-जवळ गेलास. ते बलवन्त झाले.
भारतातील सातशें संस्थाने ह्या त्याच्या रक्तवाहिन्याच्या प्रवाहाला अडथळा करणाऱ्या गांठी आहेत. त्या नामशेष व्हायला हव्यात, असे तुला वाटले. त्याप्रमाणे तूं ती भारतांत विलीन केलीस, हा तुझ्या कर्तृत्वाचा कळस होता

महात्माजींनी तुला कलावंत म्हटले आहे.
तुझ्या भाववाचक डोळ्यांपुढे एक स्वप्नसृष्टि होती. त्या सृष्टींत कला-वंतानी स्वछंद रंगाने स्वतःला विसरावे असे विश्वदर्शन आहे. युद्धापासून अलिप्त राहिलेल्या बुद्धाची उंची आहे. हिंसात्मक मार्गानें गेलो तर आपलें जवळ येणारे स्वातंत्र्य दूर जाईल, असें निश्चयात्मक सांगणाऱ्या महात्माजींचे द्रष्टेपण आहे. साम्राजशाही आणि सरंजामशाही या दोन ‘ अहम् ’ मदी वृत्तीचा निषेध करून नवभारतानें चोखाळलेली पाऊलवाट आहे. कलावंतानी आमरण चिंतनमग्न रहावे इतकी विविध दर्शनें ह्या तुझ्या शब्दसृष्टींत आहेत

तुझी मनोभूमिका कसदार परंतु कलात्मक होती.

चेहऱ्यावरील छटा प्रसंगानुरूप बदलत. कधीं आवेशाच्या लहरींत तोल सुटे, तर कधीं डोळ्यांत आनंद-लहरी उमलत. तुझ्या जीवनांतील हे सगळे भावाविष्कार जिला समग्र वाचतां आले अशी एकच व्यक्ति आज ह्यात आहे. ती इंदिरा....तुझी एकमेव कन्या. भारत-पाकिस्तान संघर्षाच्या लाटेवर स्वार झालेली कालची महिषासुरमर्दिनी....आजची शांतादुर्गा. तिलाच तुझ्या जीवनाच्या महाकाव्याचे सारे सर्ग अभ्यासावयास मिळाले. तिच्या आजच्या अलौकिक यशाचे बरेचसे श्रेय तुझेच आहे.

## ११४ : विश्व तुझ्या पदिं आले

महाभारताची राजधानी देहल्ली. गेल्या अनेक शतकांत देहल्लीच्या तक्तावर बसलेल्या बादशहाच्या सिंहासनाचे खूर (एखाद-दुसरा अपवाद वगळल्यास ) रक्तलांछित होते. त्यांच्या हातांतील राजदंड दहशतीचा प्रतीक होता. त्यांचे सैनिक जनतेचे रक्षक नसून भक्षक होते .मिशांच्या कल्ल्यांना पीळ देणारे आणि अधिकाऱ्यांची हाजीजी करून मिळविलेले बिल्ले सांभाळणारे फौजदार पोटभरूच असणार.

आजच्या देहल्लीचे राज्य एकतंत्री नाहीं. म्हणून
ते चालविणारे राज्यकर्ते एककल्ली नाहीत. जनतेच्या कल्याणासाठी
जनतेनें निवडून दिलेल्या प्रतिनिधींचे ते राज्य आहे. बहुमताला
तेथें प्रधानपद आहे. अशा निवडून दिलेल्या मंत्रिमंडळाचा तू पंतप्रधान
होतास. तुझ्या प्रधानकीची कारकीर्द सोळा वर्षांची. एवढ्या खंड–
तुल्य देशाची जबाबदारी ज्या परिस्थितीत तू शिरावर घेतलीस
त्या परिस्थितींत कोणताहि नेता उभाच राहिला नसता, इतकी
ती बिकट होती.

परंतु तुझ्या शतपैलू व्यक्तिमत्त्वापुढे भारतच नव्हे,
तर जगांतले सारे देश अवाक् होते. पंडिताला लाजविणारी
बुद्धिमत्ता, शास्त्रीय विषयांचा व्यासंग, देशोदेशींच्या
महान पुरुषांचे जवळून दर्शन घेतल्यामुळें डोळ्यांत
चढलेले तेज, अमीराचे देखणेपण, समतोल विचारसरणी,
अविश्रांत श्रम, सिद्धार्थ गौतमासारखा केलेला ऐश्वर्य-त्याग
आणि या सर्वांवर कळस म्हणजे जनतेचे मन
हिरवळून टाकणारी कारंजासारखी थुईथुईणारी तळमळ
...या अनेक विशेषांमुळें तूं जगाला भारताच्या जवळ आणलेस.
त्यांच्यात एक नातें निर्माण केलेस. त्या नात्याला संस्कृतीचा
रंग दिलास .... आत्म्याचा गंध दिलास.

तूं नुसताच भारताचा राहिला असतास तर मतलबी
मायेने चार देशानीं एखाद्या आंतराष्टीय मंडळाच्या

मतदानांन तुझ्यासाठीं हात वर केला असता. पण तुझे अद्वितीयत्त्व
भारताला मध्यबिंदू मानून जगांतील देशांना आपल्या
वर्तुळाच्या परिघांतून भारत-दर्शन घ्यायला लावणारे होते.
आपल्या संस्कृतींतील आतिथ्य शीलतला तू विश्वरूप दिलेस.
त्यामुळें देशादेशांतील अंतर आज कितीतरी कमी झालेले
आहे. परदेशाबद्दल परधर्माबद्दल मनांत असूयेची विषवृत्ति
नसलेला निर्लेप मनाचा तू एक महापुरुष होतास. महाभारताचा
अनभिषिक्त राजा होतास. आचरणांतून
मानवतेचे दर्शन घडविणारा विश्वजित होतास.
देशोदेशीच्या दरबारी असामींना चिरंतन स्मरण
व्हावे असे तुझे स्व-रूप असल्यामुळे, तुझ्या अंत्ययात्रेला
जगाच्या साऱ्या पाउलवाटा दिल्लींत एकवटल्या होत्या.
गेल्या कित्येक शतकांत हे भाग्य कोंठल्याही देशाच्या राजाला
लाभले नसेल. वायुरूप झालेल्या तुझ्या तेजाला आलिंगन
देण्यासाठीं आकाश लवले होते, मंत्राभिषेकासाठीं
गंगाजल लहरले होते आणि रक्षा कुशीत घेण्यासाठी
पृथ्वी दुभंगली होती.
असा पंचमहाभूतांत विलीन झालेला तुझा आत्मा अमर आहे.
कारण अवघे विश्व तुझ्या
पदी आले होते.

२५-११-७२

## : ११५ : एक व्रतस्थ जीवन

महात्माजींच्या मागून जायचं म्हटलंस तेव्हांच
तू आपली सारी सुखें अलाहाबादेच्या
वेशीवर टांगून ठेविलीस
स्वातंत्र्य-लढ्यांत सैनिकापासून सेनापतीपर्यंतची
हरएक जबाबदारी तू पेललीस ...
जवळ जवळ पंचेचाळीस वर्षे
उद्यांच्या जगांत भारताला मानाचे स्थान
मिळवून देण्यासाठीं तू अविश्रांत श्रम घेतलेस
तरीपण हातीं घेतलेल्या कार्यांत देह कितीहि
दंग असला तरी आयुष्यांत काहीं घटका
काहीं दिवस असें येतात की तेव्हां
'पुरी झाली ही दगदग' असं वाटायला लागतं
.... रंगलेल्या मनाचा विरस होतो.

अशा वेळी तू एकांताचा आश्रय घेतलास
काहीं दिवस दैनंदिन दगदगीपासून तू दूर झालास.
परंतु तिथेहि दूरदेशी...जनतेनें तुला घेरले.
तिनें तुझ्यातील आपले पण हेरले
"ते माझे–मी त्यांचा एकच ओघ अम्हांतुनि वाहे"
हे केशवसुतांच्या नव्या शिपायाचे व्रत तूं स्वीकारले
होतेस. तुझा मनाच्या मळ्याला कुंपण नव्हते. त्यामुळें
विश्वांतील मानवाला तुझ्याबद्दल आत्मीयता
वाटत होती...जिव्हाळा वाटत होता.

देशपर्यटनांतील अनुभव तुझ्या ध्येयपूर्तीला पोषक
ठरले. जनतेच्या मनांत आपले विचार कितपत रुजले आहेत
याची तुला कल्पना आली. तू आधिकाधिक श्रम

घतलेस. आपल्या देशाला प्रकाशांत आणण्यासाठीं तू 'ज्योतीत स्नेह ओतीत' राहिलास. पण ती तरी किती तेवत राहणार ?

वैशाखांतील एका दुपारी
सारा परिसर उन्हाच्या ग्लानीने
पेगंत असतांना
तिच्यांतील स्नेह संपला
देहाची पणती तडकली
आणि ज्योत निळया अवकाशांत विलीन झाली
एका व्रतस्थ जीवनाची अखेर झाली

२–१२–७२

## ११६ दुर्दैवी दुपार

मनाची एकाग्रता व्हायला चित्त स्थिर हवे. ते स्थिरावण्यासाठीं कुठेतरी सूर लागला पाहिजे. अज्ञानाचा शोध घेणारी व्यक्तीच स्थिरचित्त असू शकते.
अखंड वाचनानें तुझे चित्त स्थिरावत होते. जीवनाची संकल्पित वाटचाल क्षितिजापर्यंत पोचली. पश्चिमेच्या दर्शनानें तू विज्ञानाच्या अंतरिक्षांत प्रवेश केलास. देशोदशीच्या महान् पुरुषाच्या संपर्कानें तू स्वतःला तोलून पाहिलेस आणि भारतात परत आलास तो एक परिपक्व विचारांचा महापुरुष म्हणून.

तुझे भावदर्शन महात्माजींना देखिल चित्तवेधक वाटले. त्यानीं तुला मानले. देशाचे भवितव्य त्यानीं तुझ्या हातीं सोपविण्याइतका विश्वास तू त्यांच्या मनांत निर्माण केलास. ' चले जाव ! ' च्या घोषणा–मंत्रातलें सामर्थ्य महात्माजींच्या तपोधनांत होते. स्वातंत्र्याच्या कुरुक्षेत्रांत आपण ज्याला राष्ट्रोद्धाराचा मूलमंत्र सांगितला तो अर्जुनाच्या तोडीचा झुंजार होता ह्याची त्यांना जाणीव होती. त्यांच्या डोळ्यादेखत तू भारताचा पंतप्रधान झालास. पण ते गेले . . . अकस्मात् ' होणार होऊन गेले ' आणि तुझ्या मृत्यूपर्यंतच्या पुढील सोळा वर्षांत भारताचे गुरुत्व कमी करण्यासाठीं सरहद्दीवरल्या असुरी प्रवृत्ति बळावल्या.

नैतिक मनोधर्मांवर तू मिळविलेल्या विजयाला कलंकित करण्याचे प्रयत्न सुरू झाले. तुझ्या चित्तवृत्ति प्रक्षोभित झाल्या. चिंतनाला तडा गेला. डोळ्यांपुढे आकांक्षेची चित्ता पेटली. त्यांतच भारतानें आपली म्हणून मानलेली काही पश्चिमेकडील राष्ट्रें असूयेनें अधुनमधून फूत्कारू लागली. शुभंकरानें गळ्याभोवती स्नेहभावनेनें विषधराचा विळखा घालून घ्यावा

आणि कल्पना नसतांना त्याने त्याला रक्ताचे कंठस्नान
घालावे, तसे वर्तन तुझ्या बाबतींत वामांगी राष्ट्रानीं केलें.

महात्माजींच्या मृत्यूनंतरची तुझी पंधरा सोळा वर्षे
अतिशय गर्दीत गेली. आचरणांत ' सत्यं–शिवं–सुंदरम् ' ची
त्रिगुणात्मक जोड होती, म्हणूनच इतकी वर्षे तरी पंत–प्रधानकीची
वस्त्रे तुला अंगावर टिकविता आली.
पण अखेरी–अखेरी तुझा मनस्ताप वाढला.
चित्ताची एकाग्रता दुभंगली. कुठेच सूर लागेनासा झाला.
दृष्टि–समोरची क्षितिजें काजळली. आणि अंती गंगातीरावरल्या
वैशाखांतील एका दुर्दैवी दिवसाच्या दुपारनें भारताच्या
मुकुटांतील जवाहर निखळतांना पाहिला,

२२–११–७२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
४१३६८ निबंध
२२८९ २०/२/०८
REFBK-0018687
९८६८७.

# वी ' आभिनव ' प्रकाशने

| | | रु. पैसे |
|---|---|---|
| १ | **क्रेमलिनच्या बुरुजावरून** : नरेंद्र सिंदकर (सोविएत जीवनाच्या विविध अंगांचे वेधक दर्शन) | १२-०० |
| २ | **आषाढघन** : दत्ता हलसगीकर (काव्यसंग्रह) | ४-०० |
| ३ | **नेहरू-एक छंदमुक्त चिंतन** : प्रफुल्लदत्त | ८-०० |
| ४ | **घनु वाजे घुणुघुणा** : भानू शिरधनकर (चित्तथरारक शिकार कथा) | ८-०० |
| ५ | **चिडिया घर** : भानू शिरधनकर (वन्य पशूंविषयी मुलाखती व लेख) | ७-०० |
| ६ | **कारवारचा काळूराम** : भानू शिरधनकर (काळ्या वाघाचे चटकदार आत्मवृत्त) | ५-०० |
| ७ | **बेनवाड** : वामन होवाळ (कथासंग्रह) | ६-०० |
| ८ | **जीवन आणि साहित्य** : प्रा. शरच्चंद्र मुक्तिबोध (वाङ्मयीन टीकालेख) | ६-०० |
| ९ | **सागरगड** : गजानन वि. साळवी (कुमारांसाठी कादंबरी) | ५-०० |
| १० | **ऑस्कर वाईल्डच्या परीकथा** : सरला कारखानीस (परीकथा) | २-०० |

अभिनव प्रकाशन, मुंबई १४